साहित्य-संस्कृतिकारणाची पन्नास वर्षे

# शब्द रुची ४९

जानेवारी २०२५ । मूल्य १० रु. । पृष्ठे ४०

वाचक दिन २०२४

## सुवर्णमहोत्सवी वर्षात वाचकदिनाचा भव्य सोहळा



ज्ञानपीठप्राप्त डॉ. भालचंद्र नेमाडे यांच्याशी संवाद साधताना कुमार केतकर



मराठीपण जपलेल्या उद्योजकांशी संवाद












सामाजिक-सांस्कृतिक क्षेत्रात मोलाचे कार्य करणाऱ्या संस्था आणि व्यक्तींचा सन्मान



अशोक हांडे यांची रंगलेली संगीतमय मुलाखत

## वाचकदिन क्षणचित्रे






'बोला मराठी, वाचा मराठी'चा गजर करत निघालेली ग्रंथवारी आणि वाचकदिनाचे उद्घाटन

'मुळाक्षरांचे सुलेखन हॅपनिंग...




पुस्तकप्रकाशनाचे उद्घाटन – चांगदेव काळे, राजीव श्रीखंडे, डॉ. लतिका भानुशाली, मोनिका गजेंद्रगडकर, जयू भाटकर, मिलिंद बल्लाळ... प्रदर्शन पाहताना प्रदीप गुजर आणि कुमार केतकर




डॉ. भालचंद्र नेमाडे आणि प्रतिभा नेमाडे यांचे स्वागत करताना कुमार केतकर आणि संजीवनी खेर

तरुण पिढीच्या लेखकांशी संवाद





कवितेचा तरुण स्वर...

निवेदनाची धुरा सांभाळली...






डॉ. निर्मोही फडके, डॉ. लतिका भानुशाली, डॉ. मृण्मयी भजक आणि अश्विनी भोईर



निवेदन करताना सिद्धार्थ देशपांडे



## वाचकदिन क्षणचित्रे





'बोला मराठी, वाचा मराठी'चा गजर करत निघालेली ग्रंथवारी आणि वाचकदिनाचे उद्घाटन



'मुळाक्षरांचे सुलेखन हॅपनिंग...




पुस्तकप्रकाशनाचे उद्घाटन – चांगदेव काळे, राजीव श्रीखंडे, डॉ. लतिका भानुशाली, मोनिका गजेंद्रगडकर, जयू भाटकर, मिलिंद बल्लाळ... प्रदर्शन पाहताना प्रदीप गुजर आणि कुमार केतकर




डॉ. भालचंद्र नेमाडे आणि प्रतिभा नेमाडे यांचे स्वागत करताना कुमार केतकर आणि संजीवनी खेर

तरुण पिढीच्या लेखकांशी संवाद





कवितेचा तरुण स्वर...

निवेदनाची धुरा सांभाळली...






डॉ. निर्मोही फडके, डॉ. लतिका भानुशाली, डॉ. मृण्मयी भजक आणि अश्विनी भोईर



निवेदन करताना सिद्धार्थ देशपांडे



ग्रंथाली वाचक चळवळीचे मासिक

शब्द रुची ४९

जानेवारी २०२५, वर्ष बारावे
अंक नववा, मूल्य १० रु.

संपादक : **सुदेश हिंगलासपूरकर**
कार्यकारी संपादक : **अरुण जोशी**
मुखपृष्ठ : **ग्रंथाली संगणक विभाग**

**कार्यालयीन संपर्क**
**ग्रंथाली संगणक विभाग**
**shabdruchee24@gmail.com**
**जाहिरात प्रसिद्धी – धनश्री धारप**
**वितरण – हरिप्रसाद जयस्वाल, सौमित्र शिंदे**
**वेबसाइट डिझाइन व डिजिटल एडिटिंग – समीर कदम**

संपर्क
ग्रंथाली, १०१, १/बी विंग, 'द नेस्ट', पिंपळेश्वर को–ऑप. हौसिंग सोसायटी, टायकलवाडी, स्टार सिटी सिनेमासमोर, मनोरमा नगरकर मार्ग, माहीम (प.), मुंबई ४०००१६
फोन : २४२१६०५० **(वेळ : दुपारी १ ते ६.३०)**

**अंकासाठी लेख व प्रतिक्रिया खालील मेलवर पाठवावी.**
**shabdruchee24@gmail.com**

**ऑफिस वेळ : दुपारी १ ते सायं. ७**
**संपर्क/फोन/पुस्तके खरेदी करण्यासाठी**

अंकात प्रसिद्ध झालेली मते ज्या त्या व्यक्तीची. 'ग्रंथाली' चळवळीचे 'शब्द रुची' हे व्यासपीठासमान मासिक आहे. त्यात सर्व छटांच्या विचारांना स्थान आहे. मात्र त्याच्याशी 'ग्रंथाली' विश्वस्त संस्था व तिचे विश्वस्त सहमत आहेत असे नव्हे.

## अनुक्रम

**प्रभाकर वाईरकर / ५**
बहुआयामी व्यंगचित्रकार : मनोहर सप्रे

**सुजय शास्त्री / ९**
भारताला सशक्त करणारा द्रष्टा

**आशय गुणे / १३**
प्रत्येक क्षण समृद्ध करणारा कलाकार!

**राजीव श्रीखंडे / १५**
द हाउंड ऑफ द बास्करव्हिल सर आर्थर कॉनन डॉयल

**डॉ. अंजली पटवर्धन–कुलकर्णी / २२**
कला, मानव्य विद्या आणि सामाजिक शास्त्र यांचे शिक्षणातील महत्त्व

**संजीवनी खेर / २५**
अरुणा ढेरे : प्रतिभावंत साहित्यिक

**अश्विनी भोईर / २८**
**ठाण्यात रंगला ग्रंथालीच्या वाचकदिनाचा भव्य सोहळा**

ग्रंथपरिचय / ग्रंथपाने
**डॉ. निर्मोही फडके, चांगदेव काळे / ३४ ते ३८**

# संपादकीय...

ग्रंथालीने नुकताच ठाणे येथे सुवर्णमहोत्सवी वाचकदिन साजरा केला. पंधरा वर्षांपूर्वी, २५ डिसेंबर २००९ रोजी 'गांगल ७० ग्रंथाली ३५' हे पुस्तक प्रकाशित करून ३५वा वाचकदिन साजरा केला होता. ग्रंथालीच्या पस्तिशीला जुनी विश्वस्त मंडळी निवृत्त झाली. नव्या विश्वस्तांना सामावून घेऊन ग्रंथालीने पुढील पंधरा वर्षांचा प्रवास केला. आता नव्या विश्वस्तांमधील काहींचे वय सत्तरी पार करून पुढे गेले आहे. तर काही तरुण मंडळी यात आहेत. पुढील दीड वर्षाने मीही ग्रंथालीतील पन्नाशीचा टप्पा पूर्ण करणार आहे.

ग्रंथालीने गेल्या पंधरा वर्षांत ग्रंथाली व मुद्रण सुविधा केंद्र मिळून हजारांहून अधिक पुस्तके प्रकाशित केली. याच काळात काही कोशवाङ्मयाची निर्मिती केली. महाराष्ट्राच्या हीरकमहोत्सवानिमित्त तीन विशेष खंडांचे प्रकाशन केले. प्रकाशन व्यवसायातील विविध संस्थांची पुस्तके प्रकाशित केली. याच काळात ग्रंथालीने आपल्या जागेचा प्रवास दादर ते ग्रँटरोड, ग्रँटरोड ते परत दादर व आता टायकलवाडी आणि बांद्रा असा केलेला आहे.

या पंधरा वर्षांत ग्रंथालीने 'शब्द रुची' मासिकाचे विविध विशेषांक प्रसिद्ध केले. वाचकदिनाला वेगळे स्वरूप दिले. याच काळात कोव्हिड आला होता. त्याकाळात ग्रंथालीने आपले 'ग्रंथाली वॉच' हे यूट्यूब चॅनेल सुरू केले. बांद्रा येथे जागा मिळवल्यावर त्या जागेच्या नावे 'ग्रंथाली प्रतिभांगण' हे यूट्यूब चॅनेल चालू केले. या दोन्ही चॅनेलवर विविध विषयांचे कार्यक्रम व उपक्रम धरून पाचशे व्हिडिओ प्रसृत केले. तसेच, दिवाळी अंक घेऊन व 'दिवाळीसंच योजना' सुरू केली व 'दिवाळीसंध्या'चे कार्यक्रम घडवले. गेली पाच वर्षे ही योजना राबवत आहोत. मागील दोन वर्षे शरद काळे यांच्या नेतृत्वाखाली 'विज्ञानधारा' हा शाळाशाळांमध्ये जाऊन उपक्रम राबवत आहोत. आतापर्यंत एकूण अडीचशे शाळांमध्ये हा उपक्रम राबवला आहे. यातूनच 'विज्ञानधारा' या मासिकाची कल्पना निघाली. गेली दीड वर्षे तो अंक प्रसिद्ध होत आहे. या उपक्रमाचा एक भाग म्हणून गेली तीन वर्षे विद्यार्थ्यांसाठी 'विज्ञान एकांकिका' स्पर्धा घेत आहोत. या वर्षी धरून तीन वर्षांत साडेसातशे शाळांचा सहभागी होत आहे. गेल्या वर्षी ग्रंथालीने 'आरोग्ययात्रा' व 'विज्ञानधारा यात्रा' काढली होती व याआधी दोन यात्रा केल्या होत्या.

या पंधरा वर्षांच्या काळात ग्रंथालीने काही लेखकांच्या साठीचे व सत्तरीचे कार्यक्रम तर के.ज. पुरोहित व जयवंत दळवी यांच्या जन्मशताब्दीचे कार्यक्रम केले. पुढे दरवर्षी साहित्यिक-सांस्कृतिक क्षेत्रातील किमान दोन व्यक्तींचे जन्मशताब्दीचे कार्यक्रम करण्याचा ग्रंथालीचा मानस आहे. पुढील वर्षापासून ग्रंथालीचा वाचकदिन मुंबईत साजरा होईल. त्याच काळात ठाणे, वसई, विरार, पालघर, नवी मुंबई या स्थानिक ठिकाणी स्थानिक संस्थांसोबत वाचकदिन साजरा करणार आहोत.

याच काळात 'बलुतं' या पुस्तकाला चाळीस वर्षे पूर्ण झाली त्यानिमित्ताने गेली सहा वर्षे 'बलुतं' या पुस्तकाच्या नावे बहुजन साहित्यातील लेखकाच्या एका पुस्तकाला पुरस्कार दिला जातो. अरुण साधू यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ ग्रंथालीने पहिली तीन वर्षे तरुण पत्रकारांना व त्यानंतर दोन वर्षे सामाजिक संस्थांना अनुदान दिले. त्यातून चार पुस्तकांची निर्मिती झाली. तीन व्याख्याने आयोजित करण्यात आली.

ग्रंथालीने ३० मार्च २०२५ पासून 'शब्द रुची' मासिक हे बंद करण्याचे ठरवले आहे. ते दर तीन महिन्यांनी डिजिटल माध्यमातून प्रसिद्ध होईल. केवळ दिवाळी अंक छापील स्वरूपात प्रसिद्ध केला जाईल. ग्रंथालीकडे आता बावन्न हस्तलिखिते आहेत. याचा प्रकाशन कार्यक्रम ठरवण्यात दोन महिने जातील. एप्रिलनंतर नवीन व्यवस्था निर्माण होईल व त्यातून पुढील पुस्तकांच्या प्रकाशनाचा कार्यक्रम ठरेल. दरवर्षी ग्रंथालीची पंचवीस पुस्तके व मुद्रण सुविधा केंद्रांतर्गत पंचवीस पुस्तके अशी पन्नास पुस्तके प्रसिद्ध करण्याचा ग्रंथालीचा मानस आहे. ही सर्व प्रकाशने सप्टेंबर २०२५पासून प्रसिद्ध होतील. यामधल्या काळात, जून २०२५ पर्यंत ग्रंथाली कुठलेही हस्तलिखित स्वीकारणार नाही. ग्रंथालीला एखादा विषय सप्टेंबरमध्ये यावा असे वाटत असेल तर ती कमिटमेंट घेऊन, नवीन मंडळी विचार करून ते पुस्तक सप्टेंबरमध्ये प्रसिद्ध करतील.

ग्रंथालीच्या पन्नास ते साठ या वाटचालीसाठी नवीन व्यवस्था उभारत आहोत, त्यासाठी मी माझा वेळ देणार आहे.

ग्रंथालीच्या पन्नाशी ते साठीपर्यंतच्या काळात दर दोन वर्षाचा प्लॅन करून पुढील प्रवास करणार आहे. काळ बदलतो आहे. टॅक्नॉलॉजीही बदलत आहे. पुढील काळात संस्थांचे स्वरूप कसे राहणार या सर्व गोष्टींचा विचार करून विश्वस्त मंडळी प्रवास करणार आहेत. ३० मार्च २०२५ नंतर ग्रंथालीचे नेतृत्व विश्वस्त डॉ. लतिका भानुशाली व डॉ. मृण्मयी भजक करणार आहेत. त्यांना विश्वस्त मंडळाचे सहकार्य असेल.

नवीन वर्षाच्या शुभेच्छा!

**– सुदेश हिंगलासपूरकर**
विश्वस्त, ग्रंथाली




# बहुआयामी व्यंगचित्रकार मनोहर सप्रे

**प्रभाकर वाईरकर**

राहण्याचे ठिकाण चंद्रपूर, मुंबईपासून कोसो मैल दूर, डोंगर-कडेकपारी, नदी-नाले आणि काट्याकुट्यांनी वेढलेले, मागासलेले, विकासाच्या अंधुकशाही किरणांचा थांगपत्ताही नसलेले. सरकारी नोकरांना धडपड्या, अभ्यासू, आत्मविश्वासाने भरलेल्या तरुणाच्या डोक्यात एक खूळ संचारते, 'माझी व्यंगचित्रे मुंबईच्या प्रमुख दैनिकामध्ये प्रसिद्ध व्हायला पाहिजे.' त्यासाठी प्रसिद्ध दैनिक 'लोकसत्ता'शी तो पत्रव्यवहार करायचा, प्रत्येक वेळी व्यंगचित्रे/पत्ते वायुवेगाने परत यायची.

परंतु तो हरला नाही. आपली व्यंगचित्रे प्रसिद्ध केली जातील या ईर्ष्येने त्याने मुंबईस्थित लोकसत्ताचे कार्यालय गाठले आणि संपादकांच्या समोर उभा ठाकला. ''चंद्रपूरसारख्या दूरस्थ ठिकाणी तुम्ही स्थायिक असल्याने रोजच्या 'एक कॉलमी' व्यंगचित्रांत शिळेपणा येणार असल्याने इच्छा असूनही आपली सूचना मान्य करणे शक्य नाही.'' -इति. संपादक. तुम्ही जी गोष्ट अशक्य म्हणता ती मी शक्य करून दाखवेन, याची हमी त्याने दिली तरीही संपादकांनी आपले म्हणणे मागे घेतले नाही. तरीही तो युवक अखेरचा उपाय म्हणून संपादकांना म्हणाला, ''मला नकार देणे आपला अखत्यार आहे. पण मला शक्य वाटणारी गोष्ट नाकारून माझ्या आत्मविश्वासावर पाणी फेरण्याचा आपल्याला नैतिक अधिकार नाही.'' यावर संपादकांना काय वाटले माहीत नाही. म्हणाले, ''ठीक आहे, चित्र द्यायला सुरुवात करा, पण खात्रीने सांगतो चित्र देणे तुम्हाला शक्य होणार नाही.'' हे आव्हान स्वीकारून त्याने दररोज व्यंगचित्र देण्यास सुरुवात केली. पुढे तब्बल २० वर्षे 'ऐकावं ते नवलच' या कॉलममधून प्रसिद्ध झाली. त्या जिद्दी आणि कल्पक व्यंगचित्रकाराचे नाव, प्रसिद्ध व्यंगचित्रकार मनोहर श्रीधर सप्रे आणि त्या संपादकाचे नाव ह.रा. महाजनी.

४ जानेवारी १९३३ पासून बुलडाण्याच्या नांदुरा खेड्यात एक बाळ रांगू-खेळू-बागडू आणि शाळेत जाऊ लागले. गरिबीत अतिशय कष्टाने शिक्षण कसेबसे पूर्ण केले. घरची



मनोहर सप्रे

परिस्थिती अतिसामान्य. सीताबाई कलामहाविद्यालय, अकोला येथून तत्त्वज्ञान या विषयावर पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केले आणि पोटापाण्यासाठी म्हणून सरकारी नोकरी पत्करली. कलाकाराचा पिंड असल्याने त्यात त्यांचे मन रमले नाही. उणीपुरी सहा वर्षे सरकारी नोकरी करून अमरावती तेथील जनता महाविद्यालयात प्राध्यापक म्हणून नाखुशीने रुजू झाले. अल्पसंतुष्ट नसल्याने पुढे त्यांनी नोकरी करून राज्यशास्त्रामध्ये पदवी प्राप्त केली.

चित्रकलेचे औपचारिक शिक्षण झाले नसले तरी कलेचे अंग त्यांना होते. त्यांनी सुरुवातीच्या काळात ओबडधोबड व्यंगचित्रे रेखाटली व अनेक संपादकाकडे पाठवली. परंतु नकारघंटा वाजायची. त्यांच्या चित्रकलेत आमूलाग्र बदल घडवून आणला तो 'उद्यम' मासिकाचे संपादक वडेगावकर यांनी. जाड-बारीक रेषा, आकार कसे कागदावर उतरावयाचे, छापल्यावर ते चित्र कसे दिसेल याचे ज्ञानामृत वडेगावकरांनी दिले. तेच माझे गुरू असे सप्रे अभिमानाने सांगत.

पहाटे व्यंगचित्र साकारून सकाळी रेल्वेगार्डकडे सुपूर्द करत व तो गार्ड ते लोकसत्ताच्या कार्यालयात पोहोचवत असे. दोन-




बराय मंडळी तुम्ही म्हणताय म्हणून घेऊया वॉशिंग मशीन, पण मग चार वर्षं कपडे मागायचे नाहीत!




''रक्त, मल, मूत्र, थुंकी, एक्स-रे, इको, स्कॅनिंग वगैरे सगळं झाल्यावर डॉक्टर म्हणताहेत चष्म्याचा नंबर वाढलाय्!''

तीन दिवसांनी ते व्यंगचित्र छापून येई. म्हणून त्यांनी राजकीय व्यंगचित्रे काढली नाहीत. कारण ती एका दिवसात शिळी होतात. परंतु राजकीय-सामाजिक व्यंगचित्रांच्या कालावधीला बंधन नाही. म्हणून त्यांच्या चित्रामध्ये सामाजिक विषय सापडतात. जसे- जत्रा, नाटक, सिनेमा, हॉस्पिटल, बसस्टॉप, खेळाचे मैदान, कार्यालये, कॉलेज, पोलीस स्टेशन इत्यादी. त्यांची व्यंगचित्रांची व्याख्या अशी- 'कुठल्याही वस्तुस्थितीची केलेली हास्यकारक चित्ररूप पुनर्रचना म्हणजे व्यंगचित्र.' कल्पनाशक्ती व विनोदीबुद्धी ही व्यंगचित्रकाराची आयुधे.

त्यांच्या व्यंगचित्रांमध्ये उत्स्फूर्त रेषांचा खेळ असे. व्यक्तीच्या शरीररचनेची प्रमाणबद्धता त्यांच्या शैलीनुरूप त्यांनी स्वत: ठरवली. हाताला किंवा पायांना पाच बोटे असतीलच असे नाही. कधी तीन तर कधी चारही प्रसंगानुरूप चितारली जायची. कमीत कमी बारकावे, पेनाने रेखाटलेली एकसुरी रेषा. चेहऱ्यावरचे हावभाव प्रसंगानुरूप अचूक रेखाटले जायचे. पार्श्वभागी कमीत कमी रेषांतून भिंत, दरवाजा इत्यादी रेखाटायचे. रंगाचा एखाददुसरा फटकारा.

सूक्ष्म निरीक्षणशक्ती, समाजातील विसंगती धावतधावत त्यांच्याकडे येई. अलगद तिला व्यंगचित्रामध्ये ते बसवत आणि उत्कृष्ट व्यंगचित्र त्यांच्या कागदावर सहज अवतीर्ण होत असे. उदाहरणार्थ, दवाखाना या व्यंगचित्रांमध्ये डॉक्टर कसे आजाऱ्याला फसवून त्याचा खिसा कसा रिकामा करतात हे उत्तम प्रकारे सांगितले आहे. रोग एकीकडे व उपचार भलतीकडेच.

दुसऱ्या एका व्यंगचित्रामध्ये कौटुंबिक विषय हाताळला आहे. बायको वॉशिंग मशीनचा हट्ट धरते. 'पण मग चार वर्षे कपडे मागायचे नाहीत' या वाक्यातून तिचे तोंड ते बंद करतात. अतिशय मार्मिकतेने वॉशिंग मशीनचा विषय बंद केला जातो.

अकोला व अमरावती असा प्रवास करत ते घनदाट अरण्य, डोंगरदऱ्यांच्या चंद्रपूरला स्थायिक झाले. प्राध्यापकी करत असताना त्यांच्या अभ्यासपूर्ण लेक्चरना त्यांचा विषय नसलेलेही विद्यार्थी खिडकीतून डोकावून त्यांची लेक्चर ऐकून प्रभावित होऊ लागले. ही गोष्ट त्या विद्यालयाच्या प्राचार्यांना खटकली म्हणून त्यांनी सप्रेंची मुस्कटदाबी करण्याचा प्रयत्न करताच करारी व जिद्दी सप्रे यांनी नोकरीला रामराम ठोकला आणि सर्जनशीलतेकडे वळले.

त्यांनी उपजीविकेचे साधन म्हणून काष्ठशिल्प तयार करण्यास सुरुवात केली. एका संध्याकाळी ते व त्यांची मुले फिरण्यासाठी जंगलात गेले असता, परत येताना वाटेत त्यांना लाकडाचा ओंडका पडलेला दिसला. सप्रेंच्या तीक्ष्ण नजरेला त्या लाकडामध्ये कसलीशी आकृती दिसली. ते लाकूड त्यांनी घरी आणून त्याच्यावर काम करून 'आई आणि मूल' हे शिल्प तयार केले. ते त्यांचे पहिले शिल्प. ते विकले गेले १०० रुपयांना. अशी बेढब, निरुपयोगी, टाकाऊ लाकडे आणून त्यातून




"काय म्हणताहेत आमचे भावी आमदार?"



"गुन्हा करतो नि वरून मंत्री झालो की बघून घेईन म्हणून धमकी देतो साहेब."

सुंदर, आकर्षक, कलात्मक शिल्पे ते बनवत. छंद म्हणून सुरू केलेले काम पुढे त्यांचा व्यवसाय झाला. ज्याच्यातून ते घरखर्च चालवू लागले. जंगलाच्या आसपास आदिवासी पाडे विखुरलेले असायचे. त्या पाड्यांमध्ये जाऊन आदिवासींच्या मुलांना त्यांनी काष्ठशिल्पाचे धडे दिले.

बांबूपासूनही ते अतिशय कल्पक वस्तू बनवायचे. त्यांच्या या शिल्पामुळे अनेकांचे दिवाणखाणे सजले. त्यांना परदेशातूनही मागणी येऊ लागली. या काष्ठशिल्पांचे प्रदर्शन फ्रान्समध्ये आयोजित करण्यात आले. त्यामध्ये त्या आदिवासींच्या मुलांचीही शिल्पे होती. त्यानंतर अमेरिकेचीही वारी सप्रेंच्या शिल्पांनी केली. चतुरस्र व्यक्तिमत्त्व असल्याने त्यांनी दगडगोटे जमवून त्यातूनही अनेक कलात्मक शिल्पे साकारली. गावातील अनेक होतकरू तरुणांना या कलेच्या छत्राखाली आणले आणि त्यांच्या पोटापाण्याची सोय करून दिली. त्यांची घरगुती 'आर्ट गॅलरी' कलासाधनेची साक्ष देते.

बहुपेडी व बहुआयामी व्यक्ती असल्याने ते कधीही स्वस्थ बसले नाही. विभिन्न व्यक्तिमत्त्वाच्या व्यक्तींना ते पत्रे लिहीत त्यामध्ये कला व व्यवहार यासंबंधी आपले विचार प्रांजळपणे मांडत. ती पत्रे संग्रहित करून 'सांजी', 'रुद्राक्षी' व 'दहीवर' अशी पुस्तके प्रकाशित केली.

मधल्या काळात ते पूर्ण वेळ कामगार चळवळ व राजकारण यामध्ये सक्रिय कार्यकर्ते झाले. त्यासाठी त्यांनी दहा वर्षे व्यतीत केली. याचा परिणाम म्हणून ते लोकसभेच्या निवडणुकीत उमेदवार म्हणून उभे राहिले. १९९२च्या दरम्यान कार्टूनिस्ट कंबाईन या व्यंगचित्रकारांच्या संस्थेतर्फे त्यांना जीवनगौरव पुरस्कार' देण्यात आला. त्याच वेळी माझी त्यांच्याशी भेट झाली. किलकिले डोळे करून पाहण्याची सवय. गोरा रंग, उंचपुरी देहयष्टी, पांढरे केस, केसांची एक बट कपाळावर रुळलेली असायची. स्पष्ट विचार, निर्भीड मांडणी, भाषणात विनोदांचा चपखल वापर आणि तत्त्वज्ञानाने भाषण खुलायचे. ओघवती भाषा, इंग्रजीवर प्रभुत्व तसेच मराठीवरही अभ्यासपूर्ण पकड असल्याने त्यांच्या 'फॅन'ची संख्या चढत्या क्रमाने वाढत असे. विनोद असा खुलवून सांगत की ऐकणाऱ्याची हसून हसून मुरकुंडी वळे.

त्यांचा मित्रपरिवार त्यांच्या विद्वत्तेची व बहुआयामी व्यक्तिमत्त्वाची जाणीव करून देतो. अभिनेते निळू फुले, विजय तेंडुलकर, पु.ल. देशपांडे, नर्गीस दत्त, श्रीराम लागू, जयंतराव टिळक अशा विद्वानांच्या कळपात त्यांचे आयुष्य बहरले.

तत्त्वज्ञान व राज्यशास्त्र यांचा सखोल अभ्यास, वैचारिक दृष्टिकोन असल्याने मोजक्या शब्दांत जीवनावर भाष्य करायचे, 'मानवाकडे जे नाही त्याची भरपाई म्हणून त्याला कल्पनाशक्ती मिळालीच आणि जे आहे ते सुसह्य व्हावे म्हणून त्याला विनोदबुद्धी मिळालीय.' अशी त्यांची मांडणी होती. वाचक आणि साहित्य यांच्या नात्याबद्दल ते म्हणतात, 'वाचक साहित्यनिर्मितीचा एक भागीदार असतो, कवी किंवा लेखक काहीएक लिहून जातो. पण लेखनाला वाचकागणीक नवे नवे अर्थ प्राप्त होत जातात. तो साहित्याचा विस्तार असतो.'

त्यांच्याशी बोलताना नावीन्याचा शोध लागे. कलेवर व

सामाजिक जीवनावर त्यांनी किती खोलवर अभ्यास/मनन केले आहे याची जाणीव होई. उपजत शोधक नजर व निरीक्षणशक्ती तसेच गरुडाच्या भिरभिरत्या नजरेसारखी सामाजिक विसंगती शोधण्याची वृत्ती त्यांना उपजतच होती. वर्तमानपत्रांतील स्फुट लेखांवर आधारित 'मनमौजी' पुस्तक तर निवडक व्यंगचित्रांचे 'व्यंगार्थी' व 'हसा की' हे संग्रह वाचकांनी डोक्यावर घेतले नसते तर नवलच! १९६३ साली लोकसत्ताचे संपादक ह.रा. महाजनी यांनी लिहून पत्र 'तुमची व्यंगचित्रे वेळेवर पोहोचतात' अशी दिलखुलास दिलेली पोच कोणत्याही पुरस्कारापेक्षा मोठी वाटते, असे सप्रे अभिमानाने सांगत.

त्यांचे आणखी एक भावविश्व- कविता करणे. त्यांच्या अनेक पत्रांमध्ये ते कविता पेरत असत. त्याशिवाय त्या पत्राला पूर्णविराम मिळत नसे.

कला आणि साहित्य यामध्ये गुरफटून न राहता सप्रे यांनी स्वत:ला सामाजिक क्षेत्रात झोकून दिले. वनसंरक्षण व पर्यावरण हे त्यांचे आवडते छंद. दारुबंदी व बांबूंचे संरक्षण यासाठी ते हिरिरीने सामील होऊ लागते, त्याची पोचपावती म्हणून वनराई फाउंडेशनने त्यांना सन २०१९ साली 'स्व. उत्तमराव पाटील स्मृती संवर्धन' पुरस्काराने सन्मानित केले.


त्यांच्या निवडक व्यंगचित्रांचे व काष्ठशिल्पांचे कायमस्वरूपी प्रदर्शन चंद्रपूर अभयारण्यात 'पेंच' येथील रिसॉर्टमध्ये आयोजित केले आहे. त्यांच्या चतुरस्र कामाची दखल घेऊन त्यांना 'चंद्रपूरभूषण' पुरस्काराने गौरवण्यात आले. चंद्रपूर श्रमिष्ठ पत्रकार संघाच्या वतीने 'कर्मवीर' पुरस्कार देण्यात आला. अशा पुरस्कारांनी त्यांच्या आयुष्याला लोकमान्यतेची झालर लावली गेली. त्यांनी किर्लोस्कर, उद्यम, लोकसत्ता, हितवादी, तरुण भारत, केसरी इत्यादींसाठी व्यंगचित्रांची निर्मिती करून लोकांमध्ये जागृती निर्माण केली. आपण जसे बाळासाहेब ठाकरे, वसंत सरवटे व शि.द. फडणीस यांच्या पंक्तीमध्ये जाऊन बसलो तसे आताच्या पिढीमधले लांब नजर टाकली तरीही कोणी दृष्टोपत्तीस पडत नाही, याची त्यांना खंत होती.

व्यंगचित्रकार, लेखक, वक्ता, काष्ठशिल्पकार, समाजसुधारक, कवी अशी विविध आयुधे घेऊन पृथ्वीतलावर वावरणारा धनुर्धर. ती सर्व अस्त्रे याच भूमीत येणाऱ्या पिढीसाठी ठेवून ९२व्या वर्षी निजधामाला गेला.


त्यांच्या मागे त्यांनी साकारलेले कलात्मक घर, पत्नी जिने त्यांच्याबरोबर चालताना चंद्रपूरच्या काट्याकुट्यांत आनंदाने पाय रक्तबंबाळ करून घेतले. मिलिंद आणि नितीन हे दोन मुलगे, सुना आणि नातवंडे-आप्तेष्ट त्यांच्या आठवणींच्या डोहांत मनसोक्त डुंबताहेत.

**– प्रभाकर वाईरकर**
wairkarp@gmail.com

## वाचकदिनी प्रसिद्ध झालेली पुस्तके




**शरद काळे लिखित चिंतन : भाग ५**




**सुधीर थत्ते आणि नंदिनी थत्ते लिखित नोबेलनगरी २०२४**



# भारताला सशक्त करणारा द्रष्टा


**सुजय शास्त्री**

२६ डिसेंबर २०२४ रोजी प्रख्यात अर्थतज्ज्ञ, रिझर्व्ह बँकेचे माजी गव्हर्नर व भारताचे माजी पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांचे नवी दिल्लीत निधन झाले. डॉ. सिंग यांच्या निधनामुळे संपूर्ण देश शोकाकूल झाला. १०-१२ वर्षांपूर्वी जे बडे पत्रकार, अर्थजगतातील विद्वान मंडळी, विविध राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक वर्तुळातील मंडळी डॉ. सिंग यांच्या राज्यकारभारावर अक्षरशः तुटून पडत होते, ही सर्व मंडळी भारताच्या प्रगतीतील डॉ. सिंग यांचे योगदान आपण समजण्यात अपयशी ठरलो अशी कबुली देत होते. फेसबुक, ट्विटर, व्हॉट्सॲप या सोशल मीडियावर तर लक्षावधी मेसेज डॉ. सिंग यांच्या कर्तृत्वाचा पाढा वाचणारे पडत होते.

१९५०च्या दरम्यान डॉ. सिंग यांनी सरकारी नोकरशाहीत सामील होण्याचा निर्णय घेतला. परंतु त्यांना सरकारी सेवेत प्रवेश करता आला नाही. मग १९६५मध्ये डॉ. सिंग यांनी न्यू यॉर्क येथील युनायटेड नेशन्स ट्रेड बॉडीमध्ये (अनक्टॅड) काम करण्यास सुरुवात केली. अनक्टॅड व दिल्ली स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स यांच्यातील संबंधांमुळे डॉ. सिंग पुन्हा भारतात ओढले गेले. १९७१ मध्ये त्यांनी सिव्हिल सर्व्हिसमध्ये प्रवेश केला व ते विदेशी व्यापार मंत्रालयात आर्थिक सल्लागार म्हणून रुजू झाले. एका वर्षांतच ते अर्थखात्याचे मुख्य आर्थिक सल्लागार म्हणून निवडले गेले. या खात्यातूनच त्यांनी पहिल्यांदा महागाईचा प्रश्न हाताळण्यास सुरुवात केली. त्यांचा प्रवास असाच कायम राहून पुढे ते अर्थसचिव झाले नंतर नियोजन आयोगाचे सदस्य झाले. त्यानंतर रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर व पुढे नियोजन आयोगाचे उपाध्यक्ष झाले.

नोकरशाहीत विविध पदांवर काम करत असताना त्यांना बऱ्याच आरोपांचा सामना करावा लागला होता. डॉ. सिंग इंदिरा गांधी यांच्या 'गरीबी हटाव'चे मोहिमेचे समर्थक होते. त्यांची सोशॅलिस्ट भूमिका काहींसाठी टीकेचे लक्ष्य होती. पुढे १९८५ मध्ये राजीव गांधी पंतप्रधान झाले. त्यावेळी नियोजन आयोगाचे उपाध्यक्षपदी डॉ. सिंग यांची नियुक्ती त्यांनी केली. सातव्या पंचवार्षिक योजनेचा आराखडा डॉ. सिंग यांनी केला होता व हा आराखडा राजीव गांधी यांना पसंत न पडल्याने व काही गैरसमज निर्माण झाल्याने डॉ. सिंग यांनी जिनिव्हात साऊथ कमिशनचे सेक्रेटरीपद स्वीकारले व ते तिकडे गेले. पुढे चंद्रशेखर यांच्या पंतप्रधानपदाच्या काळात ते पुन्हा भारतात आले व त्यांचे आर्थिक सल्लागारपदही त्यांनी स्वीकारले होते. जिनिव्हातल्या साऊथ कमिशनच्या सेक्रेटरीपदाच्या कारकिर्दीत दक्षिण आशिया खंडाला दारिद्र्यातून सुटका, साधनसंपत्तीचा विकास व व्यापार यांचा मार्ग दाखवणारा एक अहवाल त्यांनी तयार केला. या अहवालात त्यांनी म्हटले की, शीतयुद्धोत्तर काळानंतर विकसनशील देशांनी स्वतःच्या आर्थिक विकासासाठी परस्परांना आर्थिक सहकार्य करण्याची गरज असून व्यापार उदारीकरणाची गरज आहे. डॉ. सिंग यांची उदारीकरणाची ही थेअरी त्यावेळी अनेक अर्थतज्ज्ञांच्या टीकेस पात्र ठरली. भांडवलशाहीचा, उदारीकरणाचा मार्ग स्वीकारल्यास ग्रामीण भागातील मते जातील असा काँग्रेसमधील प्रवाह होता. पण डॉ. मनमोहन सिंग हे या मताच्या पूर्ण विरोधात होते. हा संघर्ष अखेरपर्यंत त्यांना अनुभवा लागला.

मे १९९१मध्ये राजीव गांधी यांची निर्घृण हत्या झाल्यानंतर नरसिंह राव यांच्याकडे पंतप्रधानपद आले. तो काळच आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या दृष्टीने अस्थिर होता. सोव्हिएट युनियन कोसळला होता, कुवेत प्रश्नावरून अमेरिकेने इराकवर हल्ला केला होता. या दोन घटनांचा थेट परिणाम भारताच्या अर्थव्यवस्थेवर झाला होता. त्यातच नोव्हेंबर १९९० व मार्च १९९१ मध्ये दोन सरकारे पडली होती. चंद्रशेखर सरकारला सोने गहाण ठेवण्याची वेळ आली होती. अशा काळात अर्थव्यवस्था सांभाळणारा, तिला ऊर्जितावस्था आणणारा अर्थमंत्री देशाला हवा होता. नरसिंह राव यांनी पंतप्रधानपद स्वीकारले नव्हते व ते आपल्या कॅबिनेटची



सुदेश हिंगलासपूरकर, डॉ. मनमोहनसिंग, सुजय शास्त्री आणि कुमार केतकर

बांधाबांध करत असताना एकेदिवशी कॅबिनेट सचिव नरेश चंद्रा यांनी घाईघाईने नरसिंह राव यांच्यापुढे देशाच्या आर्थिक परिस्थितीचा सहा पानी अहवाल ठेवला. नरसिंह राव यांनी तो अहवाल पाहिला आणि नरेश चंद्रांना विचारले, देशाची आर्थिक परिस्थिती इतकी बिघडली आहे? नरेश चंद्रा म्हणाले, 'बिघडलेली नाही तर ती रसातळाकडे निघाली आहे...'

अशा द्विधा मन:स्थितीत नरसिंह राव यांचे निकटवर्तीय असलेले पीसी अलेक्झांडर यांच्याकडे नव्या अर्थमंत्र्याचा दावेदार शोधण्याचे काम देण्यात आले. अलेक्झांडर यांनी डॉ. मनमोहन सिंग यांना दूरध्वनी करून अर्थमंत्रिपद स्वीकाराल का असे विचारले.. त्याला डॉ. सिंग यांनी होकार दिला.

अर्थमंत्रिपदाचा शपथविधी झाल्यानंतर पहिल्या दिवशीच डॉ. मनमोहनसिंग आपल्या कामास लागले. पहिले दोन दिवस त्यांनी घरातून काम केले. तिसऱ्या दिवशी अर्थमंत्रालयात जाऊन पत्रकार परिषद घेतली. या पत्रकार परिषदेत त्यांनी आपल्या आर्थिक धोरणाचे उद्देश स्पष्ट केले. दुसऱ्या दिवशी नरसिंह राव व डॉ. सिंग यांच्यात एक भेट झाली. या भेटीत डॉ. सिंग यांनी सांगितले, की 'देशाला ५ अब्ज डॉलरची नितांत गरज असून त्यासाठी आयएमएफची मदत घेतली पाहिजे.' नरसिंह राव यांनी त्यांना हिरवा कंदील दाखवला.

डॉ. सिंग यांना देशाच्या क्षमतांचे अचूक भान होते. एवढ्या प्रचंड विशाल आकाराच्या खंडप्राय देशात ४० टक्क्यांहून अधिक जनता गरिबीच्या खाईत जगत होती. अनेक राजकीय वावटळींतून देश जात असताना या देशाला स्थिर सरकार, स्थिर आर्थिक धोरण कोण देईल हा प्रश्न जनतेतून विचारला जात होता. हरितक्रांतीमुळे देशापुढील अन्नाचा प्रश्न सुटला होता, पण रोजगार व आर्थिक संधी नसल्याने तरुणांमध्ये प्रचंड असंतोष होता. राजीव गांधी यांनी कॉम्प्युटर क्रांतीची बीजे रुजवली असली तरी त्याला असणारा राजकीय विरोध पराकोटीचा होता. बँका, विमा कंपन्या, सरकारी कार्यालये, शाळा, कारखाने, नोकरशाही कॉम्प्युटरमुळे बेरोजगारीची वेळ आली असल्याची भूमिका घेत वेळोवेळी संपाचे हत्यार उपसत असत. १९९०च्या दशकातील मंडल आयोगाच्या आंदोलनाने जातींच्या अस्मिता उफाळून आल्या होत्या. काशीराम, मायावती, नितीशकुमार, मुलायमसिंग, लालूप्रसाद यादव, नवीन पटनाईक, जयललिता यांचा देशाच्या राजकारणात उदय होत होता. प्रांतवाद हे या प्रत्येकाचे राजकीय भाष्य होते. यातील एकही पक्ष आर्थिक सुधारणांची चर्चा करत नव्हता. सत्ता आणि सत्तेच्या माध्यमातून आपल्या विशिष्ट जातींचे कल्याण एवढ्या मर्यादित कक्षेत देशभरातील राजकारण फिरत होते.

यात ६ डिसेंबर १९९२ रोजी अयोध्येतील बाबरी मशीद पाडल्याने देशामध्ये ध्रुवीकरणाची जबरदस्त लाट निर्माण झाली होती. धार्मिक उन्मादाला वेसण घालावे अशी राजकीय इच्छाशक्तीही त्यावेळी दिसत नव्हती. अर्थव्यवस्थेवर मळभ दाटून आले होते. सरकार नामक संस्थेच्या जाचातून देशी उद्योगांची कोंडी होत होती. कृषी, रिअल इस्टेट, शिक्षण, सार्वजनिक उद्योग, औषध उद्योग, टेलिकॉम, आयटी उद्योग यांच्यावर सरकारी नियंत्रणे होती. या नियंत्रण परमिट राजमुळे अर्थव्यवस्थेत आर्थिक संधी निर्माण होत नव्हत्या.

हा सगळा आर्थिक कॅनव्हास डॉ. मनमोहनसिंग यांनी

जवळून पाहिला होता. देशाच्या अर्थव्यवस्थेत नेमक्या काय सुधारणा आणायच्या याचा आराखडा त्यांना माहीत होता. आणि यातून त्यांनी १९९१ मध्ये आर्थिक सुधारणा कार्यक्रम टप्प्याटप्प्याने हाती घेतला. पहिल्या अर्थसंकल्पात डॉ. सिंग यांनी खतांची सबसिडी मोठ्या प्रमाणात कमी केली होती. सार्वजनिक उद्योगांना दिली जाणारी आर्थिक मदत कमी करण्यात आली होती. कल्याणकारी कार्यक्रमांना कात्री लावण्यात आली होती. पुढची पाच वर्षे तर देशाचा चेहरामोहरा बदलणारी आर्थिक धोरणे होती.

१९९१मध्ये नव्या औद्योगिक धोरणांतर्गत सुरक्षा व सामरिक क्षेत्रे वगळत्या सर्व उद्योगांच्या परवानापद्धतीत शिथिलकरण आणले गेले. मक्तेदारी कायदा मागे घेऊन नव्या उद्योगांसाठी प्रोत्साहन दिले. देशातील १८ प्रमुख उद्योगांना परवाने बंधनकारक ठेवले. रुपयाचे २० टक्क्यांनी अवमूल्यन केले. टेलिकॉम उपकरण निर्मिती उद्योग परवानारहित केले. (भारताच्या टेलिकॉम क्रांतीचे हे बीज होते). १९४८च्या वीज (वितरण) कायद्यात दुरुस्त्या केल्या. १९९२मध्ये देशातील खासगी उद्योजकांसाठी रेडिओ पेजिंग, मोबाइल, टेलिफोन सेवा गुंतवणुकीसाठी खुल्या केल्या. २००० मेगावॉट क्षमतेच्या एन्रॉन वीज प्रकल्पाला मंजुरी दिली. (हा प्रकल्प पुढे शिवसेना-भाजपा युतीने गुंडाळला.) १९९३मध्ये राष्ट्रीय खनिज धोरणाची घोषणा केली. १९९४मध्ये राष्ट्रीय दूरसंपर्क धोरणाची घोषणा करून देशातील मेट्रो शहरांमधील मोबाइल सेवा खासगी उद्योजकांसाठी खुली केली. देशातील हवाई वाहतूक क्षेत्रात खासगी उद्योजकांच्या गुंतवणुकीस हिरवा कंदील दाखवला. १९९५मध्ये देशातील १९ सर्कलमध्ये मोबाइल सेवा देण्यास मंजुरी दिली. एक हजार मेगावॉट क्षमतेच्या पुढील वीज प्रकल्पांसाठी नवे वीज धोरण मांडण्यात आले. एअर पोर्ट अथॉरिटीची स्थापना करण्यात आली. १९९६मध्ये हवाई मार्गाने मालवाहतूक करण्यास खासगी व्यवसायांना मोकळीक देण्यात आली.

या पाच वर्षांच्या आर्थिक सुधारणा कार्यक्रमाने देशात आमूलाग्र बदल झाले. यातून मोठ्या आकाराचा मध्यमवर्ग जन्मास आला.

डॉ. मनमोहनसिंग यांनी अर्थव्यवस्थेचे नेपथ्य संपूर्णपणे बदलले होते व या नेपथ्यात रंगरोटी बदलण्याखेरीज वाजपेयी सरकारने फारसे आमूलाग्र बदल केले नसल्याने २००४ मध्ये काँग्रेस निवडून आल्याने त्यांना मागील सरकारचे निर्णय बदलावे लागले नाहीत. देशाच्या आर्थिक प्रगतीचा विचार डॉ. मनमोहनसिंग आणि काँग्रेस अध्यक्ष सोनिया गांधींच्या मनात बराचसा एकसारखा होता. सरकारी नियंत्रण असलेले अर्थकारण सोनियांनाही पसंत नव्हते. बाजारपेठीय अर्थशास्त्र काळजीपूर्वक हाताळले तर वंचित घटकापासून देशातल्या सुखवस्तूंपर्यंत सर्वांनाच विविध प्रकारचे लाभ मिळू शकतात, अशी सोनियांना खात्री पटली होती. बदलत्या जागतिक व्यवस्थेत भारतात मूलगामी आर्थिक सुधारणांची गरज आहे, हे सोनियांना पटले होते. त्यामुळेच डॉ. मनमोहनसिंग यांचे आर्थिक सुधारणांचे पर्व चालू ठेवून देशात अधिक उदारीकरण कसे वेगाने करता येईल, ही भूमिका देशाच्या उद्योगक्षेत्रातल्या कर्णधारांना आणि विशाल मध्यमवर्गाला समजावून सांगणे सोनियांना कठीण गेले नाही. डॉ. मनमोहनसिंग यांनीही स्पष्ट केले, की आपले सरकार शेअर बाजारातल्या सेन्सेक्सच्या तालावर नाचणार नाही तर उद्योगक्षेत्राला आणि उद्योजकांना अनुकूल व पूरक ठरणाऱ्या धोरणांचा पारदर्शी पद्धतीने पुरस्कार करत राहील.

त्यामुळे २००४ साली आघाडी सरकार सत्तेवर आल्यानंतर प्रचंड राजकीय विरोध स्वीकारून डॉ. मनमोहनसिंग यांनी 'आम आदमी'च्या जगण्याला बळ देणारे माहिती अधिकार, मनरेगा आणले. भारत-अमेरिका अणुकरार घडवून आणला, तर आपल्या पंतप्रधानपदाच्या दुसऱ्या कारकिर्दीत त्यांनी आधार, अन्नसुरक्षा, लोकपाल, कॅश ऑन ट्रान्सफर, शेतकर्यांना कर्जमाफी, भूसंपादन कायदा, रिटेल क्षेत्रात एफडीआय यासारखे देशाच्या विकासप्रक्रियेत दूरगामी बदल घडवणारे महत्त्वाचे कायदे संसदेत संमत करून घेतले. त्यांच्या प्रत्यक्ष राजकारणातल्या या २० वर्षांच्या प्रदीर्घ प्रवासात भारत केवळ स्वावलंबी झाला नाही तर क्रयशक्तीवर आधारित जगातली तिसऱ्या क्रमांकाची आर्थिक महासत्ता म्हणून उदयास आला. हे सर्व कायदे पुढे सत्तेवर आलेल्या मोदी सरकारला बदलता आले नाही. उलट डॉ. मनमोहनसिंग यांच्या सर्व योजनांची नावे बदलून मोदी सरकारने स्वतःची पाठ थोपटण्याचे काम केले.

भारताचा पंतप्रधान हा नेहमीच त्याच्या जवळच्या नातेवाईकांमुळे चर्चेत राहिला आहे. डॉ. सिंग यांच्या ४० वर्षांच्या एकूण कारकिर्दीत व पंतप्रधानपदाच्या १० वर्षांत त्यांच्या घरातील एकही व्यक्ती कधी मीडियापुढे आलेली नाही किंवा त्यांचे कुटुंबीय सार्वजनिक कार्यक्रमात फारसे सक्रिय राहिलेले नाहीत. त्यांची मुलगी सांगते, की 'आमचे वडील आयुष्यभर नेहमीच कामात मग्न राहिले. गेल्या ४० वर्षांत त्यांनी फक्त तीन दिवस नैनितालला आपल्या कुटुंबासमवेत सैर केली. परंतु आमच्या वाढदिवसांना न ते चुकता पुस्तके भेट देतात.' हा शिरस्ता त्यांनी शेवटपर्यंत कायम ठेवला होता.

जेव्हा केव्हा डॉ. मनमोहनसिंग परदेश दौऱ्यावर गेले होते तेव्हा त्यांना देण्यात आलेल्या सर्व वस्तू त्यांनी सरकारजमा केल्या होत्या. परंतु डॉ. सिंग यांना टी कप्स, सॉसर व पॉट्स यांची आवड होती. त्यांची आवड व्यक्तिशः नाही तर त्यांची पत्नी गुरुशरणकौर यांची होती. जुलै २०१३ पासून अखेरपर्यंत त्यांना मिळालेल्या सुमारे ४४ वस्तूंपैकी ३८ वस्तू त्यांनी

तोषखानाकडे सुपूर्द केल्या आहेत. या वस्तूंमध्ये ९ लाख रुपयांचे रोलॅक्स कंपनीचे घड्याळ, सव्वा लाख रुपयांचा ज्वेलरी सेट, ३५ हजार रुपयांचे ब्रेसलेट व रशियाचे अध्यक्ष व्लादिमिर पुतीन यांनी त्यांना दिलेले मुघल काळातील नाणे आहे. ज्या वस्तू त्यांनी आपल्यापाशी ठेवल्या आहेत तो टी सेट आहे. या टी सेटची किंमत ५ हजार रुपयांखाली आहे. सरकारी नियमांनुसार पाच हजार रुपयांवरील किमतीच्या मिळालेल्या भेटवस्तू सरकार जमा कराव्या लागतात. अमेरिकेचे अध्यक्ष बराक ओबामा यांनी व्हाइट हाउसमध्ये २००९मध्ये डॉ. मनमोहनसिंग यांच्या सन्मानार्थ भोजन ठेवले होते ते सर्वात महागडे होते. या अमेरिका भेटीत डॉ. सिंग यांनी ओबामा यांना पाच पुस्तके भेट दिली. त्यामध्ये 'पंचतंत्रा'चा इंग्रजी अनुवाद आहे. तसेच, बराक ओबामा यांची पत्नी मिशेल यांना पश्मिना शाल त्यांनी दिली. डॉ. सिंग यांच्या भिडस्त स्वभावामुळे त्यांच्या आवडीनिवडीविषयी फारशी माहिती कुणालाच नसे. २००९मध्ये जी-२० शिखर परिषदेच्या निमित्ताने ते रशियाच्या भेटीवर आले असताना त्यांना कोणती भेटवस्तू द्यायची याची चर्चा राजनैतिक अधिकाऱ्यांच्या वर्तुळात चालली होती तेव्हा कोणीतरी सांगितले की डॉ. मनमोहनसिंग यांना टी सेट आवडतो. त्यावेळी मिशेल ओबामा यांनी गुरशरणकौर यांना पोर्सलेनचा टी सेट भेट दिला. मे २०११मध्ये जर्मनीच्या चॅन्सलर अँजेला मर्केल या भारत भेटीवर आल्या होत्या. तेव्हा त्यांनी मेसियन टी सेट सिंग दाम्पत्याला भेट म्हणून दिला. २०११मध्ये मिळालेल्या ५० भेटवस्तूंपैकी दोन वस्तू त्यांनी स्वतःजवळ ठेवल्या व उरलेल्या सरकार जमा केल्या.

डॉ. सिंग यांची एकूण कारकीर्द ही अनेक राजकीय वादळांचा सामना करणारी होती. परंतु या संपूर्ण प्रवासात त्यांचा शांत, संयमी, मितभाषी, सुसंस्कृत स्वभाव एकदाही विचलित झाला नाही. त्यांची १६ तासांची काम करण्याची दिनचर्या ते निवृत्त होईपर्यंत कायम होती. पंतप्रधानपदाची जबाबदारी, शान, प्रतिष्ठा याबाबत त्यांनी कुठेही तडजोड केली नाही. एक विलक्षण मानसिक सामर्थ्य त्यांच्यापाशी होते. 'एकला चालो रे'च्या विरक्त भूमिकेतून त्यांनी त्यांचे कार्य कर्मवादी वृत्तीने अखेरपर्यंत केले.

**– सुजय शास्त्री** (मुक्त पत्रकार)
sujayshastri@gmail.com


प्रस्तुत लेखकाचे 'डॉ. मनमोहनसिंग – एक वादळी पर्व' हे पुस्तक ग्रंथालीने २०१४ साली प्रसिद्ध केले आहे.

॥ग्रंथाली॥

## वाचकदिनी अरुण पुराणिक यांची प्रसिद्ध झालेली पुस्तके



मूल्य ४०० रुपये
सवलतीत २४० रुपये



मूल्य ३०० रुपये
सवलतीत १८० रुपये



मूल्य ३०० रुपये
सवलतीत १८० रुपये



मूल्य १२०० रुपये
सवलतीत ७२० रुपये

## पाणबुडी कुरसुरा व मी

विनायक महादेव पाटील




आत्मकथन

मूल्य २५० रुपये
सवलतीत १५० रुपये



# प्रत्येक क्षण समृद्ध करणारा कलाकार!

**आशय गुणे**

भारतीय शास्त्रीय संगीताची बैठक व एकूण मांडणी ही प्रक्रियासंपन्न आहे. अर्थात, मैफलीचा शेवट (जो 'धीम्या गतीने द्रुत लयीकडे' या मार्गाने जातो) कितीही आकर्षक व कळस गाठणारा वाटला तरीही तिथपर्यंत पोहोचण्याच्या प्रक्रियेला जास्त महत्त्व असतं. याचा अर्थ आपल्या सादरीकरणाला लागलेल्या एकूण वेळेला महत्त्व नसून त्यातील प्रत्येक क्षण हा श्रोत्यांना समृद्ध करणारा व त्यांना सौंदर्याची अनुभूती देणारा असला पाहिजे. त्यामुळे कलाकाराचा दर्जा हा त्याच्या/तिच्या पहिल्या षड्जापासून प्रदर्शित होतो (तालवादक असल्यास पहिल्या बोलापासून) यात कोणतीही आतिशयोक्ती नाही. जे कलाकार श्रोत्यांचा प्रत्येक क्षण समृद्ध करतात व ते करताना स्वतः प्रत्येक क्षणात अगदी स्वतःला व्यापून टाकतात ते खऱ्या अर्थाने महान ठरतात. या पातळीवर पोचलेल्या काही मोजक्या कलाकारांमध्ये उस्ताद झाकीर हुसेन यांचं नाव घ्यावं लागेल.

प्रत्येक क्षणात स्वतःला गुंतवून ठेवून त्यास समृद्ध करण्याच्या या प्रक्रियेत समोर बसलेल्या प्रेक्षकांना पुढल्या क्षणी आपल्यासमोर काय सादर होणार आहे याची जराही कल्पना नसते. त्यामुळे प्रत्येक नवीन क्षण हा आश्चर्यचकित करणारा ठरतो. हा क्षणाक्षणाला आश्चर्य प्रकट करण्याच्या प्रक्रियेला चमत्काराचे बिरुद लावले जाते. काही लोक त्याला देवत्वही म्हणतात. शिवाय कलाकार ही स्थिती गाठतो तेव्हा कदाचित त्याला/तिलाही आपल्या मनात नेमके कोणते विचार आहेत याचा विसर पडतो. आपण आता जे गायलं किंवा वाजवलं त्या क्षणानंतर दुसऱ्या क्षणात प्रवेश होतो तेव्हा जी स्वरसंगती (किंवा तालवाद्य असल्यास बोलांचा संच) कलाकाराच्या मनातून प्रकट होते ती बऱ्याचदा त्यांनाही आश्चर्यचकित करून जाते.

संबंधित कलाकाराला स्वतःच आपल्या कलाकृतीचं आश्चर्य वाटत असेल तर मग हे कुणीतरी घडवून आणत आहे ही भावना येणं साहजिक आहे. उस्ताद झाकीर हुसेन यांची मैफल मी जेव्हा जेव्हा अनुभवली आहे, मग ती स्वतंत्र तबला वादनाची असो किंवा गायक, वादक अथवा नृत्य यांना साथ करणारी असो, त्यात मला हाच अनुभव व हीच अनुभूती आली आहे. अविरत सर्जनशीलता व त्यातही जवळजवळ प्रत्येक क्षणात अनुभवता येणारी उत्स्फूर्तता हे उस्ताद झाकीर हुसेन यांच्या तबलावादनाचं आणि एकूण त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचं वर्णन ठरतं.



**उस्ताद झाकीर हुसेन**

शिवाय प्रत्येक क्षण साजरा करणारा कलाकार हा वर्तमानात जगतो. अगदी वर्तमानाच्या केंद्रबिंदूत! अशा स्थितीत ना भूतकाळाचा लवाजमा असतो, ना भविष्यातील परिणामाची चिंता. अगदी मागच्या क्षणाचाही भूतकाळ मागे टाकलेला असतो, त्यामुळे पुढील क्षणाचे कुतूहल सदैव जिवंत! म्हणूनच चिंताविरहित तारुण्य अबाधित. झाकीर हुसेन हे चिरतरुण, सदैव उत्सुक आणि उत्स्फूर्त स्वरूपाची नवनिर्मिती करणारे कसे राहिले याचं उत्तर त्यांच्या वादनाकडे व आयुष्याकडे बघण्याच्या दृष्टिकोनातून समोर येतं.

त्यांनी तबलावादनात केलेले असंख्य प्रयोग, प्रत्येक वेळेस त्यांच्याकडून घडून गेलेली नव्या स्वरूपाची मांडणी

आणि तरीही प्रत्येक कार्यक्रमाला नव्यानं सामोरं जाण्याचं त्यांचं कसब याचं मूळ याच दृष्टिकोनात आढळते.

पं. अरविंद पारीख यांच्या घरी झालेल्या एका बैठकीत (यूट्यूबवर उपलब्ध) पं. योगेश सम्सी हे उस्ताद झाकीर हुसेन यांच्या तबलावादनात म्हणाले आहेत, की त्यांनी कलेतील नवनिर्मितीची इतकी मोठी पातळी गाठली की त्यांच्या सर्जनशीलतेला वाद्याचीही मर्यादा जाणवू लागली! या एका ओळीत उस्ताद झाकीर हुसेन यांच्या जीवनाचं सार मांडलं गेलं तर आश्चर्य वाटायला नको.

अगदी बडे गुलामअली खां व ज्येष्ठ डागरबंधू यांच्यापासून सुरू होऊन भीमसेन जोशी, जसराज, मलिकार्जुन मन्सूर यांच्यासारखे गायक, रवी शंकर, अली अकबर खां, विलायत खां, शिवकुमार शर्मा, हरिप्रसाद चौरासिया, अमजद अली खां यांच्यासारखे वादक व त्यांची पुढली पिढी, अनुप जलोटा, हरिहरन, शंकर महादेवन यांच्यासारखे कलाकार ते अगदी आताच्या काळातील राहुल देशपांडे, मंजुषा पाटील यांच्याबरोबर झाकीरभाईंचा तबला केवळ वाजला नाही तर तो त्यांच्या शैलीत एकरूप झाला. या शैली एकमेकांपासून इतक्या भिन्न आहेत, तरीही या सर्वांचं झाकीरभाईंवर प्रेम का होतं याचं उत्तर या प्रत्येक क्षणात नवनिर्मिती करण्याच्या कौशल्यात आहे. मी अनेकदा पं. शिवकुमार शर्मा यांच्यासारख्या महान कलाकाराला झाकीरभाईंच्या उत्स्फूर्त वादनामुळे आश्चर्यचकित होताना पाहिलेलं आहे.

अगदी हीच अनुभूती त्यांच्या आंतरराष्ट्रीय पातळीवर अनेक गाजलेल्या कलाकारांबरोबर तबला वाजवताना आपल्याला आली. रिमेम्बर शक्ती, प्लॅनेट ड्रम, तबला बिट सायन्स आणि अगदी मागच्यावर्षी मिलेल्या ग्रॅमी पारितोषिक मिळालेल्या 'ॲज वी स्पीक' या कलाकृतीतून झाकीर हुसेन यांना वगळलं तर त्या अजिबात उठून दिसल्या नसत्या. अगदी शेवटपर्यंत या प्रस्तुतींमध्ये झाकीर हुसेन हेच मुख्य आकर्षण ठरले आणि (इंटरनेट साक्षी आहे) सादरीकरणात झाकीर हुसेन यांचा तबला प्रत्येक वेळेस नव्या रूपात वाजला.

हीच नवनिर्मिती करताना घराण्याची चौकट मोडली गेली. पारंपरिक तबलावादनात झाकीरभाईंनी, ते स्वतः पंजाब घराण्याचे वादक असले तरीही, सर्व घराण्यांच्या रचना आपल्या सादरीकारणाद्वारे श्रोत्यांसमोर ठेवल्या. परंतु जवळजवळ साठ वर्षं तबलावादन करूनही त्यांची लय जराही हलली नाही. वय वाढतं तशी वादनाची लय घट्ट रोवून ठेवण्यात मर्यादा येतात. बोल अस्पष्ट उमटायची भीती असते. ही प्रक्रिया कलाकाराला अतिशय निराश करून सोडते.

मात्र यावर्षी ११ ऑगस्ट या तारखेला मुंबईच्या यशवंतराव चव्हाण सेंटरला गुरुपौर्णिमेनिमित्त झालेल्या कार्यक्रमात झाकीरभाईंचं स्वतंत्र तबलावादन ऐकायची संधी मिळाली. त्र्याहत्तराव्या वर्षी उस्तादांची लय अगदी स्थिर होती. त्यात कोणताही कंप नव्हता. तबल्याचे बोलही अगदी स्पष्ट उमटत होते. आणि प्रत्येक क्षणाला श्रोत्यांना चकित करण्याची सवयही अबाधित होती. पुढल्या वर्षी गुरुपौर्णिमेच्या निमित्तानं दिल्लीहून खास मुंबईत येऊ असं मनात ठरवून मी सभागृहाबाहेर पडलो. आता ही संधी कधीही मिळणार नाही.

त्याच कार्यक्रमात श्रोत्यांनी व तिथे उपस्थित प्रस्थापित तबलावादकांनी केलेल्या सत्काराला उत्तर देताना झाकीरभाई म्हणाले होते, मी अजून शिकत आहे. प्रत्येक दिवस हा काहीतरी नवीन शिकण्याचा असतो. मला सगळं माहीत आहे असं काही नसतं. माझी सुरुवात शिष्य बनून झाली होती आणि मी जाईनही शिष्य म्हणून. मी गेल्यावर कुणी काही बोलेल तर ती वेगळी गोष्ट आहे.

या कार्यक्रमात शशी व्यास यांनी उस्तादजींबद्दल सांगितलेला किस्सा इथे सांगायची गरज आहे. माझ्या मते प्रत्येक क्षण जगण्याची दुसरी बाजू इथे अधोरेखित होते. संगीताचा प्रचार व्हावा म्हणून झाकीरभाईंचा महाराष्ट्रदौरा सुरू होता. एका कार्यक्रमानंतर झाकीरभाईंनी शशीजींकडे त्यांच्या वादनाच्या रेकॉर्डिंगची विनंती केली. संबंधित कार्यक्रम इतका रंगला होता की झाकीरभाईंना तो पुन्हा ऐकावासा वाटला. रेकॉर्डिंगची अशी विनंती त्यांनी याआधी कोणत्याही कार्यक्रमाच्या वेळेस नव्हती केली. परंतु दुर्दैव असं की काही अडचणींमुळे त्या कार्यक्रमाच्या ठिकाणी रेकॉर्डिंगचं मशीन वेळेवर पोहोचू शकलं नव्हतं आणि नेमकं त्याच कार्यक्रमाचं रेकॉर्डिंग होऊ शकलं नाही. आयोजकांनी घाबरतच ही गोष्ट झाकीरभाईंना सांगितली. त्यावर ते एवढंच म्हणाले, माझा हा कार्यक्रम मी पुन्हा ऐकावा हे खुदाला मंजूर नव्हतं, आणि पुढल्या कार्यक्रमासाठी सज्ज झाले. याचा अर्थ प्रत्येक क्षण जगणं महत्त्वाचं तसं त्यातून बाहेर निघणंही तितकंच गरजेचं!

इंग्रजीत सांगायचं तर living the moment आणि leaving the moment. झाकीरभाईंकडे हे दोन्ही होतं हे त्यांच्या वादनात दिसून आलं. प्रत्येक क्षण जगणं आणि त्या क्षणातून बाहेर पडून पुढील क्षणात प्रवेश करणं हेच या सर्जनशीलतेचं सार आहे.

उद्यापासून 'झाकीर हुसेन आपल्यात नाहीत' हे पचवणं कठीण जाणार आहे. हा आघात सहन होणारा नाही. आता तर संगीताच्या मोसमाची सुरुवात झाली आहे जो फेब्रुवारीपर्यंत चालेल. तिथे झाकीरभाईंची उणीव भासेल. त्यांच्या असंख्य मुलाखती, रेकॉर्डिंग यांना लोक भेट देतील. परंतु ते नाहीत हे मनाला पटणार नाही.

आता वेळेचं ओझं सतत जाणवणार. कारण तिचं अस्तित्व जाणवू न देण्याचं वरदान प्राप्त झालेला कलाकार आज आपल्यात नाही. आता हृदयाचे फक्त ठोके. ठेका नाही!

**– आशय गुणे**
gune.aashay@gmail.com



# द हाउंड ऑफ द बास्करव्हिल
# सर आर्थर कॉनन डॉयल

## The Hound of The Baskervilles by Sir Arthur Conan Doyle

**राजीव श्रीखंडे**

Sir Arthur Canon Doyle ही आपल्या लेखणीतून जगद्विख्यात Sherlock Holmes ला जन्म देणारी, व्यवसायानं डॉक्टर असलेली एक प्रख्यात स्कॉटिश लेखक, पत्रकार आणि अतिशय लोकमान्य व्यक्ती! त्याचा जन्म मे १८५९मध्ये एडिंबरा इथं एका आयरिश कॅथलिक कुटुंबात झाला. वडील चार्ल्स कलावंत म्हणून काहीसे प्रसिद्ध, पण मद्यपी आणि तऱ्हेवाईक असल्यामुळे विशेष काहीच न करणारे होते. आई मेरी मात्र आनंदी स्वभावाची, उत्साही आणि वाचनाची मनस्वी आवड असणारी होती. ऑर्थर त्यांच्या दहा मुलांमधला दुसरा मुलगा. वडिलांच्या वागण्यानं घरात सुसंवादाचा अभावच होता आणि त्यामुळं ऑर्थरची पहिली ८ वर्षं तशी हालातच गेली. पुढे, कुटुंबातील अन्य सुखवस्तू लोकांच्या पुढाकारानं ऑर्थरनं वयाच्या ९व्या वर्षी इंग्लंडमधील Lancashire परगण्यातील Stonyhurst इथं एका Jesuit शिक्षणसंस्थेमध्ये प्रवेश केला. तिथं त्यानं वयाच्या १६व्या वर्षांपर्यंत शिक्षण घेतलं. त्याला १८७६मध्ये पदवी मिळाली. या सर्व काळात त्याला आनंद व्हायचा तो त्याला आईच्या नियमित येणाऱ्या पत्रांचा, त्याला अतिशय आवडणाऱ्या क्रिकेट या खेळाचा! सहविद्यार्थ्यांना तो विनोदी गोष्टी सांगत असे आणि त्यातही त्याला आनंद मिळायचा.

संपूर्ण डॉयल कुटुंबाच्या परंपरेप्रमाणे ऑर्थरनं पुढील शिक्षणासाठी एखाद्या कलेचा मार्ग स्वीकारणं अपेक्षित होतं. परंतु ऑर्थरनं एडिंबरा विद्यापीठात डॉक्टरकीचा अभ्यास करण्याचा निर्णय घेतला. सुदैवानं तिथं त्याला J. M. Barrie, R. L. Stevenson भेटले. जे डॉक्टर व्हावं म्हणून शिकत होते. पुढं ते ख्यातनाम लेखक झाले. तिथंच त्याला त्याचे प्राध्यापक डॉ. जोसेफ बेल भेटले. तीक्ष्ण निरीक्षणशक्ती, त्यातून निर्माण होणाऱ्या विविध शक्यतांचं आकलन, त्यांच्या अभ्यासानंतर विशिष्ट बाबतीतील अचूक निदान आणि शेवटी आवश्यक, योग्य उपाय यामध्ये तज्ज्ञ असलेले डॉ. बेल हेच पुढे जणू ऑर्थरचे Sherlock Holmes ठरले.

१८७६ ते १८८१ या ५ वर्षांत डॉयलनं वैद्यकीय शिक्षणक्रम पुरा करून Bachelor of Medicine  Master of Surgery (M.B.C.M.) ही पदवी घेतली. हे शिक्षण खंडित झालं नाही तरी ते सरळ, सुरक्षित, सामान्य पद्धतीनं झालं असंही नाही.

डॉयलचं शिक्षण चालू असतानाच आपण काहीतरी लिहावं अशी तीव्र इच्छा त्याच्या मनात निर्माण झाली. त्याप्रमाणं त्यानं 'The haunted range of Goresthrope' ही लघुकथा लिहिली पण ती प्रसिद्ध झाली नाही. नंतर सप्टेंबर १८७९मध्ये त्यानं 'The Mystery of Sasassa Valley' ही लघुकथा लिहिली आणि ज्या मासिकानं Thomas Hardyचं पहिलं पुस्तक प्रकाशित केलं होतं त्या Chambers Journal या एडिंबराच्या मासिकानं ही कथा प्रकाशित केली. त्यानंतर त्यानं 'Gessemoten as a Poison' ही आपल्या शैक्षणिक क्षेत्राशी संबंधित कथा लिहिली. विशेष म्हणजे २१व्या शतकातील एक खून प्रकरण उकलण्यात या गोष्टीचा उपयोग झाला असं म्हटलं जातं. याच वर्षी त्यानं 'The American Tale' ही कथा लिहिली आणि ती London Societyमध्ये प्रकाशित झाली.

याच मधल्या काळात म्हणजे कॉलेजच्या तिसऱ्या वर्षात शिकत असतानाच त्याला व्हेल मासेमारीसाठी Arctic Circleला जाणाऱ्या बोटीवर सर्जन म्हणून जाण्याची संधी मिळाली. या अनुभवाचा त्याला चांगलाच फायदा झाला.

पदवी घेतल्यानंतर कॉनन डॉयलनं पहिलीच नोकरी घेतली ती Mayumba या बोटीवर, त्या बोटीचा वैद्यकीय अधिकारी म्हणून. ही बोट लिव्हरपूल आणि दक्षिण आफ्रिका अशी ये-जा करायची. त्याला ही नोकरी काही पसंत पडली नाही आणि एकाच प्रवासानंतर त्यानं ती सोडून दिली. नंतर त्यानं

Plymouth इथं एका डॉक्टरबरोबर भागीदारीत व्यवसाय सुरू केला. त्यात त्याला अतिशय वाईट अनुभव आल्यानं तो लगेच वेगळा झाला आणि त्यानं Southseeमध्ये स्वतंत्र व्यवसाय सुरू केला. पहिली दोन वर्षं फारच वाईट गेली, पण कठोर परिश्रम आणि कनवाळू स्वभाव यामुळं नंतर त्याचा जम बसू लागला.


पुढे १८८५मध्ये डॉयलनं Doctor of Medicine म्हणजेच M.D. ही पदवी मिळवली. त्याच वर्षी त्यानं Louisa Hawkins हिच्याशी  लग्न केलं. ती त्याच्या एका रुग्णाची बहीण होती.

अगदी लहानपणापासून असलेली आपली लिहिण्याची हौस पुढं चालू ठेवण्यासाठी कॉननं व्यवसायाबरोबर लेखनालाही सुरुवात केली. त्यानं मार्च १८८६मध्ये 'Tangled Skein' ही कादंबरी लिहिली. पण, ती प्रसिद्ध केली नाही. तीत Sheridon hope आणि Ormond Saeker ही महत्त्वाची दोन पात्रं होती. हीच कादंबरी पुढं दोन वर्षांनी Sherlock Holmes आणि Dr. Watson या व्यक्तिरेखा असलेली 'Study in Scarlet' या नावानं प्रसिद्ध झाली. कॉनन डॉयलला नंतर जी अतिशय लोकप्रिय लेखक म्हणून जगभर कीर्ती मिळाली त्याचा हा प्रारंभ होता. त्याचे कॉलेजमधील प्राध्यापक डॉ. बेल यांच्या बऱ्याच लकबी आपल्याला Sherlock Holmesमध्ये सापडतात. गंमत म्हणजे कॉनन डॉयलनं नंतर एका पत्राद्वारं डॉ. बेल यांना हे कळवलं होतं. Dr. Watson हे नाव त्यानं आपल्या Portsmouthमधील Dr. James Watson या सहकाऱ्याच्या नावावरून घेतलं होतं.

या कादंबरीनंतर त्याला एखादी गंभीर कादंबरी लिहावीशी वाटली. त्याप्रमाणं त्यानं १८८९मध्ये Micah Clarke ही एक ऐतिहासिक कादंबरी लिहिली. यानंतर Joseph Marshall Stoddart या Lippincott's Monthly Magazine या एका अमेरिकन मासिकाच्या संपादकानं कॉनन डॉयल आणि ऑस्कर वाईल्ड (Oscar Wilde) या दोघांना लंडनमध्ये जेवणासाठी बोलावून त्यांना पुस्तकं लिहायची विनंती केली. कॉनन डॉयलनं पुढं आपल्या आत्मचरित्रात या दिवसाचा उल्लेख 'सुवर्णदिन' असा केला आहे आणि म्हणून फेब्रुवारी १८९०मध्ये 'The Sign of Four' ही शेरलॉक होम्स आणि डॉ. वॉटसन असलेली दुसरी कादंबरी लंडन आणि फिलाडेल्फिया इथे प्रसिद्ध झाली

१८९० पासून Strand मासिकात Sherlock Holmesच्या कथा येण्यास सुरुवात झाली आणि लगेचच या कथांनी सगळ्या इंग्लंड आणि मग युरोप, अमेरिका सगळ्या पाश्चात्त्य जगावरच विलक्षण मोहिनी टाकली. शेरलॉक होम्सची कथा असलेलं हे मासिक लगोलग खपलं जायचं.

वस्तुतः सर्वच आघाड्यांवर व्यवस्थित जम बसत चालला असताना कोणीही माणूस समाधानी असावा ही रास्त अपेक्षा. परंतु कॉनन डॉयल त्याला अपवाद! तो १८९१मध्ये नेत्रचिकित्सा (Opthalmology) हा विषय शिकण्यासाठी व्हिएन्ना इथं गेला. परंतु जर्मन भाषा समजण्यास त्याला फार त्रास झाला म्हणून त्यानं ते शिक्षण अर्धवट सोडलं. मग तो व्हेनिस, मिलान, पॅरिस असा प्रवास करून इंग्लंडला परत आला. लगेच नंतर तो आपला वैद्यकीय व्यवसाय आणि विशेषतः लेखन यात गुंतून गेला.





**सर आर्थर कॉनन डॉयल**

लेखनाच्या बाबतीत कॉनन डॉयलच्या मनात अनेक विचार सतत घोळत होते आणि हे स्वाभाविकच होतं. त्याची खरी ओढ होती इतिहासासारख्या गंभीर विषयाच्या अभ्यासाकडे! अर्थात स्वतःचे व्यावसायिक अनुभव, परलोकविद्यावादामध्ये (Spirituality) पहिल्यापासूनच असलेला रस हे अन्य विषय मनात होतेच. परंतु त्यानंच निर्माण केलेल्या Sherlock Holmes या कल्पित सल्लागार गुप्तहेरावर (Consulting Detective) लिहिलेल्या कथांची लोकप्रियता इतक्या वरच्या स्तरावर पोचली होती की काही विचारू नका.

त्यामुळं गुन्ह्याच्या अन्वेषणकथा हा एक प्रमुख विषय निर्माण झाला होता. अशा कथांच्या विषयांची विलक्षण गर्दी कॉनन डॉयलच्या मनात होत चालली होती. त्यानं नोव्हेंबर १८९१मध्ये आपल्या आईला एका पत्रात लिहिलं की मला या होम्सला मारून टाकावं आणि कायमचं माझ्या मनातून काढून टाकावं असं वाटतं, कारण दुसरं काही चांगलं करावं असं तो मनात येऊच देत नाही. त्याच्या आईनं त्याला कळवलं, की तू असं करणार नाहीस, असं करू शकणार नाहीस आणि असं करता काम नये. (You won't, You can't and You Mustn't) तरीदेखील Holmes विषयी लिखाण कमी करता यावं आणि प्रकाशकांनी Holmesच्या कथांविषयी फार आग्रह धरू नये म्हणून त्यानं आपल्या लिखाणाच्या मोबदल्याची रक्कम कित्येक पट वाढवली, पण प्रकाशक वाट्टेल ती किंमत मोजायला तयार होते. कॉनन डॉयल अशा तऱ्हेनं सर्वाधिक मोबदला

घेणारा लेखक झाला. अगदी शेवटचा उपाय म्हणून holmesचं अस्तित्वच नाहीसं करावं या हेतूनं त्यानं डिसेंबर १८९३ मध्ये The Final Problem ही कथा लिहिली. यात होम्स आणि त्याचा कट्टर शत्रू Prof. Moriarty ही दोघं Retchenbackच्या धबधब्यात पडून मरतात असं दाखवलं आहे. मात्र त्यामुळं प्रचंड गदारोळ माजला. होम्सच्या मृत्यूविषयी लोकांच्यात एक प्रक्षोभ निर्माण झाला. त्यामुळं होम्स त्या अपघातात खरा वाचलेला असतो असं त्याला दाखवावं लागलं. कॉनन डॉयलनं १९०१साली 'The hound of the Baskervilles' ही कादंबरी लिहिली. अर्थात या कादंबरीत होम्सच्या मागच्या एका केसबद्दल लिहिलेलं आहे. होम्स जिवंत असल्याचं कळतं ते The Empty house या कथेत, जी १९०३ मध्ये प्रसिद्ध झाली.

कॉनन डॉयलनं Sherlock Holmesच्या एकूण ६० कथा लिहिल्या, ज्यामध्ये ४ कादंबऱ्यांचा समावेश आहे. या लेखनाचा काळ आहे १८८७ ते १९२७ अशी चाळीस वर्षं!

या व्यतिरिक्त ज्या एका विषयात जणू कॉनन डॉयलचा प्राण गुंतला होता तो विषय परलोकविद्यावाद म्हणजेच Spirituality. त्याचा प्रथमपासूनच या विषयाकडं कल होता. नंतर १९१४–१८ या काळात, पहिल्या महायुद्धातील प्रचंड प्राणहानी, त्याच्या मुलाचा १९१८मध्ये स्पॅनिश फ्लूच्या महामारीत झालेला मृत्यू या घटनांमुळं त्याच्यावर विशेष परिणाम झाला. त्याचा असा दृढविश्वास होता की एखाद्या व्यक्तीचा जीवात्मा (Spirit) हा त्या व्यक्तीच्या मृत्यूनंतरही अस्तित्वात असतो आणि हयात असलेल्या व्यक्ती त्या जीवात्म्यांशी संवाद साधू शकतात. या विषयावरील त्याचे विचार अगदी पक्के होते. या विषयावर त्यानं जगप्रसिद्ध अमेरिकन जादूगार Harry houdini आणि मानवतावादी Joseph McCabe यांच्याशी वादविवादही केला होता. त्यानं या विषयावर अनेक पुस्तकं लिहिली आहेत. १९१८ साली प्रसिद्ध झालेलं 'The New Revelation' हे या विषयावरचं त्याचं पहिलं पुस्तक तर त्याच्या पुढच्याच वर्षी लिहिलेलं 'The Vital Message' हे दुसरं पुस्तक. १९२६ साली लिहिलेलं आणि दोन खंडात असलेलं 'The history of Spiritualism' या पुस्तकाचा विशेष उल्लेख करता येईल.

१९०६ साली त्याची पत्नी Louisa ही क्षयरोगानं मृत्युमुखी पडली. पुढच्याच वर्षी म्हणजे १९०७ साली त्यानं Elizabeth Lecke हिच्याशी विवाह केला. तो शिक्षणानं मेडीसीनचा डॉक्टर असला तरी त्याला वास्तुकलेमध्ये म्हणजेच Architectureमध्ये उपजत दृष्टी होती. तो १९१२ साली राहात असलेल्या Lyndhurst Grand Hotel चा सर्व चेहरामोहरा उल्हसित करण्याचं काम त्यानं केलं होतं, तसंच त्याच्या Golf खेळाच्या आवडीमुळं त्यानं कॅनडामधील एक गोल्फक्लब आणि त्याच्या भोवतालचा परिसर याचं उत्कृष्ट नियोजन केलं होतं.

कॉनन डॉयलचं ७ जुलै १९३० या दिवशी हृदयविकारानं निधन झालं. त्यावेळी त्याची दुसरी पत्नी त्याच्याजवळ होती. You are wonderful एवढेच शब्द त्यानं तिला उद्देशून उच्चारले! आधी म्हटल्याप्रमाणे तो स्वतःला परलोकविद्यावादी म्हणजेच Spiritualist मानायचा, ख्रिश्चन नव्हे. या कारणानं त्याच्या मृत्यूनंतर जी सभा भरली होती ती शोकसभा नव्हती तर आनंद साजरा करण्यासाठीची सभा होती. या सभेला त्याचे नातेवाईक आणि त्याच्या विचारांवर विश्वास असणारी मंडळी उपस्थित होती. मात्र याच कारणामुळं त्याच्या दफनाच्या जागेविषयी काही वाद निर्माण झाला. त्यानंतर १० वर्षांनी त्याच्या पत्नीच्या मृत्यूनंतर तिच्या New Hampshireमधील दफनभूमीमध्ये, तिच्या थडग्याजवळच त्याचं थडगं हलवलं गेलं. त्याच्या थडग्यावर 'Steel true / Blade Straight / Arthur Conan Doyle / Knight / Patriot / Physician / Man of Letters असं लिहिलेलं आहे.

कॉनन डॉयल २३ वर्षं राहिला होता त्या Cross Boroughमध्ये त्याचा पुतळा उभारला आहे तर तो एडिंबरामध्ये ज्या घरी जन्मला होता त्याच्याजवळ Sherlock Holmesचा पुतळा आहे.

कॉनन डॉयलचं व्यक्तिमत्त्व बहुआयामी होतं. त्यानं निर्माण केलेली साहित्यसंपदा प्रचंड आहे. कथा, कादंबऱ्यांची संख्या २५०च्या आसपास आहे. त्यानं हाताळलेल्या इतर साहित्य प्रकारांत शंभरावर कविता, सुमारे २० नाटकं, १००० च्या वर निबंध आणि इतर लेख, तेवढ्याच संख्येनं लिहिलेली निरनिराळी पत्रं यांचा समावेश होतो. त्याच्या विविध लेखनावर आकाशवाणी आणि रंगभूमीवर झालेल्या कार्यक्रमांची संख्या अनेक हजारांत आहे. त्याच्या कर्तृत्वानं इतर क्षेत्रातही प्रभाव पाडला आहे. उदाहरणार्थ, त्यानं Naval Life Jacket शोधून काढलं. लष्कराला स्टील हेल्मेटचा वापर करण्यास उद्युक्त केलं. त्यानं १८९३ साली स्वित्झर्लंडमध्ये Skiing सुरू केलं.

हे सर्व खरं असलं तरी एक गोष्ट मात्र निर्विवाद की Sherlock Holmesनं त्याचं आयुष्यच एका अर्थी झाकोळून टाकलं आणि त्याची साहित्यसंपदाही. Sherlock Holmesची कीर्ती काय विचारता! कॉनन डॉयलचा पोलिसतपासाच्या पद्धतीवरचा प्रभाव स्पष्ट आहे. त्यानं आपल्या शेरलॉक होम्सच्या कथांत अनेक पद्धती सांगितल्या ज्या जगभरच्या पोलिसदलांत पुढे वापरल्या गेल्या. उदाहरणार्थ, प्लास्टर ऑफ पॅरीसचा दुवे जपून ठेवण्यासाठीचा उपयोग, कपड्यांवर असलेल्या धुळीच्या कणांचा ओळख पटवण्यासाठी उपयोग, वेगवेगळ्या सिगारेटच्या राखेचा अभ्यास आणि त्याचा तपासात होणारा उपयोग, अशा अनेक गोष्टी आहेत. त्यानं कथांत सांगितलेलं आणि निर्माण केलेलं Science of Deduction म्हणजेच निष्कर्षाचं शास्त्र हे जगभर मान्यता पावलेलं आहे. चिनी आणि इजिप्शियन पोलिसांनी कॉनन डॉयलच्या शेरलॉक

होम्सच्या कथा अधिकृत प्रशिक्षण पाठ्यपुस्तकं म्हणून वापरल्या. FBIचे सर्वेसर्वा J Edgar hooverनं असं म्हटलं की FBI नं Sherlock Holmes च्या सगळ्या तपासपद्धती पूर्णपणे वापरात आणल्या आहेत आणि फ्रेंच पोलीस संघटना Sureteनं त्यांची अतिशय प्रसिद्ध Criminal Laboratory जी Lyons इथं आहे तिचं नाव कॉनन डॉयलवरून ठेवलं आहे. कॉनन डॉयलचा शेरलॉक होम्स हा मानस पुत्र त्याच्यापेक्षाही मोठा झाला आणि कॉनन डॉयलसारखा महान लेखकही हे टाळू शकला नाही. ही एका अर्थी शोकांतिका असली तरी खरं म्हणजे ही डॉयलच्या लेखनाच्या सामर्थ्याची पावतीच आहे.

आता मी 'The Hound of the Baskervilles' या कादंबरीकडे वळतो.

ही कादंबरी प्रथम क्रमश: प्रसिद्ध झाली ती 'Strand' या नियतकालिकात, ऑगस्ट १९०१ ते एप्रिल १९०२ या काळात. १९०२ सालीच ती पुस्तकरूपानंही प्रकाशित झाली. 'The Final Problem' या १८९३ साली प्रसिद्ध झालेल्या कथेनंतर प्रसिद्ध झालेली ही शेरलॉक होम्सची पहिलीच कथा. अर्थातच ही कथा शेरलॉक होम्सच्या आधीच्या काळातली आहे हे उघड आहे. आधी सांगितल्याप्रमाणे १९०३ साली कॉनन डॉयलनं होम्सला 'The Empty House' या कथेत जिवंत केलं आणि मग पुढं त्याला काहीही करायला तो कधीच धजावला नाही.

या कादंबरीची सुरुवात होते सगळ्या जगाला परिचित असलेल्या होम्सच्या घरात म्हणजेच 221 B Baker Street इथं. आदल्या दिवशी आलेला एक अशिल त्याची काठी तिथं विसरून गेलेला असतो. होम्स आणि वॉटसन दोघंही त्यावेळी बाहेर असल्यामुळं त्यांची भेट होत नाही. या काठीवरून होम्स त्याच्या नेहमीच्या सवयीप्रमाणं तो माणूस कोण, कुठला, त्याचा व्यवसाय काय वगैरे गोष्टींबद्दल त्याची अनुमानं वॉटसनला सांगतो. तेवढ्यात तो अशिल म्हणजेच डॉ. मॉर्टिमर तिथं हजर होतो. होम्सची अनुमानं किती अचूक असतात हेही आपल्याला कळतं. हा डॉ. मॉर्टिमर होम्स आणि वॉटसनला एक विलक्षण गोष्ट सांगतो.

ती अशी, की इंग्लंडमधील डेवॉनशायरमध्ये एका प्रचंड मोठ्या माळरानालगत Baskerville Hall ही बास्करव्हिल घराण्याची अत्यंत भव्य, पुरातन अशी वास्तू असते. काही महिन्यांपूर्वी या Baskerville Hallच्या मालकाचा म्हणजेच Sir Charles Baskervilleचा मृत्यू झालेला असतो. हा डॉ. मॉर्टिमर या Sir Charlesचा चांगला मित्रच नसतो तर त्याचा Family Physicianही असतो. Sir Charlesचा मृत्यू हा हृदयविकारानं झाला अशी कागदोपत्री नोंद झालेली असते तरी डॉ. मॉर्टिमर याबद्दल समाधानी नसतो याचं कारण म्हणजे Sir Charlesचा चेहरा मृत्यूसमयी भयानं अतिशय विद्रूप झालेला असतो. मग तो होम्स आणि वॉटसनला बास्करव्हिल घराण्याला असलेल्या शापाची कथा सांगतो. ती अशी, की इंग्लीश यादवी युद्धाच्या काळात म्हणजेच १६४२ ते १६५१मध्ये Baskerville Hall चा Hugo Baskerville हा मालक असतो. तो अतिशय जुलमी, क्रूर, स्त्रीलंपट, मद्यपी, माथेफिरू असा असतो. त्याला कशाचाही धरबंद नसतो. एके दिवशी त्याची वाईट नजर माळालगत रहाणाऱ्या एका सुंदर तरुणीवर पडते. तो तिला पळवून वाड्यावर आणतो. तिथं तो आपल्या मित्रांबरोबर मेजवानी झोडत असताना ही तरुणी कशीबशी त्या वाड्यातून पळण्यात सफल होते. याची बातमी Hugo ला लगेच कळते. मद्यानं धुंद झालेला Hugo त्या तिरमिरीतच घोड्यावर स्वार होऊन तिचा पाठलाग करू लागतो. त्याचे अन्य काही मित्र Hugoच्या मागावर निघतात. जिवाच्या आकांतानं ती तरुणी त्या माळावर पळत असते आणि तशातच तिचा ऊर फुटून मृत्यू होतो आणि ती त्या माळावरच कोसळते. Hugoचे मित्र त्या जागी पोचतात तेव्हा त्यांना काळजाचा थरकाप उडवणारं दृश्य दिसतं. त्या तरुणीच्या मृतदेहापाशी Hugo उभा असतानाच एक अमानुष, अक्राळविक्राळ, काळाकुट्ट, महाकाय, राक्षसी हाउंड त्याच्यावर हल्ला करतो आणि त्यांच्या नजरेसमोरच Hugoच्या नरडीचा घोट घेऊन तो जणू विजयश्रीच्या उन्मादात भेसूर, कर्कश आरोळी ठोकतो. खरं तर हाउंड म्हणजे मोठा शिकारी कुत्रा. त्याचं हे असं रूप पाहून तिघा मित्रांची भीतीनं गाळण उडते आणि ते सैरावैरा पळत सुटतात. ते हाउंडपासून दूर पळतात खरे, पण त्यांचं दुर्दैव संपत नाही. त्यातल्या एकाचा दुसऱ्याच दिवशी मृत्यू होतो आणि उरलेली दोघं त्यांचं पुढचं सगळं आयुष्य भेदरलेल्या, भ्रमिष्ट अवस्थेतच काढतात. तेव्हापासून हा हाउंड त्या माळरानावर रात्री बेरात्री फिरत असतो. Baskerville घराण्याला हा शाप मग पिढ्यान्‌पिढ्या छळतच रहातो. तिथं राहणाऱ्या अनेक मालकांचा गूढ, अकस्मात आणि हिंसक मृत्यू झालेला असतो. या माळावर आणि त्या पंचक्रोशीत ही राक्षसी हाउंडची दंतकथा कित्येक शतकं प्रचलित असते. रात्री या माळावर कोणाही माणसानं त्यानंतर कधीच पाय ठेवलेला नसतो.

बास्करव्हिल हॉलचा नुकताच मृत्यू पावलेला मालक Sir Charles हा दक्षिण आफ्रिकेत खूप पैसा मिळवून मग Baskerville Hallला स्थायिक झालेला असतो. त्याच्या घराण्याला असलेल्या या शापाची कथा पिढ्यान्‌पिढ्या चालत आलेली असल्यामुळं त्यालाही ती परिचित असते. एवढंच नव्हे तर या दंतकथेवर त्याचा पूर्ण विश्वासही असतो. तो तिथं राहायला आल्यापासून त्याला त्या पंचक्रोशीत अशी काही वृद्ध माणसं भेटतात जी त्याला छातीठोकपणे सांगतात की त्यांनी त्यांच्या डोळ्यांनी कधी एखाद्या रात्री मुखातून आग ओकणाऱ्या, जळत्या डोळ्यांच्या, त्या काळ्याकुट्ट महाकाय हाउंडला दूरवरून का होईना पण पाहिलं आहे. यामुळं त्याचा

शापावरचा विश्वास आणखीच दृढ होतो. ज्या दिवशी Sir Charlesचा मृत्यू झालेला असतो त्या दिवशी तो त्याच्या वाड्याच्या माळरानावर उघडणाऱ्या दाराजवळ उभा असतो, पण त्याचा मृतदेह त्यापासून लांब असलेल्या वाड्याच्या प्रांगणातल्या एका पायवाटेवर मिळालेला असतो. डॉ. मॉर्टिमर लगेचच तिथं पोचलेला असतो. तो होम्सला असं सांगतो की त्यानं त्या मृतदेहापासून थोडं लांब एका महाकाय हाउंडच्या पावलांचे ठसे बघितलेले असतात. Sir Charlesच्या मृतदेहावर कुठलीच जखम नसल्यामुळं पंचनाम्यात या पावलांच्या ठशांचा उल्लेख आलेला नसतो.

शेरलॉक होम्स अर्थातच या हाउंडच्या दंतकथेवर विश्वास ठेवत नाही. डॉ. मॉर्टिमर मग त्याच्या येण्याचं खरं कारण सांगतो. तो होम्सला सांगतो, की Sir Charles विधूर होता आणि त्याला कोणी मुलंबाळं नव्हती. Baskerville Hallचा पुढचा वारस त्याचा पुतण्या Henry Baskerville हा आहे. तो कॅनडात राहात असतो पण Sir Charlesच्या मृत्यूनंतर Baskerville Hallचा ताबा घेण्यासाठी तो त्याच दिवशी कॅनडाहून इंग्लंडला आलेला असतो. डॉ. मॉर्टिमरचा या शापाच्या कथेवर पूर्ण विश्वास असतो आणि म्हणूनच त्याला Henry Baskervilleच्या जिवाची प्रचंड काळजी वाटत असते. होम्स जरा नाखुशीनचं Henryला भेटण्याचं कबूल करतो. तशी त्यांची भेटही होते. या दरम्यान काही चमत्कारिक घटना घडतात आणि या घटनांचं लक्ष्य Henry Baskerville हाच असतो. होम्सची मग खात्री पटते की इथं काहीतरी पाणी मुरतंय. तो लंडनमध्ये, काही कामात गुंतलेला असल्यामुळे तो डॉ. वॉटसनला, Henry आणि डॉ. मॉर्टिम रबरोबर Devanshireला असलेल्या Baskerville हॉलला जाण्यास सांगतो. तो Henryच्या सुरक्षिततेची जबाबदारी डॉ. वॉटसनवर टाकतो आणि त्याला सांगतो की तिथं जे जे घडेल ते सगळं त्यानं पत्रानं होम्सला कळवत राहावं.

अशा रितीनं एक-दोन दिवसांनी एका दुपारी Henry, Watson आणि डॉ. मॉर्टिमर हे Baskerville Hall जवळच्या स्टेशनवर उतरतात. त्यांना स्टेशनवरच अशी माहिती मिळते की माळापासून थोड्याच अंतरावर असलेल्या Princetown या प्रसिद्ध तुरुंगातून खुनाबद्दल शिक्षा भोगणारा एक कैदी सेल्डन दोन दिवसांपूर्वीच पळाला आहे. पोलिसांचा असा कयास असतो की तो माळावरच कुठेतरी लपून बसला आहे. माळाकडे जाणाऱ्या-येणाऱ्या वाटांची त्यांनी नाकाबंदी केलेली असते, पण मैलोन्मैल पसरलेल्या त्या माळावर त्याला शोधणं त्यांनाही शक्य नसतं. नंतर ते Baskerville Hall ला पोचतात. तो भव्य, पुरातन असतोच, पण Watsonला तो थोडा भयाणही वाटतो. या वाड्यात Baskerville कुटुंबाचा बटलर असलेला जुना नोकर Barrymore आणि स्वयंपाक करणारी त्याची पत्नी अशी दोघंच राहात असतात. डॉ. मॉर्टिमर त्याच्या घरी निघून जातो. वाड्यात Henry आणि Watson ही दोघंच रहाणार असतात.

पहिल्या रात्रीपासून डॉ. वॉटसनला विचित्र अनुभव येतात. तो वाड्यात कुण्या एका स्त्रीचं दबक्या आवाजातलं रडणं ऐकतो. दुसऱ्या दिवशी त्याला कळतं की ते Henryनंही ऐकलेलं आहे. हे ते जेव्हा Barrymoreer बोलतात तेव्हा तो असं काही घडल्याचा पूर्ण इन्कार करतो.

निर्जन, प्रचंड, विस्तीर्ण माळरानाभोवती काही तुरळक वस्ती असते. ती बऱ्यापैकी विखुरलेली असते. पुढच्या काही दिवसांत या आजूबाजूला राहाणाऱ्या लोकांशी Henry आणि Watsonची ओळख होते. Baskerville Hallच्या नवीन मालकाबद्दल लोकांना कुतूहल तर असतंच. त्यांच्यात या दोघांची थोडी ऊठबस सुरू होते. डॉ. वॉटसनला पहिल्या दिवसापासून काही चमत्कारिक अनुभव येऊ लागतात. हाउंडच्या दंतकथेवर असलेल्या या सगळ्या लोकांचा गाढ विश्वास त्याला अस्वस्थ करू लागतो. तो ठरल्याप्रमाणे घडणाऱ्या घटनांचं इत्थंभूत वर्णन पत्राद्वारे होम्सला वारंवार कळवत असतो.

एकदा तर डॉ. वॉटसनच त्या हाउंडचं ओरडणं ऐकतो. तो आणि Henry एका रात्री शस्त्र घेऊन माळावर थोडं फिरूनही येतात. त्यांनाही हाउंडचं रक्त गोठवणारं ओरडणं ऐकू येतं आणि मग पुढे जायची त्यांचीही हिंमत होत नाही. डॉ. वॉटसनची अस्वस्थता वाढत जाते. आपण एका अदृश्य विळख्यात सापडलो आहोत अशी भावना त्याच्या मनात पक्की होऊ लागते. त्यातच एके दिवशी त्याला माळावरच्या दूरच्या टेकडीवर एक माणूस फिरताना दिसतो. तो कोण, कुठला, तिथं का आला आहे याबद्दल कोणालाच काही माहिती नसते. या सगळ्यांत Dr. Watson Henryवर डोळ्यांत तेल घालून लक्ष ठेवून असतो. माळालगतच्या एका घरात स्टेपलटन बहीण-भाऊ रहात असतात. Henry त्या बहिणीकडे आकर्षित झाला आहे, हेही वॉटसनला उमगतं. तिचं वागणं तसं विक्षिप्तच असतं. Dr. Watson मोठ्या नेटानं एकट्यानंच हा किल्ला लढवत असतो खरा, पण त्याला होम्सची उणीव पावलोपावली भासू लागते. बरं त्याच्या पत्रांना होम्सकडून काही उत्तरही आलेलं नसतं. या सगळ्या चमत्कारिक घटनांचा त्याला काहीच अंदाज बांधता येत नाही, पण काहीतरी अनैसर्गिक त्याच्या आसपास कुठेतरी आहे ही त्याची जाणीव प्रखर होत जाते.

Watsonनं पाहिलेल्या या सगळया चमत्कारिक घटनांचा अर्थ काय, हाउंडच्या दंतकथेचं रहस्य काय, Henry बास्करव्हिलला कुणापासून धोका असतो, होम्सचं बास्करव्हिल हॉलला केव्हा आणि कसं आगमन होतं, तो या सगळ्या घटनांचं मूळ कसं शोधतो आणि शेवटी काय होतं या सगळ्यांची उत्तरं आपल्याला शब्दागणीक उत्सुकता वाढवणाऱ्या

या कादंबरीत मिळतात.

रूढ अर्थानं ही एक रहस्यकथा असली तरी या कादंबरीची व्याप्ती त्याहीपेक्षा बरीच मोठी आहे, म्हणूनच या कथेला रहस्यात्मक कथा म्हणणं अधिक उचित ठरेल. कॉनन डॉयलनं कथानकाची मांडणी अतिशय प्रभावीपणं केली आहे. यासाठी त्यानं कादंबरीलेखनाच्या अनेक तंत्रांचा कौशल्यपूर्ण वापर केला आहे. कथेतील बऱ्याच घटना आपल्याला वॉटसन होम्सला जी पत्रं लिहितो त्याद्वारेच कळतात. मध्येच डॉ. वॉटसनच्या रोजनिशीतल्या नोंदीवरून आपल्याला काही घटनांची उकल होते. तर मध्येच कधी तरी जुन्या हस्तलिखितातील लिखाणाचा संदर्भ आपल्याला मिळतो. अर्थात ही सगळीच कथा आपण डॉ. वॉटसनच्या मुखातूनच ऐकत आहोत, हे लक्षात ठेवणं गरजेचं आहे. बारकाईनं पाहिलं तर आपल्याला असं लक्षात येतं की कॉनन डॉयलनं चार-पाच कथानकं गुंफून या कादंबरीची रचना केली आहे. पहिलं म्हणजे बास्करव्हिल घराण्याला असलेला शाप आणि त्या हाउंडची प्रचलित दंतकथा, दुसरं म्हणजे तुरुंगातून पळालेला खुनाची शिक्षा भोगत असलेला कैदी आणि माळालगतच्या टेकड्यांमध्ये कधी कधी फिरताना दिसणारा तो रहस्यमय माणूस, तिसरं म्हणजे Baskerville हॉलमध्ये आणि आसपासच्या परिसरात घडणाऱ्या विचित्र घटना आणि शेवटी या सगळ्यांच्या मुळाशी असलेलं रहस्य. ही सगळी वेगवेगळी कथानकं कॉनन डॉयलनं अत्यंत सहजतेनं एकमेकांत गुंफून एका अत्यंत उत्कंठावर्धक कथानकाची बांधणी केली आहे. कॉनन डॉयलची कथनशैली कथानकाला साजेशी, मनाची पहिल्यापासूनच पकड घेणारी आहे. प्रचलित लोककथांचा, दंतकथांचाही अतिशय परिणाम कारक वापर कॉनन डॉयलनं केला आहे.

या कादंबरीची जडणघडण अशी आहे की इथं कथानकाला अनन्यसाधारण महत्त्व आहे हे उघडच आहे, पण असं करताना कॉनन डॉयलनं व्यक्तिरेखाही अत्यंत उठावदारपणं रंगवल्या आहेत. या कादंबरीत व्यक्तिरेखांची संख्या मर्यादितच आहे. Baskerville घराण्याचा सच्चा हितचिंतक असलेला डॉ. मॉर्टिमर, बास्करव्हिलच्या शापावर फारसा विश्वास नसलेला बास्करव्हिल हॉलचा नवा मालक Henry Baskerville, बास्करव्हिल घराण्याचा पिढ्यान्‌पिढ्या सेवक असलेला बॅरीमूर आणि त्याची अबोल पत्नी, माळालगतच्या घरात राहणारे वेगवेगळे रहिवासी त्यात Naturalist असलेला स्टेपलटन आणि अलिप्त, घुमी, सतत कुठल्यातरी मानसिक ताणाखाली असणारी त्याची बहीण, बास्करव्हिल हॉलच्या शेजारी राहाणारा वृद्ध, कटकट्या, विक्षिप्त Franklin ज्याला दुर्बिणीतून आकाश, माळरान आणि माळरानालगतच्या घरांचं निरीक्षण करण्याची सवय असते, त्याची दुरावलेली मुलगी Laura जिचा Sir Charlesशी अनाकलनीय, कधीच स्पष्ट न होणारा असा संबंध असतो. आणि या व्यक्तिरेखांच्या पलीकडे जाऊन माळरानावर लपून राहाणारा, तुरुंगातून पळालेला तो खुनी आणि टेकड्यांमध्ये फिरणारा, कधीकधीच लांबून दिसणारा तो रहस्यमय माणूस या केवळ भासमय असणाऱ्या व्यक्तिरेखांनी कथानकाच्या गूढतेला एक वेगळंच परिमाण दिलेलं आहे, आणि अर्थातच जगातली सगळ्यात प्रसिद्ध जोडी डॉ. वॉटसन आणि शेरलॉक होम्स. वॉटसन म्हणजे होम्सचा सच्चा, विश्वासू सहकारी, होम्सवर गाढ भक्ती असणारा, शांत, संयमी तसाच निर्धारी, Henry Baskervilleच्या सुरक्षिततेचं ओझं खांद्यावर सतत समर्थपणे बाळगणारा, दक्ष, सरळमार्गी पण तसा साधाच, एका अर्थी निरागसच असणारा, फारशी कल्पनाशक्ती नसलेला. आणि शेवटी आपला सगळयांचा लाडका होम्स. उंच, सडपातळ, तीक्ष्ण, कुशाग्र बुद्धिमत्तेचा, चाणाक्ष, धूर्त, साहसी, निग्रही आणि आपल्या बुद्धिमत्तेवर प्रचंड विश्वास असणारा, एका अर्थी पूर्ण Egoist! होम्सचा वावर या कादंबरीत तसा थोडासा कमीच आहे. मात्र त्याचं अस्तित्व आपल्याला सतत जाणवत राहतं, त्या पाशवी हाउंडसारखंच!

या कादंबरीच्या कथानकाचा वेग तसा संयमितच आहे. पण, कॉनन डॉयलच्या असामान्य कथनशैलीच्या प्रभावानं आपण पूर्ण गुंगून गेल्यामुळे ही बाबआपल्या ध्यानात येतच नाही. छोट्या छोट्या, विचित्र, असंबद्ध घटनांतून कॉनन डॉयल अतिशय सहजपणे हा कथापटल आपल्यासमोर उलगडत जातो. त्यात कॉनन डॉयलच्या वेगळ्याच बाज असलेल्या भाषेचं मोठंच योगदान आहे. ही कथा आपण डॉ. वॉटसनच्या मुखातूनच ऐकत असतो. कधी तो घटना थेट सांगतोय, कधी पत्रांमधून, कधी त्याच्या रोजनिशीतील काही उताऱ्यातून. डॉ. वॉटसन हा उच्च शिक्षित आहे आणि कॉनन डॉयलनं त्याच्या व्यक्तिमत्त्वाला साजेशी भाषा वापरली आहे. कॉनन डॉयलचे संवादही सटीक (Crisp), सरळ, नैसर्गिक आहेत. संवादामधून कथानक पुढे नेण्याची कॉनन डॉयलची विलक्षण क्षमता आपल्याला पदोपदी जाणवते.

या कादंबरीची खरी शक्ती आहे ती कथानकाच्या वातावरणनिर्मितीत. वातावरणप्रधान म्हणजेच Atmospheric म्हटल्या जाणाऱ्या कादंबऱ्यांचा ही कादंबरी एक परमोच्च बिंदू आहे असं म्हटलं तर ते वावगं ठरू नये. ते विस्तीर्ण, मैलोन्‌मैल पसरलेलं भकास, भयाण माळरान, माळरानावर मध्येच असलेली काही झाडांची दाटी, एका टोकाला पसरलेली ती विस्तीर्ण, जीवघेणी दलदल म्हणजेच Grimpen Mire, माळरानावर दूरदूर पसरलेल्या इतिहासपूर्व आणि ऐतिहासिक वास्तू आणि काही ठिकाणी असलेले या वास्तूंचे भग्न अवशेष, दूर असणाऱ्या टेकड्या आणि त्या टेकड्यांमध्ये असलेल्या विविध छोट्या छोट्या गुहा; जागोजागी इतस्ततः विखुरलेली टेकड्यांची काळीकभिन्न खडकाळ शिखरं म्हणजेच Rock Formations,

माळरानाभोवती विखुरलेली, एकमेकांपासून दूर असलेली ती तुरळक घरं, त्यामधला तो विशाल भयाण Baskerville Hall रात्री धुक्यानं लपेटलेल्या माळरानावरून येणारे स्पष्ट, अस्पष्ट, चित्रविचित्र आवाज आणि मधेच अंगावर काटा उभं करणारं, रक्ताची तहान लागल्यासारखं ते हाउंडचं Howling म्हणजेच भेसूर, कर्कश ओरडणं, त्याच्या थरकाप उडवणाऱ्या मधूनच येणाऱ्या आरोळ्या, हे सगळं कॉनन डॉयलनं इतक्या ताकदीनं रेखाटलं आहे की कादंबरी वाचत असताना ही हाउंडची अमानवी, अभद्र, भयंकर विक्राळ सावली आपल्याला सतत भेडसावत राहते. आणि कॉनन डॉयल या दंतकथेवर विश्वास ठेवण्यास आपल्याला जणू भागच पडतो. या सगळ्या अनैसर्गिक वातावरणात त्या सैतानी, पाशवी, अमानुष, समंधसदृश (Spectral किंवा Ghost Like) हाउंडचा अदृश्य पण तरीही वेगवेगळ्या स्वरूपात प्रकट होणारा वावर, येथील सगळं भय, भयाणपणा, रहस्यमयता, अस्पष्ट चाहूल देणारी अव्यक्त, अनामिक पण भयंकर वाटणारी संकटं, आणि कुठेतरी होम्सचं नसलेलं असलेपण या सगळ्या अपूर्व मिश्रणाचं भयावह सावट आपल्यावर पडतं आणि मधूनच काळजाचा थरकाप उडवणाऱ्या थंड भीतीचा स्पर्शही आपल्याला मधूनमधून जाणवत रहातो. कॉनन डॉयल आपल्या प्रभावी लेखणीद्वारे या सगळ्यात आपल्याला पार गुरफटून टाकतो, जणू आपण त्या वातावरणाचा एक भागच बनतो. हे वातावरणच या कादंबरीचा खरा आत्मा आहे, तिची खरी ताकद आहे. हे भारलेलं वातावरण इतकं परिणामकारक आहे की ते शेरलॉक होम्ससारख्या अद्वितीय नायकालाही पार झाकोळून टाकतं!

कॉनन डॉयलनं आपल्या अलौकिक प्रतिभेनं जणू एक असाध्य गोष्ट साध्य केली आहे आणि ती म्हणजे रहस्यकथा, भयकथा, आणि गॉथिक कथा, ज्यात गूढकथेचाही समावेश होतो. यांच्या अभूतपूर्व संश्लेषण (Synthesis) त्यानं एक अत्यंत विलक्षण, अविस्मरणीय अशा कलाकृतीची निर्मिती केली आहे.

ही कादंबरी प्रकाशित झाली १९०२ साली. इतकी वर्षं उलटून गेली तरी तिच्या अढळपणाला अजून धक्का लागलेला नाही. आजही तिच्या आवृत्ती सतत खपत आहेत. जगातील जवळजवळ ९९ भाषांत या कादंबरीची भाषांतरं झालेली आहेत. मला आठवतं की श्रीमती सरिता पत्कींनीं या कादंबरीचं मराठीत फारच उत्कृष्ट असं भाषांतर केलं आहे.

या कादंबरीवर वीसहून अधिक चित्रपट निघाले आहेत. हिंदीमध्ये १९६२ साली आलेला 'बीस साल बाद' याच कादंबरीवर आधारित आहे. अनेक टीव्ही मालिका आल्या आहेत, रंगभूमीवर विविध देशांत विविध नाट्यकृतींचं सादरीकरण झालेलं आहे. अनेक नभोवाणी नाटकांची निर्मिती झालेली आहे, तिच्यावर विडंबनं आली आहेत, Rock Albums निघाले आहेत, कार्टून चित्रपट आले आहेत, अगदी Video Gamesदेखील. ती एक Cult Classic म्हणून जागतिक वाङ्मयात मान्यता पावलेली आहे. Le Monde या प्रसिद्ध फ्रेंच नियतकालिकानं २०व्या शतकातील १०० सर्वोत्तम पुस्तके म्हणजेच 100 Greatest Books of 20th Centuryमध्ये या कादंबरीचा वरच्या स्थानावर समावेश केला आहे. तर BBCनं इंग्रजी भाषेतील १०० सर्वात परिणामकारक पुस्तकं म्हणजेच 100 most influencial books in english language या यादीतही या कादंबरीला मानाचं स्थान दिलेलं आहे. रहस्यकथा हा वाङ्मयप्रकार साहित्यात तसा दुय्यमच मानला जातो. या पठडीत लिहिलेल्या एका कादंबरीला जगभर इतके सन्मान मिळाले यावरून ही कलाकृती किती असाधारण आहे हे सिद्ध होतं, नाही का?

कॉनन डॉयलनं शेरलॉक होम्सच्या चार कादंबऱ्या लिहिल्या. त्याला होम्सची पूर्ण कादंबरी लिहायला आधी कधीच जमलं नाही. 'Study in Scarlet' आणि 'The valley of fear' या दोन कादंबऱ्या प्रत्येकी दोन भागांत विभागल्या आहेत. पहिल्या भागात शेरलॉक होम्स रहस्याची उकल करतो आणि दुसऱ्या भागात या रहस्याची पार्श्वभूमी, पूर्वपीठिका सांगितली असल्यामुळे त्यात शेरलॉक होम्सचा संदर्भदेखील नाहीये. Sign of Four ही एक दीर्घकथाच आहे. आपल्या या उणिवेवर कॉनन डॉयलनं एकदाच मात केली आणि मग 'The Hound of the Baskervilles' यांसारखी जगातील आतापर्यंतची सर्वोत्तम रहस्यकथा अशी मान्यता पावलेली कादंबरी निर्माण झाली!

One of the most famous stories ever told असं म्हटली जाणारी, सुमारे १७५ पानांची, शेरलॉक होम्ससारख्या जगातल्या सगळ्यात नावाजलेल्या आणि लोकप्रिय गुप्तहेराची सर्वोत्कृष्ट कथा म्हणून सर्वमान्यता प्राप्त झालेली, जागतिक वाङमयातील ही एक अत्यंत श्रेष्ठ कलाकृती आहे. रहस्यकथेचं किंवा रहस्यात्मक कथेचं एक वैशिष्टय म्हणजे एकदा ते रहस्य कळलं की ती कथा परत वाचण्याची इच्छा होत नाही. ही कादंबरी त्याला पूर्ण अपवाद आहे. परत परत वाचावीशी वाटणारी ही कादंबरी म्हणजे एक सिद्धहस्त लेखक अशा कथेला किती आगळंवेगळं रूप देऊ शकतो, तिला किती उंचीवर नेऊ शकतो याचं एक मूर्तिमंत उदाहरणच आहे. सर ऑर्थर कॉनन डॉयलच्या या असामान्य कलाकृतीचा रसास्वाद घेणं हा एक अविस्मरणीय अनुभव आहे आणि अशा अनुभवांचे क्षण आयुष्यात विरळाच!

**– राजीव श्रीखंडे**
rshrikhande@yahoo.com



# कला, मानव्य विद्या आणि सामाजिक शास्त्र यांचे शिक्षणातील महत्त्व

**डॉ. अंजली पटवर्धन-कुलकर्णी**

डिसेंबर-जानेवारी महिने सुरू होताना शाळा, महाविद्यालयांमध्ये वेध लागतात ते क्रीडास्पर्धा, विविध गुणदर्शनाच्या कार्यक्रमांचे आणि वार्षिक बक्षीससमारंभाचे! अभ्यासात हुशार असलेले, त्यावरच भर देणारे विद्यार्थी सहसा या कार्यक्रमांच्या वाटेला जाताना दिसत नाही, पण जे क्रीडा आणि अभ्यासेतर विषयांमध्ये अग्रेसर असतात त्यांच्यासाठी ही एक पर्वणीच असते. आपल्या शैक्षणिक धोरणामध्ये शिक्षणामुळे विद्यार्थ्यांची सर्वांगीण प्रगती हे मूलभूत उद्दिष्ट डोळ्यांसमोर ठेवून विषयांची आखणी केलेली आहे. विद्यार्थी अभ्यासात अग्रेसर होताना, शारीरिकदृष्ट्या सुदृढ आणि निरोगी होणे महत्त्वाचे आहे. तसेच कलागुणांचाही त्यांच्यामध्ये विकास व्हावा यासाठीच हे सर्व उपक्रम राबवले जावे अशी अपेक्षा आहे. जितके महत्त्व पुस्तकी अभ्यासाला तितकेच या इतर शैक्षणिक अनुभवांना दिलेले असणे अपेक्षित आहे. प्रत्यक्षात अनेकदा अभ्यासक्रम पुरा करण्यासाठी खेळाचे तास वापरले जातात आणि मैदानावर जाऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना वर्गखोलीत कैदेत बसावे लागते. तीच परिस्थिती चित्रकलेच्या तासांची. मग गाणी, नाच, नाटके याचा तर विचारच नको करायला. आपल्याही नकळत विद्यार्थ्यांच्या मनावर याचा परिणाम असा होतो की पुस्तकी शिक्षण जास्त महत्त्वाचे आणि क्रीडा, कला यातून मिळणारे शैक्षणिक अनुभव हे तितकेसे महत्त्वाचे नाहीत. मग पुस्तकी किड्यांना उत्तेजन मिळत जाते आणि खेळांची मैदाने, सादरीकरणाचे मंच यांचे महत्त्व वर्गातल्या प्लाटफॉर्मपेक्षा कमीच समजले जाते. आता तर प्रश्न गहन होणार कारण मैदानी खेळसुद्धा मोबाइलवर खेळणारी पिढी आपल्यासमोर निर्माण झाली आहे. विद्यार्थीवर्गात फूट पडू शकते, अभ्यासात प्रवीण असलेले आणि अभ्यासेतर विषयांत रस असेले असे दोन तट निर्माण होऊन दुसरा पहिल्याला कमी लेखू लागतो. बहुतेकांचे पालकही पुस्तकी शिक्षणाला महत्व देत असल्याने वर्ग नीट भरतात ना याच्याकडे आवर्जून लक्ष देणारे आहेत, शाळा-महाविद्यालयाच्या अभ्यासक्रमाला टेकू म्हणून आवर्जून खासगी क्लासला पाठवणारे आहेत. पण खेळाच्या तासाला काय केले, चित्रकलेच्या तासात कोणती चित्रे काढली अशा चौकश्या अजिबात करताना दिसत नाही. याच विचारसरणीतून मग पुढील शिक्षणाची दिशा ठरवताना विषयांची निवड केली जाते. अनेक घरातून श्रेयसच्या घरातल्यासारखे सूर ऐकू येऊ लागतात.

आमच्याच महाविद्यालयात शिकलेला श्रेयस, आज कलेक्टर झालाय. त्याच्या घरात अशासारखा संवाद रंगला होता. 'अरे श्रेयस, एवढे चांगले मार्क मिळाले दहावीला, तरी तू कलाशाखेला कसा काय प्रवेश घ्यायचे म्हणतोस? काय ठेवलंय त्या आर्ट्स विषयात? पुढे करिअर कशात करणार? सायन्स घेतले असतेस तर पुढे खूप स्कोप आहे त्या विषयांना. निदान कॉमर्सचा तरी विचार करायचास. एवढे नव्वदच्या वर टक्केवारी मिळवून अखेर अकरावीत आर्ट्सला जायचे म्हणजे वेडेपणाच आहे. काय तर म्हणे मला मानसशास्त्र, राज्यशास्त्र आणि अर्थशास्त्र अभ्यासायचे आहे. भाषा विषय आवडतात कथा, कविता, कादंबऱ्या, नाटके अभ्यासायला आवडतात. अरे, पण ते कधीही करू शकशील ना, नंतरसुद्धा पुस्तके वाचता येतील की छंद म्हणून.' पण श्रेयस आपल्या विचारांवर आणि निवडीवर ठाम होता. घरच्यांच्या नाराजीला बाजूला सारून त्याने भाषा विषयात पदव्युत्तर शिक्षण पुरे करत असतानाच स्पर्धा परीक्षांची तयारी सुरू ठेवली. अथक, दृढ प्रयत्नाने यश मिळवून जिल्हाधिकारी झाला. तो नेहमी सांगतो की कला विषयांची त्याला पार्श्वभूमी असल्याने तो प्रथम एक सामाजिक मूल्ये जपणारा, योग्यअयोग्य याची सखोल जाण असणारा, उत्तम माणूस झाला आणि त्यामुळे नंतर एक चांगला प्रशासकीय अधिकारी.

ASER -असर २३च्या उच्च शिक्षणाच्या रिपोर्टनुसार 'प्रथम'ने ग्रामीण भागातील शिक्षणासंबंधी जे सर्वेक्षण आयोजित केले होते त्याच्या ठळक नोंदी अशा आहेत-

१) ग्रामीण भागातील १४ ते १८ वयोगटातील बहुतेक विद्यार्थी आर्ट्स अथवा मानव्य विद्या शाखा या अभ्यासक्रमात शिकत आहेत.

२) इयत्ता अकरावीमध्ये ५५.७% विद्यार्थ्यांनी आर्ट्सला

प्रवेश घेतला आहे

३) STEM-विज्ञान, तंत्रज्ञान, अभियांत्रिकी आणि गणित या विषयांसाठी ३१% विद्यार्थ्यांची पसंती आहे, ज्यामध्ये २८.१% मुली आणि ३६.३% मुलांचा समावेश आहे. या STEM मध्ये एकचा समावेश आवश्यक आहे म्हणजे STEAM विज्ञान, तंत्रज्ञान, अभियांत्रिकी, कला आणि गणित असा तो सर्वसमावेशक अभ्यासक्रम तयार होऊ शकेल.

मूळ प्रश्न त्यामुळे असा आहे, की अर्ध्याच्या वर विद्यार्थी कलाशाखेत प्रवेश घेतात असे चित्र आहे तर मग कलाशाखेला आणि त्यातील शिकवल्या जाणाऱ्या विषयांना विज्ञान किंवा वाणिज्य अभ्यासक्रमापेक्षा कमी का लेखले जाते? प्रामुख्याने असे लक्षात येते की कलाशाखेच्या तुलनेत विज्ञान आणि वाणिज्य शाखेच्या विद्यार्थ्यांना नोकरी अथवा व्यवसायाच्या जास्त संधी आणि पैसा उपलब्ध आहेत, असा एक पक्का समज आहे. या अभ्यासक्रमाच्या प्रवेशावेळी लागणारे परीक्षेतील गुण हे उच्च दर्जाचे असावे लागतात त्यामुळे आपोआपच या विद्यार्थ्यांची गणना हुशार मुलांच्यात होते व कलाशाखेतील मुलांचे वर्गीकरण हुशारीच्या निम्न स्तरावर केले जाते.

मानव्य विद्याशाखा -ह्युमॅनिटीजच्या अभ्यासातून सांस्कृतिक समज आणि वेगळेपणाविषयी आदर वाढीस लागतो. आपण सातत्याने प्रतिभा आणि नावीन्याचा शोध घेण्याची ऊर्मी कमी होत असल्याची ओरड करतो, पण हे विसरतो की भाषा आणि कलाशाखेतील विषयांकडे दुर्लक्ष झाल्यामुळेच हे नवोन्मेषाचे झरे आटत चालले आहेत.विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास हे जर आपल्या शिक्षणाचे ध्येय असेल तर कला विषयांचा समावेश अभ्यासक्रमात होणे गरजेचे आहे. आर्ट्सच्या अभ्यासक्रमात भाषा, कला-संगीत-नृत्य-नाट्य, इतिहास, अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, तत्त्वज्ञान, तर्कशास्त्र, मानसशास्त्र, यांसारख्या विषयांचा समावेश आहे. या विषयांच्या अभ्यासातून विद्यार्थ्यामध्ये आवश्यक कौशल्ये निर्माण होतात. त्यातील काही पुढीलप्रमाणे-

- गंभीर आणि विश्लेषणात्मक विचार करण्याची क्षमता
- सर्जनशीलता आणि नावीन्य
- सांस्कृतिक जागरूकता आणि समावेशकता
- संप्रेषण कौशल्ये
- नैतिक तर्क आणि नागरिकत्वाची जबाबदारी
- वेगवेगळ्या विषयांचा परस्परसंबंध समजून घेण्याचे कौशल्य
- कुतूहल आणि संशोधनाचे कौशल्य

यामुळेच आर्ट्स, ह्युमॅनिटीज, सामाजिक शास्त्रे यांची सर्वसमावेशक शिक्षणामध्ये मोलाची भूमिका आहे. या अभ्यासातून नमूद केलेली आवश्यक कौशल्ये विद्यार्थ्यांमध्ये विकसित होतील. व्यक्ती आणि समाजाबद्धल जागरूकता निर्माण होईल. या शिक्षणातून विद्यार्थी केवळ आपले करिअर घडवतात असे नसून, त्यांचा एक जबाबदार आणि विचारी नागरिक म्हणून विकास होतो.

काहीही झालं, तरी कोणत्याही व्यवसायामध्ये आपण मुख्यत: माणसांशी व्यवहार करत असतो. त्यामुळे माणसांबद्दल माहिती असणे, त्यांच्याशी योग्य पद्धतीने संभाषण करणे, व्यवहार करणे हे प्रत्येकाला यायला हवेच. ते कौशल्य भाषाविकासातून प्राप्त होते तसेच सगळ्यामध्ये आपण 'अर्थ' शोधत असतो. तो शोधण्याचे शिक्षण आणि पद्धत, भाषा आणि साहित्याच्या, मानव्यशास्त्राच्या अभ्यासातूनच प्राप्त होते. या विषयांच्या अभ्यासातून मानवी वर्तणूक, समाजाची बांधणी, इतिहासातून आलेले शहाणपण आणि त्याचा वर्तमानात, उज्ज्वल भविष्यासाठी करायचा उपयोग अशासारख्या बाबी व्यवहारात आणता येतात.

तंत्रज्ञानाचा अभ्यास आणि वापर महत्त्वाचा आहेच. आज अनेक कंटाळवाणी, तोच तोपणा असलेली कामे संगणक आपल्याला चुटकीसरशी, एका क्लिकवर करून देताना आपण अनुभवतो आहे. त्यात आपली वाचलेली ऊर्जा आणि वेळ समाजाच्या समस्यांची उकल करण्यासाठी वापरणे आवश्यक आहे. आपण तसे करतो का हा प्रश्न आहे. संगणकाच्या मदतीने कृत्रिम बुद्धिमत्तेच्या साहाय्याने अनेक कामांमध्ये सुलभता आली असली तरी या बुद्धिमत्तेला काही नैसर्गिक मानवी कौशल्ये आत्मसात करता येणे शक्य नाही. कृत्रिम बुद्धिमत्ता माहितीचे संकलन करते, परंतु विचारांचे सर्जन मानवी मेंदूच करू शकतो. ते एआय करू शकणार नाही. काही सॉफ्ट स्किल्स आहेत जी कृत्रिम बुद्धिमत्ता निर्माण करू शकत नाही. उदाहरणार्थ, टीमवर्क, सहकार्य, सहनशीलता, बदलांशी जुळवून घेण्याची क्षमता, सामाजिक गतिशीलता, इत्यादी. नॅशनल ब्युरो ऑफ इकनॉमिक रिसर्चच्या एका अभ्यासात असे निरीक्षण नोंदवले आहे की यांत्रिकीकरणाच्या वर्चस्वामुळे कामगारांमध्ये सामाजिक कौशल्यांची कमतरता दिसून येते. त्यामुळेच अभियांत्रिकी, वैद्यकशास्त्र, संगणकशास्त्र अशा अभ्यासक्रमांत सॉफ्ट स्किल्सच्या अभ्यासाचा समावेश केलेला आहे. 'लिंक्डइन' या समाजमाध्यमाने २०१९मध्ये केलेल्या अभ्यासानुसार भावी कर्मचाऱ्यांमध्ये त्यांच्या विषयात पारंगत असण्याबरोबर सर्जनशीलता, सहयोग अशा गुणांच्या अधारवरच नियुक्ती केली जाईल.

ऑक्स्फर्ड विद्यापीठाने ह्युमॅनिटीजचे महत्त्व स्पष्ट करताना म्हटले की 'ह्युमॅनिटीज शिकून विद्यार्थी विद्यापीठातून बाहेर पडतात तेव्हा त्यांच्याबरोबर ते समाजाला उपयुक्त कौशल्ये आणि महत्त्वाचे सामाजिक प्रश्न हाताळण्याची क्षमता घेऊन जात असतात. खोट्या बातम्या ओळखण्यापासून, हवामान बदल, ऊर्जा प्रश्न, कृत्रिम बुद्धिमत्तेचा नैतिक वापर अशा अनेक विषयांशी सामना करण्यासाठी ते सज्ज असतात.' ऑक्स्फर्ड विद्यापीठाच्या सेंटर फॉर स्किल्स. नॉलेज, ॲन्ड ऑर्गनायझेशनल परफॉरमन्स SKOPE यांच्या पाहणीनुसार उद्योगांच्या कर्मचाऱ्यांकडून अपेक्षा बदलल्या आहेत. त्यांच्यामध्ये निवेदन कौशल्य, कथनाचे कौशल्य आणि संप्रेषण


कौशल्य असणे आवश्यक आहे. फोर्बेसच्या एका पाहणीतही असे स्पष्ट दिसते की ह्युमॅनिटीजच्या अभ्यासातून विद्यार्थ्यांना जी कौशल्ये प्राप्त होतात– जशी, विश्लेषण करण्याची क्षमता, प्रश्न विचारण्याचे कुतूहल, नावीन्याचा ध्यास या सगळ्याची कृत्रिम बुद्धिमत्तेच्या क्षेत्रात नितांत गरज आहे. अखेर सर्व ज्ञान एक असल्याने एक विषय दुसऱ्या विषयाला पूरक ठरत असतो. बाजारात येणारा प्रत्येक ॲप हा माणसांच्या परस्परसंवादावर आधारलेला असतो. त्यामुळे मानवी स्वभाव, सवयी, विचार हे जितके जास्त कळतील तितका आपला संगणकीय व्यवहार वास्तवाच्या जास्त जवळ येईल.

तिओ ची हेन हे २०२४पासून सिंगापूरचे वरिष्ठ मंत्री आहेत. त्यांनी १९९७ ते २००३मध्ये शिक्षणमंत्री आणि २००३ ते २०११मध्ये संरक्षणमंत्री पदाची जबाबदारी पार पाडली आहे. शिक्षणमंत्री असताना त्यांनी साहित्य आणि ह्युमानिटीज या विषयांचे शैक्षणिक अभ्यासक्रमातले महत्त्व स्पष्ट करताना म्हटले, गणित आणि विज्ञानाच्या शिक्षणाने मोठमोठ्या बंदुका निर्माण करता येतात. मात्र साहित्य आणि ह्युमॅनिटीज त्या बंदुका कधी वापरायच्या याचे मार्गदर्शन करतात.


थोडक्यात काय, तर विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सर्वसमावेशक अभ्यासक्रमांची निर्मिती होणे हे महत्त्वाचे ठरते.

**– डॉ. अंजली पटवर्धन–कुलकर्णी**
anjali. ptwrdhn@gmail.com


## वाचकदिनी प्रसिद्ध झालेली पुस्तके




**मूल्य ५०० रुपये**
**सवलतीत ३०० रुपये**



**मूल्य १२५ रुपये**
**सवलतीत ७५ रुपये**





**मूल्य ३०० रुपये**
**सवलतीत १८० रुपये**



**मूल्य ३०० रुपये**
**सवलतीत १८० रुपये**



**मूल्य ३०० रुपये**
**सवलतीत १८० रुपये**



**मूल्य १५० रुपये**
**सवलतीत १०० रुपये**


**मूल्य ३५० रुपये**
**सवलतीत २१० रुपये**



**मूल्य ३०० रुपये**
**सवलतीत १८० रुपये**





**मूल्य १५० रुपये**
**सवलतीत १०० रुपये**



**मूल्य ५०० रुपये**
**सवलतीत ३०० रुपये**


**मूल्य १५० रुपये**
**सवलतीत १०० रुपये**


**मूल्य १५० रुपये**
**सवलतीत १०० रुपये**


**मूल्य १५० रुपये**
**सवलतीत १०० रुपये**



# अरुणा ढेरे
## प्रतिभावंत साहित्यिक

**संजीवनी खेर**

अरुणा ढेरे यांचे नाव घेतले की एक सौम्य, आर्जवी बोलणारे व्यक्तिमत्त्व डोळ्यांसमोर येते. एका प्रकांड पंडिताच्या छायेत वाढूनही स्वतंत्र प्रतिभा नि प्रतिमा ठसवणारी साहित्यिक आहे डॉ. अरुणा ढेरे. किती वेगवेगळ्या विषयांवर त्यांनी लिहिले आहे. अगदी थेरी गाथा असो की विस्मृतिचित्रे असो की दुर्गा भागवत यांच्या लेखनाचे संपादक असो किंवा दिवाळी अंकांतील लेखन असो. सर्वत्र आपली भाषा, संस्कृती, परंपरा यांचा सजग अभ्यास आणि लेखनात मुरलेली आपुलकीची तरी विद्रोहाची कास न सोडण्याची किमया त्यांना साधली आहे. घरी दिवसरात्र संशोधक वडिलांचा डॉ. रा.चिं. ढेरे आणि साहित्यिकांचा गोतावळा जमलेला असे. ह्या साऱ्याचे दडपण बालपणी वा तरुणपणी येऊ न देता आपली स्वतंत्र वाट शोधणे व चोखाळणे सोपे नव्हते. घरी साहित्यिक वैभव होते पण आईवडिलांना संसारात लक्ष्मीबाईंची कमतरता असे. पण ते त्यांनी कधी जाणवू दिले नाही. त्या काळात लोककलावंतांच्या कामाशी आणि व्यक्तिमत्त्वाशी परिचय झाला, त्यातूनच परंपरातील कलांशी नाते जुळले. त्यात संशोधन अभ्यास केला गेला, लेखनही केले.

डॉ. अरुणा ढेरे यांचे शालेय व महाविद्यालयीन शिक्षण पुण्यात नूतन मराठी विद्यालय, हुजूरपागा, गरवारे व सर परशुरामभाऊ महाविद्यालय येथे झाले. त्या बी.ए.ला, मराठी विषयात, पुणे विद्यापीठात सर्वप्रथम आल्या आणि सुवर्णपदकासहित अकरा पारितोषिके मिळवली. १९७९ साली एम.ए.लाही मराठी विषयात, पुणे विद्यापीठात सर्वप्रथम येण्याचा मान त्यांनी मिळवला आणि तेरा पारितोषिके पटकावली. १९७७ साली त्यांनी भारतीय विद्यापदविका प्राप्त केली, तीही टिळक विद्यापीठात सर्वप्रथम येऊन आणि यशवंतराव चव्हाण पारितोषिक मिळवून. १९८६ साली पुणे विद्यापीठात, डॉ. भालचंद्र फडके यांच्या मार्गदर्शनाखाली 'स्वातंत्र्योत्तर मराठी कथा-कादंबऱ्यांचा आदिबंधात्मक अभ्यास' (जी.ए. कुलकर्णी आणि चिं.त्र्यं.खानोलकर यांच्या विशेष संदर्भात) या विषयावर



अरुणा ढेरे


प्रबंधलेखन करून विद्यावाचस्पती (पीएच.डी.) ही पदवी मिळवली.


पुणे विद्यापीठाच्या शैक्षणिक माध्यम संशोधन केंद्रात अध्यापक-निर्माती म्हणून काम केले. राज्य शिक्षणशास्त्र संस्थेत साहित्य-विभागप्रमुख आणि 'पसाय' या मासिकाची संपादिका म्हणून काम केले. त्यानंतर मात्र आज पूर्णवेळ लेखन आणि संशोधनकार्य करत आहे. १९८३ साली माध्यम संशोधन केंद्रातर्फे त्यांनी जपानचा अभ्यासदौरा केला, तर १९८६ साली अमेरिकेत तीन महिन्यांचा कम्युनिकेशन स्टडीजचा अभ्यासक्रम पूर्ण केला.

लेखन-संशोधन हेच जीवितकार्य मानणाऱ्या, व्रतस्थ वृत्तीच्या वडिलांचे घरातच पुस्तकांचे ज्ञानभांडार बालपणापासून पाहत आल्या आहेत. तिच्या मूळच्या कविवृत्तीचे, रसिकतेचे

संवर्धन झाले. वडिलांबरोबर त्यांनी भारतभर प्रवास केला; त्यातून अनुभवाचे जग विस्तारत गेले. समाजशास्त्र, मानसशास्त्र इत्यादी साहित्याशी निगडित शास्त्रांचा आवश्यक तो अभ्यास त्यांनी केला, तसेच वेद, उपनिषदे, रामायण, महाभारत, जैन, बौद्ध, ख्रिस्ती धर्मग्रंथ यांच्याशीही ओळख करून घेतली. दंतकथा, मिथके यांचेही महत्त्व जाणले.

आपली स्वतंत्र प्रज्ञा आणि प्रतिभा यांच्या बळावर त्यांनी काव्य, कथा, कादंबरी इत्यादी सर्व लेखनातून परंपरेतील सत्त्व आणि नवतेतील सामर्थ्य प्रकट केलेले दिसते. त्यांचा मूळ पिंड कवयित्रीचा असला, तरी कवितेबरोबरच कथा, कादंबरी, ललित लेख, अनुवाद, समीक्षा, लोकसाहित्यविषयक, सामाजिक इतिहासपर, किशोरांसाठी व कुमारांसाठी लेखन असे सर्व वाङ्मयप्रकार त्यांनी हाताळले आहेत. संपादनेही केलेली आहेत.




प्रारंभ, यक्षरात्र, मंत्राक्षर आदी त्यांचे काव्यसंग्रह होत. 'स्त्री आणि तिचे भावजीवन' हा त्यांच्या सर्वच लेखनाचा केंद्रबिंदू असला तरी, कविता या माध्यमातून तो प्रकर्षाने जाणवतो. स्त्रीच्या जीवनातील विविध अवस्था, तिची मानसिक आंदोलने, तिने जोडलेले भिन्नस्तरीय नातेसंबंध या सर्वांचे चित्रण अरुणा ढेरे मोठ्या ताकदीने करतात. पौराणिक व्यक्तिरेखांचा, कथांचा त्यांच्या मनावरील प्रभाव मोठा असल्याने, बहुतेक कथाबीजे ही त्यातूनच उचलली आहेत. 'भगव्या वाटा' 'कृष्णकिनारा', 'नागमंडल', 'अज्ञात झऱ्यावर रात्री' अशा कथांमधून मानवी जीवनातील विविध नातेसंबंध दिसून येतात.

'रूपोत्सव', 'मनातलं आभाळ', 'लावण्ययात्रा', 'काळोख आणि पाणी' यांसारख्या ललित लेखसंग्रहांतून तर 'वेगळी माती वेगळा वास', 'माणूस आणि माती' यांतून माणूस आणि निसर्ग यांचे हृद्य नाते टिपलं आहे.

'विस्मृतिचित्रे' (१९९८) हे त्यांचे महत्त्वाचे पुस्तक होय. त्यात त्यांनी १९ व्या शतकातील सुधारणा स्त्रीकेंद्री होती. त्यात स्त्रियांनी धर्म आणि समाजरचनेचा जो वेध घेतला, एकप्रकारे त्याला आव्हानही दिले, त्यातून नवी स्त्री घडली. स्त्रीची झेप त्यात दिसते. सर्व जातीधर्मांच्या विविध सामाजिक स्तरांतील स्त्रियांनी धडाडी दाखवली. त्याकाळात स्त्री स्वत:कडे सजग दृष्टीने पाहू लागली, स्वत:तील शक्यता आजमावून समाजातील कुरीतीना आव्हान देऊ लागली. समाज बदलायचे हे आपले कर्तव्य आहे समजून आंतरिक तळमळीने काम करू लागली या स्त्रियांत देशीविदेशी स्त्रियाही होत्या. पारशी, ज्यू मराठी साध्यासुध्या, जुन्या मतांच्या घरातील स्त्रिया, बंगाली प्रगतिशील घरातल्या स्त्रिया यांचा शोध घेऊन त्यांनी लेखन केले आहे. ज्याला आज संदर्भ मूल्य प्राप्त झाले आहे.

त्या संस्कृतीचा अभ्यास वा संशोधन करतात तेव्हा ते फक्त आपला धर्म, भाषा, परिसर असे मर्यादित नसते. म्हणूनच त्यांनी 'थेरी गाथा'चा अभ्यास करून त्या गाथेतील स्त्रीची निर्वाण मिळवण्यातली असोशी, धडपड आणि अडचणी कशा, कोणत्या भाषेत मांडल्या आहेत यांचा वेध घेतला आहे.त्यातील वेगवेगळ्या सामाजिक गटातल्या जसे, श्रेष्ठीच्या, वेश्यालयातल्या, अगदी गरीब घरातल्या तरुण, वयस्क सर्व प्रकारच्या स्त्रियांनी आपली मनोगते ह्या गाथांमध्ये मांडली आहेत. सामान्य गृहिणीला आपल्या घरादारांची ओढ कमी करणे किती जड जात होते, हे कळते त्यांच्या काव्यातून. निर्वाणाचा क्षण त्यांच्या आयुष्यात आला का? केव्हा नि कसा आला? त्यांच्या काव्यात त्यांचे सुखदु:ख कसे पाझरते? जीवनाच्या ज्ञानाचा शोध ही कठीण गोष्ट साध्य करताना त्यांना स्वत:शी कसे झगडावे लागले. धर्माची सम्यक रूप समजणे, धर्माची मूळतत्त्व कळणे ह्यात स्त्रीपुरुष भेद असू शकत नाही. त्यांच्या काव्यात आपण बुद्धाच्या मुखजात कन्या आहोत असे त्या समजत. मौखिक उपदेशातून जन्मलेली कन्या झाली असे म्हणणाऱ्या थेरी आपल्या ह्या पुनर्जन्माकडे कसे पाहतात हे वाचणे आनंददायी होते ते अरुणा ढेरे यांनी दिलेल्या ह्या थेरी गाथांच्या विवरणाने. 'त्रिपीटके' साधारणत: इ.स.पू. पहिल्या शतकात संग्राहित केली गेली असावीत. त्यात बुद्धवचने आहेत आणि ज्यात थेरी आणि थेर (स्थवीर) यांचीही वचने आहेत. त्यात सव्वापाचशेहून अधिक उदाने– स्वाभाविक ऊर्मीने निघालेले उद्गार– आहेत. हा मोठा ठेवा सोपा करून सांगायचे कौशल्य लेखिकेचे आहे.

त्यांच्या कौशल्यामुळे संपादित केलेल्या दुर्गाबाईंच्या पुस्तकात वाचकाला बाईंच्या आवाक्याचा अंदाज येतो. दुर्गाबाई भागवतांच्या अभ्यासाचा, संशोधानाचा परीघ लोकसंस्कृती, प्राचीन भारतीय संस्कृती, आदिवासी जीवन, बौद्ध साहित्य, मानवी विद्या, प्राणी जीवन, वनस्पती जीवन, शिवाय अनुवाद असे विस्तृत होते. शिवाय ललित लेखनानेच, 'ऋतुचक्र'ने, त्या प्रथम प्रसिद्धीच्या झोतात आल्या. हा सारा काळ विसाव्या शतकाचा पूर्वार्ध होता जेव्हा स्त्री स्वत:चे स्थान शोधत होती. सामाजिक दबाव, अवहेलना वाट्याला येण्याची भीती मनात असे. अशा वेळी दुर्गाबाईंनी संशोधनासारखे अवघड विषय लेखनासाठी निवडले. या साऱ्याचे महत्त्व आणि स्त्रीमुक्तीचा अबोल मार्ग निवडणाऱ्या स्त्रीचे लेखन अरुणाताईंनी एकत्र

करून त्याला मराठी स्त्रीच्या ज्ञानपरंपरेला ठसठशीतपणे लोकांसमोर मांडले. त्याच वेळी दुर्गाबाईंची गांधीविचारांमुळे आलेली निर्भयता आणि मुक्तता हे गुण ठळकपणे मांडले. त्याचा परिचय झाला, जेव्हा दुर्गाबाईंनी मराठीजनांना आणीबाणीत साहित्यिकाचे निर्भयपणे वागण्याचे महत्त्व दाखवून दिले. शिवाय सरकारी मदत नाकारणे वा पुरस्कार नाकारण्याचा बाणेदारपणाही बाईंनी दाखवला. त्यामुळेच त्यांचा दरारा साहित्यविश्वात आणि समाजात होता. त्यावेळी त्यांनी लोकप्रियता वा लोकानुनय केला नाही. प्रसंगी एकटे पडलो तरी योग्य वाटेल तेच केले. म्हणूनच आजदेखील त्या व्यक्तिस्वातंत्र्याचा आदर्श वाटतात. व्यासपर्व, जातककथा आठ खंड, अस्वल, खंड्या आणि कदंब ही पुस्तके मराठीतील अव्वल दर्जाची देणगी आहे. याखेरीज त्यांचे इंग्रजीतील संशोधनपर लेख असा संपूर्ण धांडोळा अनेक अभ्यासू लेखकांकडून अरुणाताईंनी घेतला आहे. अरुणाताईंचे हे लेखनही त्यांच्या कविता आणि कथा-कादंबऱ्याइतकंच रोचक आणि महत्त्वपूर्ण आहे.

त्यांचे मला सर्वात प्रभावी वाटले ते म्हणजे ९२व्या साहित्यसंमेलनाच्या व्यासपीठावरून दिलेले भाषण. आपल्या मराठी मनाला उत्तेजना, प्रेरणा आणि आपुलकीने देणे तसेच ठामपणे समजावणे हेही त्यांनी त्यातून साधले आहे. त्या वेळची घटना संमेलनाला गालबोट लावणारीच झालेली होती. काही लोकांच्या दबावाखाली संमेलनाच्या पाहुण्या म्हणून बोलावलेल्या नयनतारा सहगल यांचे आमंत्रण अचानक रद्द केले गेले. वास्तविक त्यांची लेखनशैली आपल्याला कळली असती. त्यांचे घराणे विद्याभ्यास करणारे होते. त्यांचे वडील रणजित पंडित यांनी काश्मीरच्या प्रसिद्ध राजतरंगिणी ह्या ऐतीहासिक ग्रंथाचा इंग्रजीत अनुवाद केला होता. त्यांची आई म्हणजे देशाच्या पहिल्या राजदूत आणि पंडित नेहरूंची बहीण विजयालक्ष्मी. या घराण्याने देशासाठी स्वातंत्र्यलढ्यात तुरुंगवास भोगला. नेहरूंनी अनेक ग्रंथ त्या काळात लिहिले. अशा वलयांकित साहित्यिकेची अशी अवहेलना व्हावी ही साहित्याच्या मंचाला शोभणारी कृती नव्हती.

त्याबद्दल अरुणाताईंनी ठामपणे सुनावले की साहित्यबाह्य गटाने आणलेला दबाव साहित्यिक मंचाने चालवून घेऊन आपला दुबळेपणा दाखवू नये. आज अनेक आव्हानांना साहित्य तोंड देत आहे. आपला अभिव्यक्तीचा अवकाश आक्रसू देण्यास आपणच कारणीभूत ठरू नये. प्रकाशक, लेखक, वाचक साऱ्यांनीच आपली अभिव्यक्तीची उंची वाढवली पाहिजे. त्यासाठी लढा द्यायला तयार झाले पाहिजे. अशी आव्हाने पेलायची ताकत वाचनाने आणि साहित्याने निर्माण केली पाहिजे, असे निवेदन आणि त्यांचे स्पष्टीकरण त्यांच्या भाषणात होते. त्यासाठी त्यांनी संतांनी जो समाजाविरोधात विद्रोह केला आणि परिणाम भोगले त्याचे उदाहरण दिले. तो त्यांचा लढा नसता तर मराठीजनांना स्वकीय आणि परकीय अन्यायाविरुद्ध उभे राहायची ताकत आली नसती. अरुणा ढेरे यांनी चुकीच्या प्रथांविरुद्ध ठाम शब्दांत भाषण दिले.

अरुणाताईंनी १९७६ साली, आणीबाणीच्या काळात, लेखन आणि सत्याग्रह यांमुळे पावणेतीन महिन्यांच्या तुरुंगवासही सोसला.

महाराष्ट्र शासनाचे, तसेच विविध मान्यवर संस्थांचे अनेक पुरस्कार डॉ. अरुणा ढेरे यांना मिळालेले आहेत. त्यांमध्ये 'लावण्ययात्रा'ला महाराष्ट्र शासनाचा पुरस्कार, 'मंत्राक्षर'ला 'बालकवी' पुरस्कार तसेच महाराष्ट्र साहित्य परिषदेतर्फे मिळालेले कवी 'यशवंत' पारितोषिक 'सुंदर हे जग'ला मिळालेला राष्ट्रीय पुरस्कार मिळालेले आहेत.

एकदा नेवाशाला ज्ञानेश्वरांच्या पैसाच्या खांबाला टेकून बसल्या असताना ज्या भावना मनात आल्या त्या एका ललित लेखात लिहिल्या आहेत. ज्या मुलायम शब्दांत तो लेख लिहिला आहे ते वाचून परंपरेत बुडलेली व्यक्ती किती भावुक होऊ शकते याचा प्रत्यय येतो. एका तरुण मुलाने समाजाचे त्रास सोसूनही जगाला एका असीम प्रेमाचा संदेश दिला. जगाला एक अद्वितीय प्रार्थना दिली. हे आक्रीत घडले नेवाशाला. हे पसायदान मराठीचेच नव्हे तर संपूर्ण विश्व कवेत घेणारे प्रतिभावंतांचे स्वप्न आहे. परतत्त्वाच्या स्पर्शाने उजळलेले हे काव्य अलौकिक आहे. या समाजाने छळलेल्या मुलांबद्दल वाचणाऱ्याचे आतडे तुटेल अशा शब्दांत त्यांनी लिहिलेले आहे. ती परिस्थिती आपल्या डोळ्यांसमोर उभी राहते. अशा स्थितीत वाढलेल्या मुलाने पसायदानात मागितले काय तर चराचरासाठी मैत्रभाव, दुरित जावो नव्हे तर त्यांचे दुष्ट विचार जावोत. यत्किंचितही अहं, दुरावा, दुष्टता, कटुता नाही असे निर्मळ लेखन असलेला हा सर्वांची माऊली कधी झाला? अशा लेखात त्यांचे शब्दलालित्य मुग्ध करते, जणू एखादी कविता असावी असे गद्य त्या लिहितात.

त्यांच्या कवितात अनेकदा स्त्रीचे एकटेपणाचे दुःख मुखर होतं. त्यातील उदाहरण देऊन लेख संपवते.

पागोळीसारखी, झरते उदास
लागून आंतली, झड राही
सावळ्या छायेला, पांघरू ये नभ
आतले मळभ, दाट होई
दिशा सारवल्या, कालवले सारे
सुहृदाला भूल, दूर नेई
भिजता पापणी, 'पूस' म्हणणारे
जवळ आपुले, कुणी नाही

**– संजीवनी खेर**
sanjeevanikher@gmail.com

# ठाण्यात रंगला ग्रंथालीच्या वाचकदिनाचा भव्य सोहळा

ग्रंथालीचा सुवर्णमहोत्सवी वर्षातील वाचकदिन ठाणे येथील हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे स्मारकात २३ डिसेंबर ते २५ डिसेंबर हे तीन दिवस पार पडला. 'ग्रंथाली'चे विश्वस्त सुदेश हिंगलासपूरकर यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या वाचकदिनाचे मराठी ग्रंथसंग्रहालय, ठाणे आणि विराट सामाजिक व सांस्कृतिक मंच यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजन केले होते. भाग्यश्री फाउंडेशन; टॅग; वयम्, महाराष्ट्र सेवा संघ, मुलुंड; माणिकराव कीर्तने वाचनालय, वाशी; आदी संस्थांचा सहयोग त्याला लाभला होता. खासदार नरेश म्हस्के, उद्योजक सुहास मेहता यांचे मोठे पाठबळ त्याला लाभले. एस.के. डेव्हलपर्स यांचेही साहाय्य मिळाले. महाराष्ट्र टाइम्स, लोकमत, ठाणे वैभव, सकाळ, लोकसत्ता अशा वर्तमानपत्रांनी वाचकदिनाचे वृत्तांकन करून साहित्य संमेलनासारखेच महत्त्व दिले. कवी, लेखक, उद्योजक यांच्याशी संवाद व अशोक हांडे यांची मुलाखत आदी कार्यक्रमांचे अरुण जोशी यांनी डॉ. मृण्मयी भजक व डॉ. लतिका भानुशाली यांच्या सहकार्याने केलेले नियोजन उत्तम होते.

वाचकदिनाचं बिगुल वाजलं ते शालेय, महाविद्यालयीन व खुल्या गटासाठी घेतल्या गेलेल्या अभिवाचनस्पर्धा, कथाचित्रस्पर्धा, रीलची स्पर्धा, अक्षररांगोळी स्पर्धा, या विविध स्पर्धांनी. या सगळ्या स्पर्धांवर शिरपेच चढवला तो 'ज्ञानपीठ प्रश्नमंजुषा स्पर्धेने'! मुंबईतील २५ महाविद्यालयांमध्ये या स्पर्धा घडवण्याची यशस्वी जबाबदारी डॉ. लतिका भानुशाली यांनी सांभाळली. ठाण्यातील २० केंद्रांवर खुली स्पर्धाही घेण्यात आली. ज्ञानपीठप्राप्त साहित्यिकांचे साहित्य व एकूणच मराठी साहित्य यावर आधारित या प्रश्नमंजुषा स्पर्धेने वाचकांमध्ये उत्साह निर्माण केला. 'या स्पर्धेच्या निमित्ताने आम्ही पुन्हा एकदा मराठी साहित्याकडे सजगतेने वळलो', अशा प्रतिक्रिया खुल्या गटातील स्पर्धकांनी व्यक्त केल्या.

ज्ञानपीठ प्रश्नमंजूषा स्पर्धेतील विजेत्यांना प्रत्यक्ष ज्ञानपीठ पुरस्कारप्राप्त लेखक डॉ. भालचंद्र नेमाडे आणि महाराष्ट्र टाइम्सचे संपादक पराग करंदीकर यांच्या स्वाक्षऱ्या असलेली प्रशस्तिपत्रे देण्यात आली.

स्पर्धांच्या २३ तारखेला सकाळी झालेल्या बक्षीस समारंभानंतर, सायंकाळी कार्यक्रमस्थळाचा परिसर साहित्यिक व वाचकांच्या लगबगीने फुलून गेला. भारत सासणे, डॉ. तारा भवाळकर, डॉ. सिसिलिया कार्व्हालो, शरद काळे, प्रवीण दवणे, महेंद्र कोंडे, मोहन काळे, वीणा सामंत आदी शंभरएक साहित्यिकांच्या पुस्तकांच्या मुखपृष्ठांचे जॅकेट परिधान करून निघाली ग्रंथवारी! 'वाचाल तर वाचाल', 'वाचा मराठी, बोला मराठी', 'मराठी लिहा' आदी घोषणा देत तीन हात नाका परिसरात ग्रंथवारी उत्साहात निघाली. सेल्फी, व्हिडिओ, ग्रुप फोटो घेत सगळ्यांनी या वारीचा आनंद घेतला. ही वारी ठाकरे सभागृहाच्या प्रवेशद्वारापाशी येताच विविध घोषणांनी परिसर दुमदुमला आणि 'ठाणे वैभव'चे संपादक मिलिंद बल्लाळ, चांगदेव काळे, विद्याधर ठाणेकर आदींच्या हस्ते मुख्य द्वारावरील फीत कापून वाचकदिनाचे उद्‌घाटन झाले. ठाकरे सभागृहाच्या प्रांगणात तिन्ही सांजेच्या वेळेस गणपतीअथर्वशीर्षाच्या स्वरांच्या लयीवर सुलेखनकार अच्युत पालव यांच्या चमूने लांबलचक पांढऱ्या रंगाच्या पट्ट्यांवर मुळाक्षरांचे विलोभनीय सुलेखन केले. यानंतर घेतलेल्या सुलेखनाच्या कार्यशाळेत अच्युत पालव म्हणाले, की कॅलिग्राफी फक्त सुंदर हस्ताक्षर नाही. त्यासाठी अक्षरे, भाषा समजून घ्यावी लागतात. भाषा आणि सुलेखन यांचा संगम केला तर छान अक्षरे जन्माला येतात. ज्येष्ठ संपादक व लेखिका मोनिका गजेंद्रगडकर यांनी फीत कापून प्रदर्शनांचे उद्‌घाटन केले आणि उपस्थितांनी प्रदर्शनांना भेट दिली.

कार्टूनिस्ट कंबाइनच्या सहकार्याने शं. वा. किर्लोस्कर, बाळासाहेब ठाकरे, श्रीकांत ठाकरे, विकास सबनीस, ज्ञानेश सोनार, विजय पराडकर, प्रशांत कुलकर्णी, प्रभाकर वाईरकर, विवेक मेहेत्रे, चारुहास पंडित, उमेश कवळे अशा अनेक व्यंगचित्रकाराच्या व्यंगचित्रांचे प्रदर्शन रसिकांना पाहता आले. चित्रकार विजयराज बोधनकर यांच्या साहित्यिकांच्या स्वभावचित्र प्रदर्शनाने सगळ्यांचे लक्ष वेधून घेतले होते. अरुण पुराणिक यांनी सिनेमाविषयक मांडलेले प्रदर्शन, रोहन पोरे व प्रभाकर वाईरकर यांच्या व्यंगचित्रांचे प्रदर्शन आणि अच्युत पालव यांचे सुलेखन प्रदर्शन अशा प्रदर्शनाने सजलेल्या दालनांनी रसिकांना या ख्यातनाम कलावंतांच्या आविष्काराचा आनंद घेता आला. त्याचे संयोजन संजय मिस्त्री यांनी केले होते. डोंबिवलीच्या 'पै फ्रेण्ड्स लायब्ररी'चे पुस्तक आदानप्रदान, नामवंत प्रकाशकांच्या दर्जेदार पुस्तकांची विक्री आणि दुसरीकडे सभागृहात घडणारे एकापेक्षा एक सरस कार्यक्रम, चर्चा, पुस्तक

प्रकाशन सोहळे, मुलाखती, परिसंवाद या सगळ्यामुळे ठाकरे सभागृहाला 'हॅपनिंग प्लेस'चे रूप आले होते.

वाचकदिनाच्या दुसऱ्या दिवशी, २४ डिसेंबर रोजी प्रथम सत्रात प्राजक्त देशमुख, स्वप्नील गांगुर्डे, रुचिरा सावंत, प्रदीप कोकरे, प्रियांका पाटील, चैतन्य सरदेशपांडे, मुक्ता बाम, हिनाकौसर खान, किरण क्षीरसागर या प्रभावशील तरुण लेखकांशी डॉ. मृण्मयी भजक व डॉ. लतिका भानुशाली यांनी संवाद साधला. 'नवी पिढी नक्कीच वाचते. अर्थात वाचण्याची माध्यमे बदलली आहेत. मुख्यत्वे दृक्‌श्राव्य माध्यम अधिक प्रभावी ठरले आहे. यामुळे पारंपरिक वाचन मागे पडल्याचे दिसत असले तरी वाचन फक्त पुस्तकांपुरते मर्यादित नसते.' असे मत या तरुण लेखकांनी व्यक्त केले. सद्य:स्थितीतील आव्हाने, लेखकांचे अनुभव, लेखनातील प्रयोग अशा विविध प्रश्नांवरील चर्चा व अखेरीस अभिवाचन अशा रितीने हे सत्र घडले.

त्यानंतरच्या सत्रात ज्येष्ठ संपादक महावीर जोंधळे आणि ग्रंथालीचे आरंभीचे कार्यकर्ते साहेबराव चवरे यांच्या हस्ते डॉ. सिसिलिया कार्व्हालो यांच्या 'निरागसतेचा नजराणा' हे बालकांच्या चित्रपटांवरील आस्वादात्मक पुस्तक, सदानंद डबीर यांचा 'लहजा' हा गझलसंग्रह, डॉ. वसुधा सहस्रबुद्धे यांचे 'भय आणि साहसाच्या सोबतीने' हे अनुवादित पुस्तक, दीपक मच्याडो यांचा 'सारंगीचे सूर' हा कथासंग्रह ही पुस्तके प्रकाशित झाली. यावेळी बोलताना महावीर जोंधळे यांनी महाराष्ट्रातील प्रकाशक, लेखक, विचारवंत यांनी मराठी साहित्य दूरवर पोचवण्यासाठी एकत्र येण्याचे आवाहन केले. पुस्तक प्रकाशन समारंभाचे सूत्रसंचालन डॉ. निर्मोही फडके व अश्विनी भोईर यांनी केले.

दुसऱ्या दिवसाची सांगता झाली ती कविसंमेलनाने. 'कवितेचा तरुण स्वर' या कार्यक्रमात विविध सामाजिक प्रश्नांवर भाष्य करणाऱ्या कविता युवा कवी-कवयित्रींनी सादर करत रसिकांची दाद मिळवली. आदित्य दवणे, हर्षदा सुंठणकर, नैनेश तांबे, तानाजी बोऱ्हाडे, इंद्रजित घुले, साहिल मावलकर, रुद्राक्ष पातरे, आशिष वरघणे, भारत सोळंके यांनी युद्धामुळे लहान मुलांची होणारी ससेहोलपट, आरोग्याचे महत्त्व, ग्रामीण युवकांची मानसिकता, वारी, वर्णभेद, वडील, महिलांच्या आत्महत्या अशा विविध आशयांवरील कविता सादर केल्या. कविसंमेलनाचे सूत्रसंचालन सिद्धार्थ देशपांडे यांनी केले.

२५ डिसेंबर रोजी, तिसऱ्या दिवशीचे पहिले सत्र चांगलेच रंगले ते ज्ञानपीठप्राप्त लेखक डॉ. भालचंद्र नेमाडे यांच्या खुमासदार शैलीतील परखड उपरोधिक संवादामुळे. चित्रकार विजयराज बोधनकर एकीकडे नेमाडे यांचे कॅनव्हासवर चित्र रेखाटत असताना, कुमार केतकर यांनी नेमाडेंना विविध प्रश्न विचारत बोलते केले. आपल्याकडे रोज शोषण, लूट, दुसऱ्याला फसवणे सुरू आहे. आदिवासी भागात गरजेपुरतेही पाणी मिळत नाही, आणि शहरी भागात सत्तर टक्के पाणी वापरतात... आपण सर्व एक आहोत. स्वार्थी आणि दुष्ट लोकांमुळे राष्ट्रे निर्माण झाली. राष्ट्रीयतेचे खूळ डोक्यातून काढले पाहिजे... साक्षरतेमुळे दुर्गुण वाढीस लागले आहेत... सगळ्या देशाला साक्षर झाल्यामुळे फसवले जाते... असली साक्षरता काय कामाची? माणुसकी धर्म पाळायला पाहिजे... आपल्याला भाषेतून जगाकडे पाहण्याची दृष्टी मिळते... इंग्रजी भाषा ही जागतिक भाषा नाही... आजवर आपण कितीतरी वाईट गोष्टी केल्या, खरा इतिहास सांगण्याची गरज आहे... असे स्पष्ट व उपरोधिक भाष्य करत साहित्य, समाज, संस्कृती, जात-धर्म विविध मुद्द्यांवर नेमाडे यांनी मोकळेपणाने आपली मते मांडली. 'ग्रंथाली'चे संस्थापक-सदस्य आणि ज्येष्ठ संपादक दिनकर गांगल यांच्या हस्ते भालचंद्र नेमाडे यांचा तर ज्येष्ठ पत्रकार व लेखिका संजीवनी खेर यांच्या हस्ते प्रतिभाताई नेमाडे यांचा सन्मान करण्यात आला. याच सत्रात मोहन काळे यांच्या 'अखेर मी माझीच समजूत घातली', नीलकंठ कदम यांच्या 'कविता : आस्वाद आणि समीक्षा', महेंद्र कोंडे यांच्या 'बिलोरी', किरण येले यांच्या 'बाई बाई गोष्ट सांग - अर्थात बाईच्या कविता २' या पुस्तकांचे प्रकाशन भालचंद्र नेमाडे यांच्या हस्ते झाले. डॉ. निर्मोही फडके आणि अश्विनी भोईर यांनी या सत्राचे सूत्रसंचालन केले. याच कार्यक्रमात कौस्तुभ सुतार या नऊ वर्षांच्या मुलाने नेमाडे यांचे लाइव्ह स्केचिंग करून रसिकांची दाद मिळवली. त्याचे नेमाडेंच्या हस्ते कौतुक करण्यात आले.

या दिवशीच्या दुसऱ्या सत्रात ज्येष्ठ लेखक व चित्रपटविषयक दस्तऐवजांचे संकलक अरुण पुराणिक यांच्या 'यादे फिल्मिस्तान की', 'मुंबई मेन सिनेमा', 'बी. आर. चोप्रा यांचा दौर', 'सिनेमातील दृश्यकला' या चार पुस्तकांचे प्रकाशन झाले. त्यानिमित्त आयोजित 'सिनेमा आणि दृश्यकला' या परिसंवादात ज्येष्ठ चित्रपट समीक्षक अशोक राणे, महाराष्ट्र टाइम्सचे ज्येष्ठ पत्रकार श्रीकांत बोजेवार, अरुण पुराणिक आणि ज्येष्ठ संपादक कुमार केतकर यांनी आपली मते मांडली. 'दृश्यकलेचा एक प्रमुख आविष्कार असणाऱ्या सिनेमांना भारतात प्रचंड लोकप्रियता मिळत असली तरी या कलेचे दस्तऐवजीकरण करण्याबाबत आपल्याकडे सार्वत्रिक उदासीनता आहे. कोट्यवधी रुपयांचे बिग बजेट सिनेमे करणाऱ्या बॉलिवूडमधील कुणालाही सिनेमाचे भव्य संग्रहालय व्हावे असे वाटत नाही.' अशी खंत कुमार केतकर यांनी व्यक्त केली. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. लतिका भानुशाली यांनी केले तर अश्विनी भोईर यांनी पुस्तक प्रकाशन समारंभाचे सूत्रसंचालन केले.

यापुढील सत्रात 'उद्योगातील मराठी मोहरे' या परिसंवादात चितळे उद्योगसमूहाचे श्रीपाद चितळे, पुण्यातील पूना गेस्ट हाऊसचे किशोर सरपोतदार, बेडेकर समूहाचे अजित बेडेकर आणि केसरी टूर्सच्या झेलम चौबळ

यांनी आपापल्या उद्योग व्यवसायातील वाटचालीविषयी सांगितले. डॉ. मृण्मयी भजक आणि विघ्नेश जोशी यांनी त्यांच्याशी संवाद साधला. शून्यातून एखादा व्यवसाय सुरू करून नावारूपाला आणणे जितके आव्हानात्मक आहे तितकेच घरातील व्यवसायाची परंपरा जपणे आणि वाढवणे आव्हानात्मक असल्याचे या सर्व उद्योजकांनी सांगितले. व्यवसायात मराठीपण जपणाऱ्या आणि मराठी संस्कृतीच्या संवर्धनास हातभार लावणाऱ्या या व्यावसायिकांचे स्वागतही समाजभान असलेल्या ठाण्यातील लॅब इंडिया व तन्वी हर्बलचे प्रसिद्ध उद्योजक अनुक्रमे श्रीकांत बापट आणि डॉ. मेधा मेहेंदळे यांच्या हस्ते करण्यात आले.

हे सत्र अनोखे ठरले ते 'अरुण साधू स्मृती अनुदान प्रदान' कार्यक्रमामुळे. ग्रंथालीच्या संस्थापकांपैकी एक अरुण साधू यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ दिले जाणारे एक लाख रुपयांचे अनुदान सोलापूर जिल्ह्याच्या ग्रामीण भागात वंचित मुलांसाठी कार्यरत असलेल्या 'संस्कार संजीवन फाऊंडेशन' या संस्थेला देण्यात आले. संस्थेच्या वतीने संस्थापक परमेश्वर काळे यांनी हे अनुदान ज्येष्ठ संपादक कुमार केतकर यांच्या हस्ते स्वीकारले. याप्रसंगी अरुण साधू यांच्या कन्या शेफाली साधू उपस्थित होत्या.

यानंतर पार पडला तो पुस्तकप्रकाशन सोहळा. डॉ. शरद काळे यांचे 'चिंतन-भाग ५', सुधीर थत्ते-नंदिनी थत्ते यांचे 'नोबेलनगरी २०२४', प्रवीण दवणे यांचे 'वाट रेशमी', पंकज कुरुलकर यांचे 'सत्ता', चांगदेव काळे यांचे 'रिंगण स्वतःचं' या पुस्तकांचे प्रकाशन झाले. याप्रसंगी व्यासपीठावर खासदार नरेश म्हस्के, उद्योजक सुहास मेहता, ज्येष्ठ संपादक दिनकर गांगल उपस्थित होते. पुस्तक प्रकाशनांतर बोलताना खासदार नरेश म्हस्के म्हणाले, की 'आयोजकांनी माझ्या हस्ते चिंतन, सत्ता आणि वाट रेशमी या पुस्तकांचे प्रकाशन घडवण्याचा एक योग जुळवून आणला आहे असे वाटते. कारण आम्हा राजकारण्यांना पहिल्यांदा आवश्यकता आहे ती चिंतनाची, त्यानंतर मिळते ती सत्ता आणि सत्तेची 'वाट रेशमी' हवी असेल तर लोकोपयोगी काम करणे आवश्यक आहे.' म्हस्के यांच्या या विधानाने उपस्थितांमध्ये एकच खसखस पिकली. खासदार म्हस्के असेही म्हणाले, की 'ग्रंथालीचा वाचकदिन ज्या सभागृहात घडत आहे त्या सभागृहाला हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे असे नामकरण करण्यामागचे एक विशेष कारण असे, की माननीय बाळासाहेब ठाकरे हे केवळ राजकारणी नव्हते तर एक जाणकार कलावंतदेखील होते. त्यांची ही ओळख चिरंतन राहावी म्हणून त्यांचे नाव या वास्तूला देण्यात आले. आज ग्रंथालीच्या कार्यक्रमांमुळे अनेक साहित्यिक, कलाकार या वास्तूत आले याचा आम्हाला आनंद आहे.' पुस्तक प्रकाशन सोहळ्यात लिम्का बुक ऑफ रेकॉर्डने नोंद घेतलेल्या शशिकांत खानविलकर यांनी बसचे तिकीट व फणी यांच्या साहाय्याने काढलेल्या तुतारीच्या आवाजाने वेगळी रंगत आणली.

'ग्रंथाली'ने साहित्य, सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रात चार-पाच दशके लक्षणीय योगदान देणाऱ्या समकालीन संस्थांचा सन्मान वाचकदिनाच्या निमित्ताने करण्यात केला. स्त्री मुक्ती संघटनेच्या वतीने ज्योती म्हापसेकर आणि शारदा साठे यांनी सन्मान स्वीकारला. डिंपल प्रकाशनच्या वतीने प्रकाशक अशोक मुळे यांनी सन्मान स्वीकारला. युवक बिरादरीच्या वतीने जयेश जाधव यांनी सन्मान स्वीकारला. तर जिगीषा या संस्थेच्या वतीने प्रशांत दळवी यांनी सन्मान स्वीकारला. त्यांच्या कार्यावर चित्रफिती राजीव जोशी यांनी तयार केल्या.

अशोक हांडे यांच्या संगीतमय मुलाखतीने ग्रंथालीच्या वाचकदिनाची सांगता झाली. अभिनेता विघ्नेश जोशी यांनी हांडे यांची खुमासदार शैलीत मुलाखत घेतली. दीड तासाहून अधिक काळ रंगलेल्या या संगीतमय मुलाखतीला रसिकांनी भरभरून दाद दिली. 'शुभमंगल चरणी गण नाचला' या गणाने मुलाखतीचा प्रारंभ झाला तर 'खेळे भवरा ग बाई भवरा, राधिकेचा नवरा' या गाण्याने कार्यक्रमाची सांगता झाली. मुलाखतीत हांडे यांनी मंगलगाणी दंगलगाणी, मराठी बाणा, अमृतलता, आवाज की दुनिया, मधुरबाला, माणिक मोती, आनंदयात्री, मराठी बाणा अशा त्यांच्या कार्यक्रमांच्या आठवणींना उजाळा देत, काही व्हिडिओ व लाइव्ह गाणी सादर करत दिलेली ही मुलाखत उत्तरोत्तर रंगत गेली. 'कला ही समाजप्रबोधनासाठी पाहिजे. मी तोच उद्देश घेऊन फिरलो. तसेच, आपली संस्कृती श्रेष्ठ आहे हे लोकांना ओरडून सांगितले पाहिजे.' अशी भावना अशोक हांडे यांनी मुलाखतीत व्यक्त केली.

वाचकदिन यशस्वी होण्यात खासदार नरेश म्हस्के, उद्योजक सुहास मेहता, एस.के. डेव्हलपर्स यांचे साहाय्य मोलाचे होते. तर मराठी ग्रंथसंग्रहालयाचे पदाधिकारी विद्याधर ठाणेकर, चांगदेव काळे, प्रणिती राजे, विद्याधर पटवर्धन, निशिकांत महांकाळ, दुर्गेश आकेरकर आणि 'ठाणे वैभव'चे संपादक मिलिंद बल्लाळ यांनी सोबत येऊन केलेले सहकार्य तेवढेच महत्त्वाचे होते.

पुंडलिक पै यांनी पै फ्रेंड्स लायब्ररीच्या माध्यमातून तीनही दिवस भव्य पुस्तकप्रदर्शन व विक्रीचे आणि पुस्तक आदानप्रदानचे उत्तम नियोजन केले. वाचकदिनानिमित्त होणाऱ्या स्पर्धांच्या नियोजनात शिल्पा खेर, मेधा आलकरी, वृंदा दाभोलकर यांचा, रील व रांगोळी यांच्या नियोजनात अभिषेक नेमाणे (अध्यक्ष, गारद फाउंडेशन) यांचा तर वयम्, महाराष्ट्र सेवा संघ, मुलुंड, माणिकराव कीर्तने वाचनालय, वाशी, आदी संस्थांचा सक्रिय सहभाग होता. प्रदर्शनांच्या मांडणीत व तेथील नियोजनात रवी देवधर, समीर कदम यांनी दिलेले योगदान मोलाचे होते, तसेच उत्स्फूर्त सहकार्य कवी मोहन काळे, टॅगच्या हर्षदा बोरकर अशा अनेकांचे होते. धनश्री धारप यांनी समन्वयक म्हणून काम पाहिले, तर वाचकदिनासाठी

केलेले बॅक ड्रॉप, पटांगणातील बॅनर, स्पर्धा व कार्यक्रमांची माहिती देणारे ठिकठिकाणी लागले बॅनर यांचे डिझाइन हेमंत जोशी व सुनील देवळेकर यांनी उत्कृष्ट केले. फोटोग्राफी आणि व्हिडिओसाठी प्रियाल देवलाटकर व कुलस्वामिनी यांचे सहकार्य होते. वाचकदिनाची आखणी होताना त्या दिवशी प्रसिद्ध होणाऱ्या पुस्तकांची निर्मिती सुरू होती. त्यात ग्रंथाली संगणक विभागाचे आणि वाचकदिनी अन्य कामांसाठी आर्या करंगुटकर, सौमित्र शिंदे, हरिप्रसाद जयस्वाल, किशोर कांबळे, व अकाऊंटंट अनिल भोसले यांचे सहकार्य तितकेच महत्त्वाचे होते. या साऱ्यांच्या सहभागातून हा भव्य सोहळा दर्जेदार आणि दिमाखदार पार पडला.

काही स्पर्धांची अंतिम फेरी सर्व स्पर्धांचा बक्षीस समारंभ २३ तारखेला सकाळच्या सत्रात पार पडला.

ज्ञानपीठ आणि मराठी भाषा यावर आधारित प्रश्नमंजूषा स्पर्धेत - महाविद्यालयीन गटात प्रथम क्रमांक समीक्षा संदीप बच्चे (भवन्स महाविद्यालय, कनिष्ठ), द्वितीय क्रमांक हर्ष गणेश पेंडुरकर (साठ्ये महाविद्यालय, विलेपार्ले), तृतीय क्रमांक रिया कृष्णा वाठारकर (व्ही.जी. वझे केळकर महाविद्यालय) यांना पारितोषिक मिळाले.

सांघिक अभिवाचन स्पर्धेच्या महाविद्यालयीन गटात प्रथम क्रमांक - गटाचे नाव -रानफुलं (भवन्स महाविद्यालय, कनिष्ठ अंधेरी), द्वितीय क्रमांक - गटाचे नाव - फुलराणी (राम निरंजन झुनझुनवाला महाविद्यालय, घाटकोपर) व तृतीय क्रमांक - गटाचे नाव - गुलमोहोर (राम निरंजन झुनझुनवाला म हाविद्यालय, घाटकोपर) यांनी बक्षिसे पटकावली, तर उत्तेजनार्थ बक्षीस रूईया महाविद्यालय, माटुंगा यांना देण्यात आले.

सांघिक अभिवाचन स्पर्धेच्या खुल्या गटात प्रथम क्रमांक मिळवला इरसाल स्टोरी टेलरने, द्वितीय क्रमांक - श्रीरंग थिएटर व तृतीय क्रमांक - मनोरंजन गट यांनी मिळवला.

अक्षररांगोळी स्पर्धेतील महाविद्यालयीन गटात कृतिका तांडेल (कै. पी.आर. पाटील उत्कर्ष माध्यमिक विद्यालय आणि ज्युनियर कॉलेज, विरार) हिने पहिला क्रमांक मिळवला, सोनाली गावडे (यशवंत चांदजी सावंत कनिष्ठ महाविद्यालय, भांडूप) हिने द्वितीय क्रमांक मिळवला आणि तृतीय क्रमांक श्रुतिका कडू (जोशी-बेडेकर महाविद्यालय, ठाणे) हिला मिळाला. खुल्या गटात दोन बक्षिसे देण्यात आली. दशरथ वारणकर यांना प्रथम क्रमांकाचे पारितोषिक, तर जुईली शेलार यांना द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक मिळाले. प्रसिद्ध चित्रकार विजयराज बोधनकर यांनी रांगोळ्यांचे परीक्षण केले.

शालेय पातळीवरील व्यक्तिमत्त्व विकास व अभिवाचन स्पर्धा फाऊंडेशनच्या प्रमुख सहकार्याने घेण्यात आली. भाग्यश्री फाऊंडेशनच्या शिल्पा खेर यांनी समन्वयक म्हणून या स्पर्धेचे काम पाहिले. एकूण २० शाळा या स्पर्धेत सहभागी होत्या. या स्पर्धेत समर्थ काटे (इयत्ता सहावी - श्रीमती सावित्री देवी थिरानी विद्यामंदिर, ठाणे) याने प्रथम क्रमांक पटकावला, असिफ शेख (इयत्ता आठवी - ठाणे महानगर पालिका शाळा क्रमांक २३) याने द्वितीय क्रमांक पटकावला, तर तृतीय क्रमांक प्रगती शिर्के (इयत्ता आठवी - ठाणे महानगरपालिका शाळा क्रमांक ७९) आणि वैदेवी शेरेकर (इयत्ता सातवी - ठाणे महानगरपालिका शाळा क्रमांक ३८) यांच्यामध्ये विभागून देण्यात आला.

'कथाचित्र' स्पर्धा टॅग या संस्थेच्या सहकार्याने घेण्यात आली. नीलिमा काळे आणि विजयराज बोधनकर यांनी या स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून काम पाहिले. महाविद्यालयीन गटात ठाणे स्कूल ऑफ आर्ट कॉलेजच्या सुजल पाटील यांनी तर खुल्या गटात आर्किटेक्ट अमृता यादव यांनी पारितोषिक पटकावले.

साहित्य रील (लघुपट) या स्पर्धेत महाविद्यालयीन गटातून भूमी राम यादव यांनी तर खुल्या गटातून वासंती काळे यांनी पारितोषिक पटकावले.

मराठी ग्रंथसंग्राहालय, ठाणेच्या सहकार्याने खुल्या गटासाठी 'ज्ञानपीठ प्रश्नमंजुषा स्पर्धा' घेण्यात आली. डॉ. निर्मोही फडके आणि सीमा जोशी यांनी या स्पर्धेच्या अंतिम फेरीचे परीक्षण केले. ग्रंथालीच्या वतीने अश्विनी भोईर यांनी तर मराठी ग्रंथसंग्रहालयाच्या वतीने निशिकांत महांकाळ आणि प्रणाली राजे यांनी समन्वयक म्हणून काम पाहिले.


ज्ञानपीठ प्रश्नमंजुषा स्पर्धा खुल्या गटातून डॉ. विमुक्त राजे यांनी प्रथम क्रमांक, चारुहास शृंगारपुरे यांनी द्वितीय क्रमांक व अंजली ठाकूर यांनी तृतीय क्रमांक पटकावला. सर्व स्पर्धांचा बक्षीस समारंभ २३ डिसेंबर २०२४ रोजी सायंकाळी ज्येष्ठ साहित्यिक व समीक्षक अनंत देशमुख, मराठी ग्रंथसंग्रहालयाचे अध्यक्ष विद्याधर ठाणेकर व कार्याध्यक्ष चांगदेव काळे, 'ग्रंथाली'चे संपादक अरुण जोशी यांच्या हस्ते पार पडला.

विविध स्पर्धा आणि ग्रंथावरीने प्रारंभ झालेल्या ग्रंथालीच्या सुवर्णमहोत्सवी वर्षातील अविस्मरणीय वाचकदिनाची सांगता बहारदार झाली ती अशोक हांडेंच्या रंगलेल्या मुलाखतीने. तीन दिवस ठाण्यातील बाळासाहेब ठाकरे सभागृह रसिकांची ऊठबस, साहित्यिक व वाचकांच्या अनौपचारिक गप्पा, कार्यक्रमांची रेलचेल, पुस्तक आणि कलाप्रदर्शने या सगळ्या वातावरणाने भारावलेले होते. इराण्याच्या हॉटेलमध्ये झालेली ग्रंथालीची रुजवात पन्नास वर्षांचा प्रवास करत, नेहमीच साचलेपण बाजूला सारत बहरत गेली आहे. या बहराची ऊर्जा घेत ठाण्यातील वाचकदिनाच्या अखेरीस सर्वांनी एकमेकांचा निरोप घेतला तो पुन्हा नवे काहीतरी असेच रुजत राहील या विश्वासावर!

**- अश्विनी भोईर**

ashwinibhoir23@gmail.com

# वाचकदिनी प्रसिद्ध झालेली पुस्तके



चांगदेव काळे लिखित
'रिंगण स्वत:चं'



सदानंद डबीर लिखित
'लहजा'



डॉ. सिसिलिया कार्व्हालो
लिखित
'निरागसतेचा नजराणा'



डॉ. वसुधा सहस्त्रबुद्धे लिखित
'भय आणि
साहसाच्या सोबतीने'



दीपक मच्याडो लिखित
'सारंगीचे सूर'



प्रवीण दवणे लिखित
'वाट रेशमी..'

अरुण पुराणिक लिखित
'बी.आर. चोप्रा यांचा दौर',
'यादें फिल्मीस्तान की',
'मुंबई मेन सिनेमा' आणि
सिनेमातील दृश्यकला'
या चार पुस्तकांचे प्रकाशन
०






किरण येले लिखित
'बाई बाई सांग
अर्थात बाईच्या कविता २'

महेंद्र कोंडे लिखित
'बिलोरी'





मोहन काळे लिखित
'अखेर मी माझीच समजूत घातली'

नीलकंठ कदम लिखित
'कविता :
आस्वाद आणि समीक्षा'





पंकज कुरूलकर लिखित
'सत्ता'




# ग्रंथपरिचय



**डॉ. निर्मोही फडके**
९९२०१ ४६७११

**जहरमाया**
**महेश केळुसकर**




एकविसाव्या शतकाच्या पंचविशीत आपण पोहोचत आहोत. सरत्या काळानं मराठी कवितेसमोर आणि पर्यायानं कवींसमोर अनेक आव्हानं उभी केली आहेत. कवी आणि कविता बदलत आहेत का, हा प्रश्न ऐरणीवर आहे.

नैसर्गिक आणि मानवनिर्मित कारणांमुळे घडणाऱ्या स्थितिगतीच्या मंथनातून निर्माण होणारं 'जहर' आपल्या पेशींमध्ये मुरवणारा एक कवी. ती 'जहरमाया' त्याच्या कवितेतून पाझरते, हे वरील प्रश्नाचं एक उत्तर आहे.

'झिनझिनाट' कविता लिहिणारे प्रसिद्ध कवी महेश केळुसकर ह्यांचा 'जहरमाया' हा कवितासंग्रह सृजनसंवाद प्रकाशनानं प्रकाशित केला आहे. हा त्यांचा दहावा कवितासंग्रह. जवळपास चार दशकं त्यांची कविता-यात्रा – हे 'एकांताचे गाणे' – चालू आहे.

'एकांताचे गाणे माझे मीच ऐकतो
सुखदुःखाच्या पल्याड सारे तोच टाकतो'

ह्या कवितासंग्रहात दीर्घ कविता कमी आहेत. ५८ कवितांपैकी अनेक कवितांचं रूपडं ठेंगणं-ठुसकं आहे. मात्र दिसायला इवल्याशा वाटणाऱ्या ह्या कवितेचा गाभा 'फकिराच्या धुपाचा निर्गुणी दरवळ चुरा' बाळगून आहे. ही कविता सृष्टीचं अपरूप शोधते आणि माणसाच्या 'मुखवटे' घालून फिरण्याच्या 'लांडगे-वृत्ती'लाही खडा सवाल करते.

माणसांचे मुखवटे घालुनी का लांडगे?
झडप घालुन चुरडला आताच कोणी मोगरा

मानवी नातेसंबंधांबद्दल आपल्या मनातलं गुज मोकळं करताना कवीसाठी त्याची कविताच प्राणप्रिय ठरते. मग तो लिहितो,

नातीगोती निरोप घेती अर्ध्यावरती
शेवटची ही फूल आसवे तिच्या उशाशी
पाठलाग का करतो आहे कोणी माझा!
मी कवितेचा प्राण धरून हा घट्ट उराशी...

इथे 'पाठलाग' करणारं नक्की कोण असावं? ह्या ओळीला वर्तमान परिस्थितीत अनेकानेक संदर्भ आहेत. कवीच्या किंवा एकूणच सर्जनशील कलाकाराच्या जगण्यावर, बोलण्यावर, वागण्यावर पाळत ठेवणाऱ्या सामाजिक, राजकीय 'व्यवस्थां'वरचं हे अल्पाक्षरी भाष्य करकरीत आहे. कवितेचा प्राण धरून बसलेल्या कवीला तिच्या तेजाबद्दल आत्मविश्वास आहे, पण वर्तमानातल्या तथाकथित आविष्कारस्वातंत्र्यावर असलेलं प्रश्नचिन्ह तो अधोरेखित करतो.

पर्यावरणअसमतोल हा सर्वांच्या काळजीचा असा आजचा महत्त्वाचा मुद्दा. ह्या विषयावर गणेशोत्सव सजावटीपासून आंदोलनांपर्यंत चर्वितचर्वण होतं. परंतु एक संवेदनशील कवी जेव्हा लिहितो, 'अंतहीन पृथ्वीच्या समुद्राच्या वाळूत/ खेळताहेत मुलं/ किल्ले बनवताहेत/ पुन्हा पुन्हा कोसळणारे/...मृत्यूच्या सावलीत खेळतायत मुलं' ... तेव्हा वाचक निःस्तब्ध झाल्याशिवाय राहत नाही. पर्यावरण-ऱ्हासाचं अकराळविकराळ स्वरूप इतक्या लहान आकृतिबंधांतूनही वाचकांसमोर उभं करण्याची, नव्हे त्याला अंतर्मुख करण्याची ताकद ह्या कवितेत आहे.

'आकाशाचे पोट फाडीत घुसणारे स्कायस्क्रॅपर्स
आणि समुद्राची आतडी पिळवटून टाकणाऱ्या
क्रेन्स
जिथे धडधडत असते हवा हर क्षणी नाण्यांसाठी
दरेक श्वास, हव्यास होण्यासाठी'
किंवा
'कशाला लावतो आहेस हे रोप म्हाताऱ्या?
पोरा-बाळांना फळं खाता येतील म्हणून--
खुळा आहेस.
तुझ्या हातातल्या रोपाला मुळातूनच कीड
लागलीय
जरा डोळे उघडून बघ.'

भविष्यातली भयाण सृष्टी आपल्या कवितेतून कवी फक्त रेखाटत नाही, तर वर्तमान सावरण्याचं भान पोहोचवतो. हे ह्या कवितेचं बलस्थान आहे.


मराठी कविता 'आधुनिक' किंवा 'उत्तर आधुनिक' किंवा 'जागतिक' झाली आहे का, ह्याबद्दल महाचर्चा घडत आहेत. 'मॉडर्न इझम'चे किंवा 'ग्लोबल' होण्याचे निकष वगैरे मुद्दे कवितेच्या समीक्षेच्या परिघातले. कवितेच्या आस्वादकासाठी मात्र कवितेचं मनतळी उतरणं आणि तो तळ ढवळणं हा निकष गरजेचा असतो. 'जहरमाया'मधली कविता ह्या निकषांवर नक्कीच उतरते. मग ती 'ओम् युक्रेनाय नमः' असं म्हणो, किंवा 'पाठीवर सॅक घेतलेल्या नव्या युगा'बद्दल किंवा 'गाईच्या डोळ्यांमधून हाक घालणाऱ्या आईबद्दल' सांगो. ती काळजाचा ठोका कुठेतरी चुकवतेच. निसर्ग, प्रेम, नातेसंबंध, सामाजिक जाणीव इत्यादी कविता-प्रांतातल्या जुन्याच 'गढ्या'. पण 'जहरमाया'मधल्या कवितांमधून त्यांचे वेगळे कोन-तिकोन समोर येतात. ते केवळ वर्णनात्मक नाहीत, तर दाट, जिवंत असं दृक्श्राव्य रसायन असणारे आहेत. ही कविता कधी 'चिमणी होऊन वर्गाबाहेर' मुक्तच्छंदातलं कथन करते, तर कधी 'हायकू'सारखी तिपेडी होऊन येते...

कोंबडीची पिसं/ धिस्पटून शेतात / कोल्हा आल्यावर
एक कंदील / सभोवती / सहा भावंड

हल्ली कवितासंग्रह प्रकाशित करणंही 'रिस्क' सदरात मोडणारं. तरीही उत्तम निर्मितिमूल्य असणाऱ्या ह्या संग्रहाचं प्रकाशन करून सृजनसंवादनं ती 'रिस्क' घेतली. ह्याचं मुख्य कारण ह्या पुस्तकाच्या 'ब्लर्ब'मध्येच नमूद केलं आहे. ज्ञानपीठ पुरस्कारप्राप्त ज्येष्ठ कोंकणी साहित्यिक श्री. दामोदर मावजो लिहितात,'...केळुसकरांच्या कवितेला त्यांची अशी स्वतंत्र मुद्रा आहे.' ह्या दशकपूर्ती संग्रहाच्या निमित्तानं हा पुनःप्रत्यय कविता-प्रेमींना नक्कीच येईल.


**जहरमाया**
महेश केळुसकर
सृजनसंवाद प्रकाशन, मूल्य – २०० रुपये

## ग्रंथपान



**चांगदेव काळे**
**९८६९२०७४०३**

**गाव तिथे मानसोपचार**
**मानसिक साक्षरतेची अभिनव चळवळ**




**एक अभिनव साक्षरता उपक्रम**

विश्वास म्हणजे दुसऱ्यावर टाकलेला अंधविश्वास नव्हे की आंधळं प्रेम नव्हे. नात्याचे बंध हळूहळू जुळतात. ते तुटले तर मानापमानाचं नाटक न करता जुळवून घ्यावे लागतात. संवाद म्हणजे गोडीगुलाबीनं बोलणं नव्हे, तर परस्परांचा आदर राखून मार्दवपूर्ण मांडलेले विचार आणि सहज भावना असतात. त्या दरवेळी होकारात्मकच असतील असं नव्हे. नकारात्मक असल्या तरी काटेरी नकोत.''

शारीरिक व्याधी, आजार कमीअधिक प्रमाणात असतील तरीसुद्धा आपण त्याकडे जागरूकपणे लक्ष देतो आणि शक्य तिथे त्यावर उपचार घेतो. परंतु मानसिक आजार नावाची गोष्ट आपल्याला फारशी न रुचणारी आणि सहजासहजी लक्षात न घेण्यात येणारी बाब आहे. अगदी टोकाचा परिणाम दिसू लागला तरच आपण त्याकडे लक्ष वेधून घेतो अन्यथा पूर्णपणे दुर्लक्ष करतो. परिणामी मानसिक आजार दुर्लक्षित राहिल्याने त्याचे परिणाम किती भयंकर असू शकतात याची ओळख अशा रुग्णांच्या जवळ गेल्यानंतरच येते. हे प्रमाण वेगवेगळ्या स्तरावर अवलंबून असून त्याची टक्केवारी आरोग्य संघटनेने जाहीर केलेली आहे. असे असूनही उपचाराचे प्रमाण मात्र तिच्या पूर्णपणे व्यस्त असे आहे. याला कारण आपली त्याकडे पाहण्याची नकारात्मक मानसिकता हेच होय. अशा या आजारावर रुग्णांच्या दाराशी जाऊन त्यांच्यात जागरूकता निर्माण करणे आणि शक्य तिथे उपचार करणे हा एक अभिनव चळवळीचा प्रयोग म्हणावा लागेल. तो काही जागरूक मानसोपचारतज्ज्ञांनी केला आणि त्यातून एक मानसिक साक्षरतेची चळवळ उभी राहिली. गावोगाव जाऊन या चळवळीच्या माध्यमातून केवळ साक्षरताच नव्हे तर प्रत्यक्ष आळा घालण्याचे, उपचार करण्याचे मोठे कार्य हाती घेतलेले आहे. त्या चळवळीला आलेल्या यशाचे, अनुभवांचे संचित म्हणून या पुस्तकाकडे पाहता येईल. मानसिक आजार म्हणजे काय, त्यावर उपचारात्मक काळजी काय घ्यायला हवी याचे समुपदेशन यात आपल्याला वाचायला मिळते.

मानसिक आजारांचे अनेक प्रकार आहेत ज्यांच्याशी आपला फारसा परिचय नसतो. त्यातल्या ढोबळ मानाने ताणतणावातून निर्माण झालेले मानसिक आजार, नैराश्यातून निर्माण झालेले आजार, भीती वाटणे, स्मरणशक्ती कमी होणे, स्किझोफ्रेनिया यासारख्यांची नावे साधारणपणे आपणास परिचित होतात. या आजारांच्या लक्षणांची ओळख ही आपल्याला याच पुस्तकातून होत जाते. ज्यांना आपण साधारण किंवा दुर्लक्षित करता येईल अशी लक्षणे समजतो ती मानसिक आजाराची लक्षणे असतात, यांचा उलगडा हे पुस्तक वाचल्यानंतर होतो. प्रत्येक व्यक्ती ही त्याच्या परीने स्वतःला कधीही मानसिक रुग्ण आहोत असे मान्य करत नाही; परंतु लहान मुले, महिला, किशोरवयातील मुले, वृद्ध आणि तरुण वयातही अनेक कारणांनी बळी पडणारे रुग्ण हे मानसिक आजारांची वर्गवारी स्पष्ट करतात.

मार्टिन सेलिग्मन हे मानसशास्त्राचे आधुनिक गुरू. ते मानसिक आजाराचे पंचतत्व स्पष्ट करतात. त्यासाठी त्यांनी PERM या इंग्रजी आद्याक्षरांची मांडणी केलेली आहे. पी फॉर पॉझिटिव्ह थिंकिंग आणि पॉझिटिव्ह इमोशन. इ फॉर एंगेजमेंट, आर फॉर रिलेशनशिप, एम फॉर मिनिंग आणि ए फॉर अकंप्लिशमेंट. याचे विश्लेषण डॉक्टर राजेंद्र बर्वे यांनी लिहिलेल्या 'होकारात्मकतेचे पसायदान' या लेखात आपल्याला वाचायला मिळते. डिप्रेशन, विशेषतः सोमॅटिक डिप्रेशनबाबत माहिती आपल्याला डॉक्टर शैलेश उमाटे यांनी लिहिलेल्या 'गोष्ट नैराश्याची' या लेखातून लक्षात येते. 'स्किझोफ्रेनिया'चे निदान व त्यावर योग्यवेळी उपचार केला तर तो पूर्णपणे बरा करता येऊ शकतो हे डॉक्टर सुरेश पाटील 'स्किझोफ्रेनिया' या लेखातून स्पष्ट करतात. या लेखामुळे पॅरानाईड स्किझोफ्रेनिया हे नाव देखील आपल्याला नव्यानेच लक्षात येते.

भारतात जवळपास आठ कोटी भारतीय मद्याच्या व्यसनात अडकलेले आहेत. तंबाखूमुळे दरवर्षी दहा लाखाहून अधिक भारतीयांचा मृत्यू होतो. दारू व तंबाखू मुळे मानसिक आणि शारीरिक आरोग्याचे प्रचंड हानी होते आणि हीच व्यसनाधीनता दूर करणे समुपदेशाने शक्य आहे, असे डॉक्टर अतुल ढगे लिहितात.

'परीक्षेला सामोरे जाताना' या लेखात डॉक्टर हेमंत सोनानिस हे मुलांच्या पालकांनी काय करावं, शिक्षकांनी कोणती जबाबदारी पार पाडावी आणि विद्यार्थ्यांनी कसे सामोरे जावे याचे मार्गदर्शन केलेले आहे. स्त्री मनाचा थांग, नाती गमावणारा डिमेन्शिया, मानसिक आजार काही गैरसमज, हे लेखदेखील आवर्जून वाचायला हवेत असेच आहेत.

'गाव तिथे मानसोपचार' हे एक मानसिक साक्षरतेवर आधारित लेखांचे पुस्तक असून त्यामागील हेतू , वास्तव आणि अपेक्षा डॉक्टर नीना सावंत, अध्यक्ष, इंडियन सायकिॲट्रिक सोसायटी, यांनी त्यांच्या मनोगतात व्यक्त केलेल्या आहेत. डॉक्टर अमोल देशमुख, प्रकल्प प्रमुख, गाव तिथे माणसोपचार, डॉक्टर नंदू मुलमुले, ज्येष्ठ माणसोपचार तज्ज्ञ आणि डॉक्टर धनंजय अष्टुरकर , सचिव, इंडियन सायकिॲट्रिक सोसायटी, यांनी या संपूर्ण उपक्रमाची भूमिका स्पष्ट केलेली आहे.


हे एका चळवळीचे यशोगाथा सांगणारे पुस्तक आहे. माणूस समजून घेण्यासाठी आणि समुपदेशासाठी प्रत्येकाच्या संग्रही असायलाच हवे.

सुप्रसिद्ध चित्रकार विजयराज बोधनकर यांनी प्रत्येक लेखासाठी समर्पक असे रेखाचित्र रेखाटलेले आहे, तसेच मुखपृष्ठाची संकल्पना आशयाला धरून सुबकपणे साकारलेली आहे.

**मूल्य २०० रुपये । सवलतीत १२० रुपये**

## ग्रंथपान

**डॉ. आंबेडकर**
**भारतीय प्रजासत्ताक साकारणारा महामानव**
**डॉ. नरेंद्र जाधव**




**एका कालखंडाचा कालातीत संदर्भमूल्य असलेला ग्रंथ**

''भारतातील राजकारणात इतर कोणत्याही देशापेक्षा भक्ती, एखाद्याला सर्वस्व अर्पण करणे किंवा विभूतिपूजा या गोष्टी अतिशय मोठ्या प्रमाणात प्रचलित आहेत. धर्म किंवा आध्यात्मिक बाबींमध्ये भक्तीही आत्म्याच्या मुक्तीचे साधन असू शकेल; परंतु राजकारणात भक्ती किंवा विभूतिपूजा हा अवनतीचा आणि अंतिमतः हुकूमशाहीकडे नेणारा मार्ग आहे.''

स्वतःचे स्वातंत्र्य गमावलेल्या भारताचे स्वतंत्र प्रजासत्ताक देश म्हणून अस्तित्व निर्माण झाले ते २६ जानेवारी १९५० रोजी. यापूर्वी हे स्वातंत्र्य मिळवण्यासाठी प्रयत्न झालेले नाहीत असे नाही, तरीही फार मोठा कालखंड हा पारतंत्र्याचाच होता हे आपल्याला अमान्य करता येणार नाही. याला अनेक कारणे आहेत. पैकी जातिभेद, पंथापंथ आणि देशहितापेक्षा जातिपंथाला, मिळणारे श्रेष्ठत्व, एक देशवासीय म्हणून असलेला एकसंघ एकोप्यातील अभाव, अलिप्तता. तेव्हा आता तरी रक्ताच्या अखेरचा थेंब अंगी असेपर्यंत आपल्या देशाचे स्वातंत्र्य प्राणपणाने जपण्याचा निर्धार करण्याची गरज आहे, असे मत डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी व्यक्त केले आहे, तेही घटना समितीला घटनेचा मसुदा सादर करताना. त्या वेळेचे संपूर्ण भाषणच खूप अभ्यासनीय असे आहे. त्यातून डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचा घटना निर्मितीमागे असलेला एकूण भविष्यकालीन सार्वभौम एकात्मकतेचा दृष्टिकोन दिसून येतो.

भारतीय राज्यघटनेचा स्वयंपूर्ण असा मसुदा सादर करताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना जागतिक स्तरावरील सर्व राज्यघटनांचा अभ्यास करावा तर लागलाच, परंतु त्या जशाच्या तशा न स्वीकारता आपल्या देशाला अखंडित राखण्यासाठी आणि सर्व मूलभूत हक्कांचे रक्षण करण्यासाठी कोणत्या उपायांची आवश्यकता आहे याची स्पष्ट कल्पना नजरेसमोर ठेवून त्यांनी आपल्या पद्धतीचा स्वतंत्र मसुदा तयार केलेला आहे. हा मसुदा घटना समितीसमोर सादर झाला तेव्हा २४३ कलमे आणि १३ अनुसूचींचा त्यात समावेश होता. परंतु झालेल्या चर्चा आणि विचारविनिमय झाल्यानंतर अंतिमतः या मसुद्यात एकूण ३९५ कलमे आणि आठ अनुसूचींचा समावेश आहे. हा मसुदा अंतिम होताना जवळपास सात हजार सहाशे पस्तीस सूचना आल्या होत्या आणि ठळक स्वरूपात अशा दहा टीकांचा समावेश होता. या सगळ्यांचा साकल्याने परामर्श घेत योग्य तिथे दुरुस्ती स्वीकारीत डॉक्टर बाबासाहेब यांनी या मसुद्याला अंतिम स्वरूप दिलेले आहे. त्यांनी घेतलेल्या प्रचंड कष्टांचे, दाखवलेल्या मानसिक खंबीरतेचे आणि घेतलेला भविष्यकालीन वेधाचे कौतुक घटना समितीचे अध्यक्ष डॉक्टर राजेंद्र प्रसाद यांनी केलेले आहे. त्यांनी म्हटले आहे, की 'मसुदा समितीच्या सदस्यांनी आणि विशेषतः तिचे अध्यक्ष डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी तब्येत साथ देत नसतानाही ज्या उत्साहाने आणि झोकून देऊन काम केले त्याला तोड नाही. मसुदा समितीवर त्यांची करण्यात आलेली निवड आणि त्यांना देण्यात आलेले अध्यक्षपद या इतका दुसरा कोणताही उत्तम निर्णय असू शकत नाही. डॉक्टर आंबेडकरांनी या निवडीला केवळ न्याय दिला नाही, तर (राज्यघटनेचा मसुदा तयार करण्याचे) अतिशय देदीप्यमान असे काम केले.'

डॉक्टर नरेंद्र जाधव यांनी 'डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर : भारतीय प्रजासत्ताक साकारणारा महामानव' या नावाचा ग्रंथ नुकताच आपल्या हाती दिलेला आहे. सदर ग्रंथात डॉक्टर आंबेडकर यांनी राज्यघटना तयार करताना जे परिश्रम घेतले ते किती उच्च पातळीचे होते, आलेल्या टीका, सूचना, दुरुस्त्या यांचा साकल्याने विचार करताना त्यांनी दाखवलेले मनोधैर्य किती सर्व सम ावेशक होते, प्रसंगी डॉ. बाबासाहेबांनी प्रत्येक मुद्याचा घेतलेला परामर्श आणि तो कसा सार्थ आहे हे पटवून देण्यासाठी दाखवलेली बौद्धिक चमक या सगळ्यांचा अतिशय तपशीलवार आणि सुसंगत इतिहास या ग्रंथातून आपल्यासमोर सादर केलेला आहे.

या ग्रंथात केवळ राज्यघटनाच आहे असे नाही. तर त्यावेळी डॉ. बाबासाहेबांनी केलेली भाषणे, त्या कालखंडात असणारे सर्व माननीय नेते, ब्रिटिश व्हाइसरॉय आणि घडत जाणाऱ्या सायमन कमिशन, गोलमेज परिषदा, भारत सरकारचा कायदा, दुसरे महायुद्ध, भारत सरकारचा १९३५ चा कायदा, सप्रू यांची स्वराज्य राज्यघटना १९४५ आणि कॅबिनेट मिशन, या सगळ्यांचा इतिहास संदर्भासह या ग्रंथात दिलेला आहे. डॉ. बाबासाहेबांचा सुरुवातीचा कालखंड जो शिक्षणाच्या ध्यासाने आणि व्यासंगाने व्याप्त असा आहे. त्याच काळात त्यांना आलेले जातिभेदाचे अनुभव, त्यातून त्यांनी रोवलेली मुक्तिलढ्याची मुहूर्तमेढ, स्थापन केलेला रिपब्लिकन पक्ष, झालेल्या निवडणुका, राज्यसभेवर झालेली निवड यांचाही यात समावेश आहे. त्या अर्थाने या ग्रंथाकडे पाहिले तर हे केवळ डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे चरित्र नव्हे तर हा त्या कालखंडाचाही इतिहास आहे. तो डॉ. नरेंद्र जाधव यांनी अतिशय उत्तमरितीने या ग्रंथात साकारलेला आहे.

ग्रंथ साकारताना त्याची पाच विभागांत मांडणी केलेली आहे. प्रत्येक प्रकरणाला स्वतंत्र शीर्षक दिलेले आहे. जागोजागी संदर्भांच्या टिपा दिलेल्या आहेत. तसेच परिशिष्टांची स्वतंत्र योजना भाग पाचमध्ये केलेली आहे. हा ग्रंथ साकारताना डॉक्टर नरेंद्र जाधव यांनी खूप काटेकोरपणे मुद्देसूद असे लेखन करण्यावर भर दिलेला आहे. दमदार आणि कसदार असे त्यांचे प्रवाही लेखन आहे. संदर्भमूल्य पाहता हा ग्रंथ प्रत्येकाच्या संग्रही असायला हवा.

राज्यस्तरीय, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्वरूपाच्या तब्बल ७३ पुरस्कारांनी डॉक्टरांना नरेंद्र जाधव यांना सन्मानित केलेले आहे. यातला अतिविशेष पुरस्कार म्हणजे 'कमांडर ऑफ अकॅडमी पाल्मस' हा फ्रान्स सरकारचा शिक्षणक्षेत्रातला सर्वोच्च नागरी किताब होय. हा किताब मिळवणारे ते पहिलेच भारतीय होत. नुकताच त्यांना भारतभाग्यविधाता २०२२ या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.


सतीश भावसार यांनी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांच्या स्वाक्षरीसह असलेला फोटो मुखपृष्ठावर योजलेला आहे. शिवाय पाठच्या बाजूला संविधानाची प्रत उघडून दाखवलेली आहे. त्यामुळे या ग्रंथाच्या उंचीला एक वेगळीच झळाळी प्राप्त झाली आहे.

**मूल्य ४०० रुपये । सवलतीत २४० रुपये**

# ग्रंथपान

## मु.पो.वडाचे म्हसवे ते यु.एस.ए.

**आनंद म्हसवेकर**




**सकारात्मकतेचा साक्षात्कार**

'मळो सूर तारो मारो' या नाटकामुळे माझ्या आयुष्यात बऱ्याच गोष्टी झाल्या. एक तर हे नाटक चांगले चालले असेच म्हणावे लागेल. कारण या नाटकाचे गुजराती रंगभूमीवर एकूण १२५ प्रयोग झाले. अर्थातच मानधन मला मराठीपेक्षा तिप्पट होतेच. माझ्या संसाराला बऱ्यापैकी हातभार लागला. दुसरी एक महत्त्वाची गोष्ट ही झाली, की 'आनंद म्हसवेकर' या मराठी माणसाला गुजराती रंगभूमीवर लेखक म्हणून मान्यता मिळाली.'

मराठी रंगभूमीवर आपला नावलौकिकाचा ठसा उमटवणाऱ्या नाट्यकर्मींमध्ये लेखक म्हणून जी मान्यता मिळायला हवी ती सगळ्यांच्याच वाट्याला येते असे नाही. त्यातून ज्यांनी एकांकिका, नाटकस्पर्धा, नंतर प्रायोगिक नाटक आणि शेवटी व्यावसायिक नाटक अशा विविध स्तरांवरील रंगमंचावर आपल्या लेखनकौशल्याचा आविष्कार सादर केला आणि त्याला प्रेक्षक-समीक्षक यांची मान्यता मिळाली, असे जे मोजके लेखक-नाटककार आहेत त्यांच्यात आनंद म्हसवेकर यांचे नाव आवर्जून घ्यायला हवे.

आनंद म्हसवेकर यांनी लिहिलेले आत्मचरित्र 'वडाचे म्हसवे ते यु एस ए' वाचल्यानंतर आपल्या लक्षात येते की आपल्या ध्येयाचा पाठपुरावा करणारा आणि त्यासाठी वाटेल ती किंमत मोजायला तयार असणारा हा कलावंत कसा घडत गेला आणि त्यांनी आपले ईप्सित कसे साध्य केले. खरे तर हे आत्मचरित्र म्हणण्यापेक्षा त्यांनी साकारलेला नाट्य प्रवासाचा हा खरा दस्तऐवज म्हणायला हवा. पोटापाण्याचा व्यवसाय म्हणून एखादी नवीन नोकरी स्वीकारतानासुद्धा आपल्या कलागुणांना वाव कुठे मिळेल याची निश्चित जाणीव ठेवून त्यांनी स्टेट बँकेची त्यातूनही मुख्य कार्यालयाची निवड केली. अर्थातच त्यांच्या अंगी असलेल्या कलागुणांच्या आधारावरच बँकेने पुरेसे संधीचे दालन उघडे ठेवले आणि म्हसवेकरांनी त्याचे सोने केले.

आयुष्यात चाळीसच्या वर एकांकिका आणि तितकीच नाटके लिहिणारा हा लेखक. त्यापैकी १२ नाटके व्यावसायिक स्तरावर यशस्वीरित्या सादर झालेली आहेत. त्यातला मैलाचा दगड ठरावा असे 'यू टर्न' तर सगळ्यांच्याच मान्यतेचा बिंदू ठरले. केवळ मराठी नाटकच नव्हे तर गुजराती रंगमंचावरदेखील त्यांनी आपली नाटके सादर केलेली आहेत आणि त्यात मराठीपेक्षा अधिक यश मिळवलेले आहे. त्यातले एक नाव म्हणजे 'मळो सूर तारो मारो' हे होय.

आनंद म्हसवेकर यांनी नाटकाच्या जोडीलाच गाण्यांच्या आर्केस्ट्राची संकल्पना साकारली तीही गुजरातीमध्ये. त्याचे नाव 'मेहंदी रंग लाग्यो'. गुजराती भाषेतला हा पहिला आर्केस्ट्रा ठरला. या आर्केस्ट्राने जवळजवळ त्यांच्या आयुष्याला संपूर्णपणे एक वेगळीच कलाटणी दिली. गुजराती नाटकात लाईटमन म्हणून सुरू केलेली कारकीर्द पुढे नाटककार म्हणून यशस्वी ठरली. इतकेच नव्हे तर गुजराती नाटकातील घोस्ट रायटर म्हणूनदेखील त्यांनी आपला लौकिक सिद्ध केलेला आहे. यात लेखनासोबत दिग्दर्शनाचाही भाग आहेच.

दूरदर्शनवर लेखक म्हणून संधी मिळणे तसे अवघडच. परंतु या माध्यमाचेही द्वार त्यांच्यासाठी खुले झाले आणि जाहिरातपटापासून मालिका सादर करण्यापर्यंत ते यशस्वीपणे सिद्ध झाले. याच क्षेत्राशी जुळलेला शेवटचा टप्पा म्हणजे सिनेमा. सिनेमाच्या क्षेत्रातही त्यांनी आपला ठसा उमटवलेला आहे. या सगळ्याविषयी ते लिहितात, 'शिवाजी मंदिरला एक दिवस आपल्या नावाचा बोर्ड असेल हे १९७४ ला पाहिलेले स्वप्न १९८६ सालात 'जोडी जमली तुझी माझी' या नाटकाने पूर्ण केले होते आणि प्लाझा सिनेमा या थिएटरवर कथा, पटकथा, संवाद, आनंद म्हसवेकर असा बोर्ड असेल हे स्वप्न २००२ साली 'असा मी काय गुन्हा केला' या सिनेमाने पूर्ण केले.

आनंद म्हसवेकर हे म्हसवे या ग्रामीण भागातून आले आणि त्यांचा प्रवास थेट यूएसएपर्यंत झाला याचे वर्णन करताना ते कुठेही स्वतःच्या अहंपणाचा बडेजाव मिरवताना दिसत नाहीत. या आत्मचरित्राचा काही भाग त्यांनी आपल्या सुरुवातीच्या आयुष्याच्या उजळणीसाठी दिलेला आहे. परंतु त्यात परिस्थितीचे व आलेल्या अनुभवांचे कुठलेही रडगाणे नाही. उलट आपण या क्षेत्रातले अनुभव मिळवण्यासाठी आलेले आहोत असा उदयन्मुख भाव मनात ठेवून ते या प्रवासात वावरत राहिलेले आहेत. माटुंग्याच्या लेबर कॅम्पमधील चाळी वजा एक रूममध्ये राहणारे आनंद म्हसवेकर पुढे स्वतःच्या फॉर्म हाऊसपर्यंत मजल मारतात. पायी मैलोन मैल चालत जाणारे म्हसवेकर पुढे स्वतःच्या चार चाकी वाहनातून प्रवास करतात. इतकेच नव्हे तर आपल्या क्षेत्राशी अभ्यास करता यावा म्हणून थेट उच्च शिक्षणापर्यंत झेप घेतात. खूप वणवण कराव्या लागलेल्या आयुष्याला सुखवस्तूपर्यंत पोच करणारे आनंद म्हसवेकर हे नाव सिनेनाट्यक्षेत्राच्या द्वारावर मोहोर ठोकल्याप्रमाणे कोरून ठेवतात.

हा सगळाच प्रवास अतिशय मनोरंजक आहे. तो मांडताना त्यांनी प्रकरणांचा आधार घेतलेला आहे आणि प्रत्येक टप्प्यावरील शिडीप्रमाणे एक एक पायरी कशी पार केली त्याचे वर्णन करतात.

खरे तर आनंद म्हसवेकर यांनी केलेला लेखनप्रपंच आणि संपादन केलेले यश पाहता या आत्मचरित्राचे स्वरूप अनेक खंडात्मक ठरू शकले असते, याची जाणीव आपल्याला वाचत असताना होते. सदरचे लेखन हे या क्षेत्रामध्ये स्वतःचे भवितव्य घडू पाहणाऱ्या कलावंतांसाठी मार्गदर्शक ठरावे असेच आहे.


या लेखनात शेवटी त्यांनी आपल्या कारकिर्दीत मिळवलेल्या यशाची वा लेखन सीमेची यादी दिलेली नाही. मिळालेल्या पुरस्कारांची ही यादी यात नाही. आतील वर्णनात येणारी माहिती अगदी थोडक्यात आहे. इतका निरपेक्ष भाव प्रथमच पाहायला मिळाला. या लेखनासाठी पुरुषोत्तम बेर्डे यांनी खास कौतुकाचे चार शब्द लिहिलेले आहेत. त्यासाठी 'आनंद' सिनेमाचे वाक्य संदर्भ म्हणून दिलेले आहे. या पुस्तकाचे मुखपृष्ठ सतीश भावसार यांनी साकारलेले आहे.

**मूल्य ३०० रुपये । सवलतीत १८० रुपये**

# ग्रंथपान

**स्त्रियांचे आरोग्य**

**प्रा. डॉ. राजश्री दयानंद कटके**




**प्रत्येक स्त्रीने अभ्यासावे असे पुस्तक**

'आयुष्य म्हणजे ऊनसावलीसारखा उतारचढावाचा प्रकार आहे. माणसाचे जीवनच त्यासाठी आहे. याला तसे सामोरे जावे, त्यातूनही स्थिर राहून आनंदी जीवन जगता यावे, हीच जीवन जगण्याची उत्तम कला आहे. ही कला कुठल्याही शाळेत किंवा विद्यापीठात मिळत नाही. ती कला आपल्या आयुष्याच्या अनुभवातून निर्माण करायची असते. त्यामुळेच असे म्हटले जाते, की स्वतःच्या जीवनाचा शिल्पकार तूच आहे, हे खरे आहे.'

स्त्रिया त्यांच्या आरोग्याबाबत, समस्यांबाबत सहसा इतरांना सांगत नाहीत. त्या आपला आजार आपल्या अंगावर काढतात किंवा लपवून ठेवतात. याला कारण सामाजिक आणि कौटुंबिक असते. यात आणखी एक भाग असतो आपल्या आरोग्यात निर्माण झालेल्या, होणाऱ्या समस्यांबाबतची माहिती पुरेशी नसते किंवा इतरांना न सांगितल्यामुळे समस्या वाढत जाऊन त्यांनाच स्वतःला सामोरे जाण्याची वेळ येते. विशेषतः तरुण वयातील मुली अशा समस्यांना सामोरे जाताना दिसतात. ही अडचण लक्षात घेऊन त्यांना मार्गदर्शन व्हावे यासाठी प्रा. डॉ. राजश्री दयानंद कटके यांनी 'स्त्रियांचे आरोग्य' हा प्रमुख विषय नजरेसमोर ठेवून त्यावर लेखन केलेले आहे.

'स्त्रियांचे आरोग्य' हा विषय सहजसोप्या पद्धतीने समजावा अशा तऱ्हेने त्याची मांडणी केलेली आहे. कुठल्याही आरोग्यासाठी सकस आहार, नियमित व्यायाम, योगासने आणि स्थिर मानसिक संतुलन या प्राथमिक बाबींचा चिकित्सकपणे स्वीकार करणे आवश्यक आहे. आहारात अनेक प्रकारचे पौष्टिक घटक असतात. ए बी सी डी याप्रमाणे कुठल्या अन्नात/फळात हे घटक समाविष्ट आहेत हे कळले तर त्यांची निवड करणे सोपे जाते. हे लक्षात घेऊन या पुस्तकात त्यांची तपशिलासह माहिती दिलेली आहे. इतकेच नव्हे तर कोणती योगासने करायला हवीत त्यांची चित्रांसह माहिती दिलेली आहे. अगदी काटेकोरपणे सांगायचे झाले तर किशोरवयीन मुलींसाठी आरोग्यविषयक तक्रारी असतील तर कोणती आसने व प्राणायाम करायला हवेत, रजोनिवृत्तीच्या नंतर कोणती योगासाने व प्राणायाम करायला हवेत, यांचाही तपशील दिलेला आहे.

शारीरिक आरोग्यासोबतच मानसिक आरोग्य संतुलित राहणे तितकेच महत्त्वाचे आहे. स्त्रियांचे आरोग्य असे आपण म्हणतो तेव्हा किशोरवयीन मुलींचे आरोग्य प्रथम जपायला हवे. ते जपले गेले तरच पुढील आयुष्याचा पाया बळकट होऊ शकतो आणि त्यावर संपूर्ण आयुष्य आरोग्यमय राहू शकते. तो पाया कसा घालायचा याबाबत लेखिकेने केलेले विवेचन खूप उपयुक्त आहे. प्रत्येक मुलीची शारीरिक ठेवण आणि आरोग्याची स्थिती सारखेच असेल असे नाही. त्या प्रत्येकीसाठी यात उपाययोजना सांगितलेली आहे.

तरुणवर्गातील स्त्रियांसाठी जे प्रश्न आहेत ते मासिक पाळी, तिच्यातील नियमितता आणि अनियमितता, त्यामुळे निर्माण होणारा ताणतणाव, आई होणार की वंध्यत्व, गर्भाशयातील अडचणी, श्वेतपदर मुळे निर्माण होणारी भीती, या प्रश्नांवर काळजी करावी असे आता राहिलेले नाही. उपचारांनी आणि उपायांनी सर्व उत्तरांपर्यंत पोहोचणे शक्य झालेले आहे. मात्र त्यांची उचित अशी माहिती असणे आवश्यक असते. ही माहिती आपल्याला येथे उपलब्ध आहे.

गरोदरपणापासून मुलाच्या जन्मापर्यंत स्त्रीला अनेक दिव्यांतून जावे लागते. एका अर्थाने तो बाळाचा पहिला जन्म असला तरी स्त्रीचा मात्र तो पुनर्जन्मच असतो. लेखिकेने या काळासाठी केलेले मार्गदर्शन खूपच महत्त्वाचे आहे.

स्तनपानाचे महत्त्व, पाळणा लांबवण्यासाठीच्या गर्भनिरोधक पद्धती, रजोनिवृत्ती, यांच्याविषयी केलेले विश्लेषण आणि याच जोडीला मुलगी वाचवाबाबत केलेले आवाहन, स्त्रियांमध्ये आढळणारे कर्करोग, यांची ही माहिती सखोल दिलेली आहे.

कुठलेही मार्गदर्शन करताना ते सुलभपणे झाले पाहिजे. ती काळजी या पुस्तकात घेण्यात आलेली आहे. स्त्रीच्या वयाच्या प्रत्येक टप्प्यावर होणारे बदल, येणारी आव्हाने, उपस्थित होणाऱ्या समस्या, अशा वर्गवारीत मांडणी केलेली आहे. वैज्ञानिक वा वैद्यकीय तपशील देताना इंग्रजी शब्दांचा अडसर उभा राहणे अगदी स्वाभाविक असते. त्यामुळे भाषा हा महत्त्वाचा विषय ठरतो. सदरचे पुस्तक वाचत असताना असा इंग्रजी भाषेचा अडसर कुठेही आलेला नाही. अगदी सहज संवाद साधावा आणि आपल्याला जे नेमके सांगायचे आहे ते सुस्पष्ट तपशिलात सांगावे, तशा शैलीत हे लेखन झालेले आहे. त्यामुळे सर्वच स्तरांवरील स्त्रियांसाठी हे पुस्तक उत्तम मार्गदर्शक ठरावे इतके उपयुक्त होईल याची लेखिकेने मनापासून काळजी घेतलेली आहे असे दिसून येते. जोडीला आवश्यक तिथे आपले म्हणणे स्पष्ट व्हावे म्हणून रेखाचित्रांचा प्रयोग केलेला आहे.

लेखिका डॉ. राजश्री दयानंद कटके या उच्च विद्याविभूषित असून मुंबईतील जे जे रुग्णालयात स्त्रीरोगशास्त्र व प्रसूती विभागात प्राध्यापक या पदावर कार्यरत आहेत. स्त्रियांसाठी रोगनिदान व उपचार हे त्यांचे कार्य वाखाणण्याजोगे आहे. स्त्रियांच्या कर्करोगासंदर्भातील त्यांचे योगदानही फार मोठे आहे. त्या उत्तम वक्त्या आणि सिद्धहस्त लेखिका आहेत. स्त्रीरोग व प्रसूतीशास्त्र या विषयावरील पुस्तकात बरेच चाप्टर त्यांनी लिहिलेली आहेत. स्त्रियांच्या आरोग्यविषयक समस्या या विषयावर समाजात जागृती निर्माण होण्यासाठी त्यांनी विविध कार्यक्रमांतून आणि माध्यमांतून व्याख्यानाद्वारे मार्गदर्शन केलेले आहे. त्यासाठी त्यांना अनेक सन्माननीय पारितोषिकांनी सन्मानित करण्यात आलेले आहे.

पुस्तकाच्या प्रस्तावनेमध्ये पद्मश्री डॉक्टर तात्याराव लहाने यांनी डॉक्टर राजश्री दयानंद कटके यांच्या या वैद्यकीय क्षेत्रातील योगदानाबाबत प्रसंशा केलेली असून या पुस्तकाचे महत्त्व अधोरेखित केलेले आहे. या पुस्तकाचे मुखपृष्ठ डॉक्टर नरेंद्र बोरलेपवार, सोरा मीडिया यांनी साकारलेले आहे.

**मूल्य २०० रुपये । सवलतीत १२० रुपये**

## ग्रंथाली वाचकदिन क्षणचित्रे



अक्षररांगोळी स्पर्धा



अच्युत पालव यांचे सुलेखन प्रदर्शन



अच्युत पालव यांचे सुलेखन प्रात्यक्षिक




विजयराज बोधनकरांच्या स्वभावचित्रं प्रदर्शनाला अशोक नायगावकरांची भेट




कार्टून्स कंबाइन आयोजित व्यंगचित्रे पाहताना डॉ. भालचंद्र नेमाडे



रोहन पोरे यांची चित्रे पाहताना डॉ. भालचंद्र व प्रतिभा नेमाडे



प्रभाकर वाईरकर यांनी प्रात्यक्षिक दाखवताना अरुण पुराणिक यांचे चित्र रेखाटले



डॉ. नेमाडे यांचे लाइव्ह स्केच रेखाटून कौतुक झालेला कौस्तुभ सुतार

RNI No. MAHMAR/2013/50137
Published on 10th of Every Month.

Postal Registration No. MCW/310/2022-2024
Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, Mumbai-400001 on 10th & 11th of Every Month.




मुद्रक, प्रकाशक, संपादक : सुदेश राजाराम हिंगलासपूरकर यांनी ग्रंथाली विश्वस्त संस्थेच्या वतीने, 'शब्द रुची' हे मासिक इंडिया प्रिंटिंग वर्क्स, इंडिया प्रिंटिंग हाऊस, ४२, जी.डी. आंबेकर मार्ग, वडाळा, मुंबई ४०००३१ येथे छापून ग्रंथाली विश्वस्त संस्थाच्या वतीने, वुलन मिल म्युनिसिपल स्कूल, खोली नं. ९, तळमजला, जे. के. सावंत मार्ग, यशवंत नाट्यमंदिराशेजारी, माटुंगा (प), मुंबई ४०००१६ येथे प्रकाशित केले.

## ग्रंथाली वाचकदिन क्षणचित्रे



अक्षररांगोळी स्पर्धा



अच्युत पालव यांचे सुलेखन प्रदर्शन



अच्युत पालव यांचे सुलेखन प्रात्यक्षिक




विजयराज बोधनकरांच्या स्वभावचित्रं प्रदर्शनाला अशोक नायगावकरांची भेट




कार्टून्स कंबाइन आयोजित व्यंगचित्रे पाहताना डॉ. भालचंद्र नेमाडे



रोहन पोरे यांची चित्रे पाहताना डॉ. भालचंद्र व प्रतिभा नेमाडे



प्रभाकर वाईरकर यांनी प्रात्यक्षिक दाखवताना अरुण पुराणिक यांचे चित्र रेखाटले



डॉ. नेमाडे यांचे लाइव्ह स्केच रेखाटून कौतुक झालेला कौस्तुभ सुतार

RNI No. MAHMAR/2013/50137
Published on 10th of Every Month.

Postal Registration No. MCW/310/2022-2024
Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, Mumbai-400001 on 10th & 11th of Every Month.




मुद्रक, प्रकाशक, संपादक : सुदेश राजाराम हिंगलासपूरकर यांनी ग्रंथाली विश्वस्त संस्थेच्या वतीने, 'शब्द रुची' हे मासिक इंडिया प्रिंटिंग वर्क्स, इंडिया प्रिंटिंग हाऊस, ४२, जी.डी. आंबेकर मार्ग, वडाळा, मुंबई ४०००३१ येथे छापून ग्रंथाली विश्वस्त संस्थाच्या वतीने, वुलन मिल म्युनिसिपल स्कूल, खोली नं. ९, तळमजला, जे. के. सावंत मार्ग, यशवंत नाट्यमंदिराशेजारी, माटुंगा (प), मुंबई ४०००१६ येथे प्रकाशित केले.